• पुणे, मंगळवार, ०६ ऑगस्ट २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 239 • वर्ष ३ रे, अंक २३९ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS



शेख हसीना यांचा राजीनामा

» सविस्तर वृत्त पान ७ वर




## » At a Glance

### वाहनावर दिवा लावल्यास कारवाई!

**मुंबई :** पुण्यामधील पूजा खेडकर प्रकरण सध्या सर्वत्र गाजत आहे. यानंतर आता मुंबई पोलिसांनी मंत्रालय परिसरातील अधिकाऱ्यांच्या गाड्यांवरील दिवे काढण्यास सुरुवात केली आहे. गाडीवरील दिवे काढून त्या संबधित आधिकाऱ्यांना नोटीस देखील बजावण्यात येणार आहे. गाडीवर दिवा लावण्याची परवानगी नसेल, » पान ९ वर

### २७ ऑगस्ट रोजी बाजारपेठा बंद

**पुणे :** महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीकडून राज्य व्यापारी परिषदेचे आयोजन मार्केट यार्डातील व्यापार भवन येथे आयोजित करण्यात आले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज अँड ॲग्रीकल्चर (मुंबई), फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (मुंबई), चेंबर ऑफ असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्र इंडस्ट्रिज » पान ९ वर

### बांगलादेश सीमेवर 'हाय अलर्ट'चे आदेश

**नवी दिल्ली :** भारत-बांगलादेश सीमेवरील घडामोडींच्या पार्श्वभूमीवर सीमा सुरक्षा दलाने (बीएसएफ) सोमवारी ४,०९६ किलोमीटर लांबीच्या सीमेवरील सर्व तुकड्यांना 'हाय अलर्ट' जारी केला आहे. बीएसएफचे महासंचालक (कार्यवाह) दलजीत सिंह चौधरी आणि इतर वरिष्ठ कमांडर सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी » पान ९ वर

### केरळ सरकारचे वायनाडसाठी पॅकेज

**वायनाड :** केरळ सरकारने सोमवारी जाहीर केले की, ते वायनाडमधील आपत्तीग्रस्तांसाठी सर्वसमावेशक पुनर्वसन पॅकेज लागू करणार आहेत. वायनाड येथे भूस्खलनग्रस्त पाड्यांमध्ये बचाव कार्य आणि मदत कार्य अजूनही सुरू असून, मोठ्या नुकसानीच्या कहाण्या समोर येत आहेत.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुणेकरांना आश्वासन

# पुरावर तोडगा काढणारच!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुरग्रस्तांशी चर्चा करण्यासाठी पुणे दौऱ्यावर आहेत. सांगवीत नागरिकांशी संवाद साधल्यानंतर शिवाजीनगर भागातील पाटील इस्टेटला त्यांनी भेट दिली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी या भागातील नागरिकांना शब्द दिला आहे. तुम्ही विश्वास ठेवा आपण या पुरावर कायमस्वरूपी तोडगा काढू, असे आश्वासन त्यांनी दिले.

पुण्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाचा जोर कायम राहिला आहे. त्यामुळे पुण्यातील धरणे पूर्णपणे भरण्याच्या मार्गावर आहेत. अशा वेळी खबरदारी म्हणून धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडले जात आहे. त्यामुळे नदीकाठी राहणाऱ्या भागात पूरपरिस्थिती




> पावसाळा अजून सुरू असून पुराच्या पाण्यामुळे लोकांना त्रास होऊ नये. यासाठी सर्व पाटबंधारे विभागाची टीम समन्वय ठेवून काम करत आहे. लोकांना पुराचा धोका होऊ नये, यासाठी योग्य नियोजन आणि समन्वय करून पाटबंधारे विभागाचे अधिकारी करत काम आहेत. नदीपात्राची कॅपॅसिटी वाढवली, नदीचे खोलीकरण आणि रुंदीकरण केले तर पुराच्या पाण्याचा लोकांना होणारा त्रास कमी होईल."
>
> — **एकनाथ शिंदे,** मुख्यमंत्री

निर्माण होती आहे. नदीकाठच्या भागात राहणाऱ्या नागरिकांना या पुराचा मोठा फटका बसला. या पुरामुळे त्यांचे प्रचंड नुकसान झाले. संसार पाण्यात वाहून गेले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या घटनेची दखल घेत पूर परिस्थिती निर्माण झालेल्या भागाला भेट दिली. त्यानंतर सुप्रिया सुळे, राज ठाकरे, मुरलीधर मोहोळ, आदित्य ठाकरे यांनीसुद्धा भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला.

आजच्या पाहणी दौऱ्यात मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, तुमच्या घराचा त्रास आता दूर झाला पाहिजे, असे धोरण करायचे आहे. आपल्याला तात्पुरती मदत मिळते हे ठीक आहे. परंतु कायमस्वरूपी पुराचा धोका दूर करण्याचे काम सरकार करणार आहे. म्हणून सरकारच्या वतीने धोरण आणू, नवीन डीसीआर आणू, विकास करण्यासाठी काही धोरणात्मक निर्णय घ्यावे लागतील असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. मी ते बघण्यासाठी आलो आहे. त्याचे योग्य प्रकारे नियोजन करू. तुम्ही प्रशासनाला सहकार्य करण्याची भूमिका घ्यायची आहे. आपल्याला संकटात सगळ्यांनी मदत केली. सर्व लोकप्रतिनिधी, नगरसेवक, आमदार, खासदार मदतीला आले. महापालिका, आर्मी, » पान ९ वर

### अजित पवार कोणत्या मतदारसंघातून?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** अजित पवार बोले आणि बारामती हले, असे समीकरण आतापर्यंत सुरू होते. मात्र, यंदाची विधानसभा निवडणूक अजित पवार यांच्यासाठी कठीण मानली जात आहे. त्यामुळे ते कोणत्या मतदारसंघातून उभे राहणार, याची उत्सुकता लागली आहे.

खडकवासला मतदारसंघात अजित पवार यांनी उभे राहावे, अशी मागणी कार्यकर्त्यांनी केली आहे. राष्ट्रवादी खडकवासला विधानसभा अध्यक्ष बाबा धुमाळ, माजी विरोधी पक्षनेत्या दिपाली प्रदीप धुमाळ, राज्य महिला आयोग अध्यक्षा रुपाली चाकणकर, माजी उपमहापौर दिलीप बराटे, प्रबळ दावेदार आहेत. या मतदारसंघात राष्ट्रवादीचे मोठ्या प्रमाणात नगरसेवक आहेत. शिवाय लोकसभा निवडणुकीत २१ हजारांचे लीड मिळाले आहे. बारामती मतदारसंघात खासदार सुप्रिया सुळे यांनी ५० हजारांचे » पान ९ वर

## अजित पवारांच्या निर्णयाने बारामतीत खळबळ

# राष्ट्रवादी पदाधिकाऱ्यांना राजीनामा देण्याचे आदेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** बारामती तालुक्यात राष्ट्रवादी पक्षात कार्यरत असलेल्या पदाधिकाऱ्यांनी येत्या आठ दिवसात राजीनामे द्यावेत, असे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. लोकसभेतील पराभवानंतर अजित पवारांच्या या निर्णयामुळे बारामती शहर, तसेच तालुक्यात भाकरी फिरवली जाणार असून, नव्या दमाच्या पदाधिकाऱ्यांना संधी मिळणार आहे, असे मानले जाते.

सोमवारी बारामतीत आयोजित मेळाव्यात पवार यांनी पदाधिकाऱ्यांकडे राजीनामे मागितले. १५ ऑगस्टपूर्वी पदाधिकाऱ्यांची पुनर्नियुक्ती केली जाणार आहे. त्यात निष्ठावंताना संधी दिली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

अजित पवार हे रविवारपासून बारामती दौऱ्यावर आहेत. रविवारी त्यांचा बोरकरवाडी येथे जाहीर कार्यक्रम झाला. त्यानंतर ते बाबुर्डी येथे गेले. जिरायती दौऱ्यात पदाधिकाऱ्यांविषयी अनेकांनी त्यांच्याकडे नाराजी व्यक्त केली होती. त्यावर अजित पवार यांनी सोमवारी तात्काळ निर्णय घेतला.

अजित पवार म्हणाले, आपल्याच स्टेजवर बसायचे आणि आपला कार्यक्रम करायचा, असे चालले आहे. अनेक कार्यकर्त्यांनी सांगितले की, दादा तुमचा म्हणवला जाणारा कार्यकर्ता प्रत्यक्षात तुमचा नाही. एवढे दिले आणि काम मात्र चुकीचे करायचे. हे चालणार नाही. अशा अनेक गोष्टी माझ्या कानावर आल्या आहेत, पाहायला मिळाल्या आहेत. इथे बसणाऱ्या प्रत्येकाने आत्मपरिक्षण करावे. आपण प्रतिनिधित्व करत असताना, स्वतःच्या बुथवर जिथे मतदारयादीत नाव आहे, तेथे तरी घड्याळाला मताधिक्य मिळाले का, असा सवाल त्यांनी पदाधिकाऱ्यांना केला. तसेच १५ ऑगस्टपूर्वी नवीन निवडी केल्या जातील.



### कलम ३७० हटवल्याचा वर्धापनदिन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**श्रीनगर :** कलम ३७० रद्द केल्याच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त जम्मू-काश्मीरमधील सुरक्षा यंत्रणा सतर्क करण्यात आली असून, सोमवारी सर्व सुरक्षा दलांना ताफ्याची ये-जा टाळण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सर्व सुरक्षा यंत्रणांना पाठवलेल्या संदेशात पोलिसांनी ५ ऑगस्ट रोजी सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला आहे. अमरनाथ यात्रेकरूंच्या ताफ्याची » पान ९ वर

## 'मनसे'कडून दोन उमेदवारांची घोषणा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनसेने दोन उमेदवारांची घोषणा केली आहे. बाळा नांदगावकर यांना शिवडी, तर दिलीप धोत्रे यांना पंढरपूरमधून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. सोमवार, दि. ५ ऑगस्ट रोजी सोलापूर दौऱ्यावर असताना, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी यासंदर्भात घोषणा केली.

» विधानसभा

बाळा नांदगावकर हे २००९ मध्ये शिवडी विधानसभा मतदारसंघातून मनसेच्या तिकिटावर निवडून आले होते. मात्र, २०१४ मध्ये शिवसेनेच्या अजय चौधरी यांनी त्यांचा पराभव केला. २०१९ मध्ये त्यांनी प्रत्यक्ष निवडणुकीत न उतरता प्रचाराची धुरा सांभाळली होती.

आता पुन्हा एकदा मनसेच्या वतीने ते मैदानात असल्यामुळे उबाठाच्या अजय चौधरी यांच्यासमोर कडवे आव्हान उभे ठाकले आहे. महायुतीकडून कोण उमेदवार असेल, याबाबत अद्याप घोषणा झाली नसली, तरी भाजपकडून नाना आंबोले आणि शलाका साळवी इच्छुक आहेत.

पंढरपूर विधानसभा मतदारसंघात भाजपचे समाधान अवताडे विद्यमान आमदार आहेत. » पान ९ वर

## पंतप्रधान मोदी यांचे प्रतिपादन

# ही जम्मू-काश्मिरच्या प्रगतीची सुरुवात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मिरमधील वादग्रस्त कलम ३७० रद्द करणे, हा देशाच्या इतिहासातील महत्त्वाचा क्षण होता. जम्मू-काश्मिरच्या प्रगतीची आणि समृद्धीची ही सुरुवात असल्याचे पंतप्रधान मोदी यांनी म्हटले आहे. ५ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी, म्हणजेच ५ ऑगस्ट २०१९ रोजी केंद्र सरकारने जम्मू-काश्मिरला विशेष दर्जा देणारे वादग्रस्त कलम ३७० रद्द केले होते. यासोबतच जम्मू-काश्मीरचा विशेष राज्याचा दर्जा रद्द करण्यात आला. तसेच काश्मीर आणि लडाख चे केंद्रशासित प्रदेशात विभाजन करण्यात आले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, कलम ३७० आणि ३५ (अ) रद्द करण्याच्या संसदेच्या निर्णयाला आज पाच वर्षे पूर्ण होत आहेत. आपल्या देशाच्या इतिहासातील हा महत्त्वाचा क्षण होता. जम्मू-काश्मिर आणि लडाखमध्ये प्रगती आणि समृद्धीच्या नव्या युगाची ही सुरुवात होती. याचा अर्थ येथे भारतीय राज्यघटनेची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी होऊ शकते. संविधान निर्मात्यांचेही हेच स्वप्न होते.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, कलम ३७० हटवल्यानंतर » पान ९ वर

## हर हर महादेव!

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**श्री क्षेत्र भीमाशंकर:** श्रावण महिन्याचा पहिला सोमवार सर्वात महत्वाचा मानला जातो. आज बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकरला पहाटेची महाआरती करत मुख्य शिवलिंगावर दुग्धाभिषेक, डमरु आणि शंखनाद करण्यात आला. त्यानंतर भाविकांच्या दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले.

# महाविकास आघाडीची जागावाटपात आघाडी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** लोकसभा निवडणुकीत महायुतीचा पराभव केल्यावर, आता महाविकास आघाडीने विधानसभा निवडणुकीत जागावाटपात आघाडी घेतली आहे.

काँग्रेस १००, शिवसेना (ठाकरे गट) ९० ते १००, तर शरद पवार यांचा पक्ष ८० जागा लढणार आहे. उर्वरित ८ ते १० जागा छोट्या राजकीय पक्षांना देण्यात येणार आहे. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता येत्या काही दिवसांतच लागणार आहे. त्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीने जोरदार तयारी सुरू केली आहे. लोकसभेला सर्वाधिक २१ जागा लढवणाऱ्या ठाकरेसेनेला केवळ ९ जागांवर यश मिळाले. लोकसभेला मविआमध्ये सर्वाधिक जागा ठाकरेसेनेने लढवल्या. पण त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. तथापि, विधानसभेला ठाकरेसेना ९० ते १०० जागा लढवण्याच्या तयारीत आहे. मविआमध्ये शरद पवार गटाला सर्वात कमी जागा मिळण्याची शक्यता आहे. त्यांना ८० जागा मिळू शकतात. तर उर्वरित जागा लहान पक्षांना सोडल्या जाऊ शकतात. छोट्या पक्षांना ८ ते १० जागा मिळण्याची शक्यता आहे.

महायुती २०० जागा जिंकणार असल्याचा दावा भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुण्यात केला. कोणत्याही परिस्थितीत राज्यात पुन्हा » पान ९ वर

## अमित शाह, राज ठाकरे, उद्धव ठाकरे यांचा पुणे दौरा

# पुण्यात आला 'पॉलिटिकल पूर'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कामाला लागण्याचे आदेश केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी कार्यकर्त्यांना दिले. त्यानंतर लगेचच राज ठाकरे यांनी २ दिवसीय पुणे दौरा केला. विधानसभा निवडणूक स्वबळावर लढणार असल्याचे राज यांनी जाहीर केले. हे कमी म्हणून की काय शिवसेनेतर्फे (उध्दव ठाकरे गट) सभा घेऊन भाजपवर जोरदार हल्लाबोल केला गेला.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी पुणे हे केंद्र केले आहे. तर, दुसरीकडे काँग्रेस शहराध्यक्षपदाचा वाद दिल्ली दरबारी गेला आहे. शरद पवार गटाच्या पक्षाचा सध्या बैठकांवर जोर आहे. पुणे जिल्ह्यात २१ मतदारसंघ आहेत. त्यामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मोठी ताकद आहे. तरीही अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा पराभव त्यांच्या जिव्हारी लागला आहे. सुनेत्रा पवार यांना राज्यसभेवर पाठविण्यात आले आहे.

पुण्यातील सर्वच राजकीय पक्षांनी ताकद लावली आहे. कसबा पेठ, कोथरूड, पुणे क्यान्टोन्मेंट, पर्वती, शिवाजीनगर, खडकवासला, वडगांवशेरी, हडपसर या आठही मतदारसंघात महायुती आणि महाविकास आघाडीने दावा ठोकला आहे. येत्या काही दिवसांतच विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागणार आहे. लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी (शरद पवार गट) ८, शिवसेना (उध्दव ठाकरे गट) ९, काँग्रेसला १३ जागा मिळाल्या. ४८ पैकी ३१ जागा महाविकास आघाडीने जिंकल्या. तर, महायुतीला १७ जागा मिळाल्या. ही निवडणूक महाविकास आघाडी म्हणून लढणार असल्याचे सांगण्यात येत आहे. सांगली लोकसभा मतदारसंघात १ अपक्ष उमेदवार विजयी झाला. पुणे जिल्ह्यातील शिरूर हा एकमेव मतदारसंघ शरद पवार गटाचे आमदार अशोक पवार यांच्याकडे आहे. आंबेगाव, जुन्नर, खेड, पुरंदर, इंदापूर, दौंड, भोर - वेल्हा - मुळशी, बारामती, पिंपरी, चिंचवड, मावळ, भोसरी मतदारसंघ महायुती म्हणून पुन्हा खेचून आणण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कंबर कसली आहे.

#रा

### उजनीतून भीमेत विसर्ग सुरू

**पुणे :** उजनी धरण पूर्ण क्षमतेने भरत आल्याने, उजनी धरणातून सायंकाळी ५ वाजता १६ दरवाजातून ४१ हजार क्युसेक विसर्ग भीमा नदीत सोडण्यात आला. तसेच वीर धरणातून नीरा नदीत ५३ हजार ८४७ क्युसेक विसर्ग सुरू आहे. त्यामुळे भीमा पात्रात जवळपास १४ हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. उजनी धरणात दौंड येथून ९८ हजार क्युसेक मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरू असल्याने, भीमा नदीकाठचा गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

हे पाणी उद्या, पंढरपूर येथे पोहोचणार आहे. वीर व उजनी धरणाचा विसर्ग नृसिंहपूर येथे एकत्र येऊन पंढरपूर येथील चंद्रभागा नदीची पाणी पातळी सोमवारी सायंकाळपर्यंत १ लाख क्युसेकपेक्षा जास्त जाण्याची शक्यता आहे.



मुख्यमंत्री ग्रामसडक योजना
भुमिपूजन समारंभ
मंगळवार दिनांक ०६/०८/२०२४ रोजी सकाळी १०.०० वा
शुभहस्ते :
मा.ॲड.अशोक रावसाहेब पवार
(कार्यसम्राट आमदार शिरुर-हवेली)
कामाचे नाव : १) लोणीकंद ते डोंगर गाव रस्ता ग्रा.मा.५ रस्ते दर्जोन्नती करणे (अंदाजित रक्कम - ३७८.४५ लक्ष).२) डोंगरगाव - वारघडे वस्ती,बकोरी रस्ता दर्जोन्नती करणे (अंदाजित रक्कम - ३२०.५८ लक्ष).ता.हवेली.जि.पुणे
स्थळ : पेरणे-येवले वस्ती चौफुला.ता.हवेली.जि.पुणे
निमंत्रक • श्री.संदीप गोते
(अध्यक्ष हवेली तालुका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार)

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने

# ८ ऑगस्टला पुरग्रस्तांचा 'आक्रोश मोर्चा'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेल्या दोन, तीन आठवडयांपासून पुणे शहरामध्ये पावसाने जोरदार हजेरी लावलेली आहे. मात्र या जोरदार पवसामुळे मुळा - मुठा नदी काठाच्या अनेक वस्त्यांमध्ये पुराचे पाणी शिरले आहे. अनेक गोरगरीब कुटूंबियांचे संसार उघड्यावर पडले असून लाखों रुपयांचे नुकसान झाले आहे. या सर्व परिस्थितीचा गांभीर्याने विचारकरता पुरामुळे बाधीत झालेल्या अंदाजे दहा हजार कुटूंबाना त्यांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून संपूर्ण नुकसान भरपाई देण्यात यावी; तत्पूर्वी प्रत्येक कुटुंबाला २५ हजार रुपयांची मदत त्वरीत देण्यात यावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्यावतीने करण्यात आली आहे. तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्यावतीने येत्या गुरूवार दि. ८ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११ वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, जिल्हाधिकारी कचेरी ते महानगरपालिका दरम्यान 'पुरगस्तांचा आक्रोश मोर्चा' काढण्यात येणार आहे.

पुणे श्रमिक पत्रकार संघ येथे आज आयोजित पत्रकार परिषदेत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे शरहाराध्यक्ष संजय सोनवणे यांनी या विषयी माहिती दिली. यावेळी प्रदेश संघटक परशुराम वाडेकर, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे, माजी नगरसेवक अशोक कांबळे, शाम सदाफुले आदी यावेळी उपस्थित होते.

परशुराम वाडेकर म्हणाले, शहरामध्ये रस्त्यांची चाळण झाली आहे. अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे. वाहतुकीच्या कोंडीमुळे सगळे पुणेकर हवालदिल झाले आहेत. नदीसुधार योजनेमुळे नदीपात्राची रूंदी कमी झाली आहे. मेट्रो मार्गाचे बांधकाम, नदीमध्ये राडारोडा टाकणे मनपाची विविध विकास कामे, नदीपात्रातील अतिक्रमण, नाल्यावरील अतिक्रमणे यामुळे यामुळे नदी पात्रातील पाणी नागरी वस्तीत शिरत आहे. पूर्वी ९० हजार क्युसेस पाण्याचा विसर्ग केल्यावर येणारा पुर आता २८ हजार क्युसेस पाणी सोडल्यावर येत आहे.


> गेल्या अनेक आठवड्यांपासून पुणे शहरात सरासरी पेक्षा जास्त पासून होत आहे. यामुळे पुणे जिल्ह्यातील सर्व धरणे ९० टक्के भरली आहेत. तसेच खडकवासला धरणातून सतत पाण्याचा विसर्ग होत असल्याने नदीकाठी रहाणाऱ्या नागरी वस्त्यांत पाणी शिरत आहे. पाटबंधारे विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, मनपा आयुक्त पुणे आणि एकूणच आपत्ती व्यवस्थापन समितीच्या समन्वयाच्या अभावी पुणे शहरातील जवळपास दहा हजार कुटुंबे पुरामुळे बाधीत झाली आहे. मात्र, शासनाकडून त्यांना अद्याप कोणतीही मदत मिळालेली नाही. आगामी काळात देखील या नदी काठाच्या जनतेच्या वस्त्यांवर पुराची टांगती तलवार असणार आहे. — संजय सोनवणे

### आक्रोश मोर्चाच्या मागण्या

- पुरग्रस्तांना त्यांच्या झालेल्या नुकसानीची संपूर्ण भरपाई देण्यात यावी. तत्पूर्वी प्रत्येक कुटूंबास रू. २५,०००/- तातडीची मदत देण्यात यावी.
- पुरस्थिती नीट न हताळलेल्या संबंधीत अधिकाऱ्यांना तात्काळ बडतर्फ करावे.
- पुर येण्यास कारणीभूत ठरणारी नदी, नाले या वरील सर्वप्रकारची अतिक्रमणे तात्काळ काढून टाकण्यात यावीत.
- पुररेषा (रेडलाईन, ब्लू लाईन) नव्याने आखण्यात यावी.
- पुणे शहराची आपत्कालीन व्यवस्थापन समिती सक्षम करून तिची सर्व सामान्य माणसापर्यंत माहिती पोहचविण्याची व्यवस्था करावी.
- पुरग्रस्तांचे खोटे पंचनामे करणारे अधिकारी आणि खोटया लाभार्थ्यांची चौकशी करून कारवाई करावी.
- शहरातील वाहतुक व्यवस्था सुधारण्यासाठी पुणे वाहतुक पोलीस पुणे मनपा आणि या विषयातील तज्ञांची एखादी समिती नेमुण कायम स्वरूपी उपाय योजना करण्यात यावी.
- पुणे शहरातील अनेक वस्त्यांमध्ये कमी व्यासाच्या ड्रेनेजलाईन्स असल्यामुळे पावसाळयात ड्रेनेज तुंबुन रस्ते जलमय होतात. तेथे नव्याने मोठया व्यासाच्या ड्रेनेजलाईन टाकण्याचे काम करण्यात यावे.

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ढोल, ताशा वादन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** गणेशोत्सव अवघ्या १ महिन्यावर आला असताना ढोल, ताशा वादनाला सुरुवात झाली आहे. काही उत्साही तरुण - तरुणी यामध्ये सहभागी होत आहेत. शिवणे स्मशानभूमी परिसरात हा सराव सुरू आहे. गणेशोत्सव आणि ढोल - वादन हे समीकरणच आहे. आपल्या लाडक्या बाप्पांचे स्वागत करण्यासाठी भक्तजन वर्षभर वाट पाहत असतात. पारंपरिक वादन म्हणून ढोल - ताशा ओळखले जाते. गणपती बाप्पा मोरया, १२३४, गणपतीचा जयजयकार, अशा प्रकारच्या घोषणा देऊन वादन केले जाते. मागील महिना भरापासून अशा प्रकारचे वादन सुरू आहे. या भागातून ये - जा करणाऱ्या नागरिकांचे लक्ष यामुळे वळले जाते. गणरायाच्या आगमनास आता काही दिवसच उरले आहेत. सर्व भक्तांना कधी एकदा गणेशोत्सव सुरू होतोय, अशी आतुरता लागून राहिली आहे.

✓ » Selected

## भालचंद्र कुलकर्णी यांना डॉ. शंतनू चिंधडे स्मृती काव्यमाधुर्य पुरस्कार



**पुणे :** करम प्रतिष्ठानतर्फे स्व. डॉ. शंतनू चिंधडे स्मृतीप्रीत्यिर्थ दिल्या जाणाऱ्या काव्यमाधुर्य पुरस्काराने कवी भालचंद्र कुलकर्णी यांचा गौरव गेला जाणार आहे. कार्यक्रम शनिवार, दि. १० ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता पत्रकार भवन, दुसरा मजला येथे आयोजित करण्यात आला आहे. पुरस्काराचे वितरण ज्येष्ठ कवयित्री, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यवाह मृणालिनी कानिटकर यांच्या हस्ते होणार असून मीनल चिंधडे, स्मिता जोशी-जोहरे, चंचल काळे यांची विशेष उपस्थिती असणार आहे, अशी माहिती करम प्रतिष्ठानचे अध्यक्ष भूषण कटककर, प्रज्ञा महाजन यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात 'प्रीतरागिणी' निमंत्रितांचे कविसंमेलन आयोजित करण्यात आला आहे, असे कार्यक्रमाच्या निमंत्रक वर्षा कुलकर्णी यांनी सांगितले.

## पुणे शहरातील झिकाची रूग्णसंख्या ६५ वर

**पुणे :** जिल्ह्यात झिकाचा प्रादुर्भाव वाढत असून आत्तापर्यंत ७२ जणांना झिकाची लागण झाले आहे. पुणे शहरातील रूग्णसंख्या ६५ वर गेली आहे. काल पुण्यात आणखी सात जणांना झिकाची लागण झाली आहे.या रूग्णांमध्ये पाच गर्भवती महिलांचा समावेश आहे. तर, कात्रज कोंढवा परिसरातील १८ वर्षीय युवक आणि ४० वर्षीय पुरूषाचा समावेश आहे. यामध्ये पुणे शहर, पिंपरी-चिंचवड आणि पुणे ग्रामीणचा समावेश आहे. गर्भवतील महिलांच्या बाळांचे नॉमली स्कॅन नॉर्मल आलेले आहेत, अशी माहिती पुणे जिल्हा आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे. राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था आणि ससून रुग्णालयातुन आणखी तपासणीचे अहवाल येणे बाकी असल्याने रुग्णांची संख्या वाढणार असल्याचे दिसत आहे. त्यामुळे पुणेकरांनी काळजी घ्यावी असे आवाहन पुणे महानगर पालिकेकडून केले जात आहे. पुणे महानगर पालिकेकडून झिकाला उपाययोजना देखील केल्या जात आहेत.

## 'आयएमईडी' मध्ये बीबीए,बीसीए विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन प्रोग्राम

**पुणे :** भारती अभिमत विद्यापीठाच्या 'इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट अँड आंत्रप्रुनरशिप डेव्हलपमेंट( आयएमईडी) मध्ये बीबीए,बीसीए अभ्यासक्रमाच्या नव्या तुकडीच्या विद्यार्थ्यांसाठी १५ दिवसांच्या इंडक्शन प्रोग्रामचा उद्घाटन समारंभ दि.५ ऑगस्ट रोजी सकाळी आयोजित करण्यात आला होता. महाराष्ट्र इंटेलिजन्स ऍकॅडमीचे संचालक डॉ.आर.बी.डहाळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. भारती विद्यापीठ 'इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट अँड आंत्रप्रुनरशिप डेव्हलपमेंट (आयएमईडी) चे प्रभारी संचालक डॉ.अजित मोरे अध्यक्षस्थानी होते. भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे कुलपती डॉ.शिवाजीराव कदम, भारती विद्यापीठाचे कार्यवाह डॉ.विश्वजित कदम, कुलगुरु डॉ. विवेक सावजी यांच्या मार्गदर्शनाखाली हा संपूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. उपप्राचार्य डॉ.आर.व्ही.महाडिक तसेच संयोजन समिती सदस्य डॉ.सोनाली धर्माधिकारी,डॉ.स्वाती देसाई, डॉ.सुचेता काची, डॉ.योगेश गुरव, डॉ.विजय फाळके ,डॉ.हेमा मिर्जी, डॉ.दीपाली पिसाळ, डॉ.भारती येळीकर, संगीता पाटील, स्वप्रील थोरात, प्रतिमा गुंड उपस्थित होते.'आरंभ -२०२४' असे या इंडक्शन प्रोग्रॅमचे नाव होते .तो १७ ऑगस्ट पर्यंत चालणार आहे

## सख्ख्या बहिणींवर अत्याचार करणाऱ्यास २४ वर्षे सक्तमजुरी शिक्षा

**पुणे :** मामाच्या घरी आलेल्या दोन अल्पवयीन मुलींना लग्न लावून देण्याच्या आमिषाने पळवून नेत त्यांच्यावर अत्याचार केल्याप्रकरणात एकास न्यायालयाने २५ वर्षे सक्तमजुरी आणि सात हजार ५०० रुपयांचा दंड सुनावला आहे. या गुन्ह्यात दोन अल्पवयीन आरोपींचा देखील सहभाग होता. अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. आर. साळुंके यांच्या न्यायालयाने हा निकाल दिला. धनंजय सखाराम राजीवडे असे शिक्षा सुनावण्यात आलेल्याचे नाव आहे. चार आणि पाच एप्रिल २०१५ ला वारजेमध्ये हा प्रकार घडला होता. समाजात चांगला संदेश जावा यासाठी न्यायालयाने त्यांना अधिकाधिक शिक्षा देण्याची मागणी अॅड. कोंघे यांनी केली. न्यायालयाने सरकार पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरत शिक्षा सुनावली. दंडाची रक्कम न भरल्यास अतिरिक्त कारावास भोगावा लागेल, असे निकालात नमूद केले

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## पालिकेचे वसतिगृह अस्वच्छतेचा अड्डा

### गरीब दोन विद्यार्थ्यांचा बळी

**पुणे :** घोले रोडवरील आंबेडकर वसतिगृहात तब्बल १०० विद्यार्थी राहतात. दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू वसतिगृह प्रशासनाचा हलगर्जीपणा, बेजबाबदारपणा, अस्वछतेमुळे झाला आहे. तक्रारी केल्या की वसतिगृहातील अधिकारी, कर्मचारी मस्तवाल, उद्धटपणे विद्यार्थ्यांशी वागत अशा तक्रारी विद्यार्थ्यांनी केल्या आहेत. महापालिकेच्या घोले रोडवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहातील दोन विद्यार्थ्यांचा डेंग्यू, काविळीने अकाली मृत्यू झाला आहे. अस्वच्छतेकडे वारंवार तक्रारी करूनही पालिका प्रशासनाने लक्ष दिले नसल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचा आरोप विद्यार्थी संघटना करत आहेत.त्यामुळे मयत विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी १० लाखांची आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे. त्यानंतर विद्यार्थी संघटनांकडून महापालिका प्रशासनाला धारेवर धरण्यात आले. महापालिकेकडून वसतिगृहाची पाहणी केल्यानंतर तात्पुरती डागडुजी करण्यात येत आहे.

- वसतिगृहात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता आहे.
- इमारतीमध्ये प्रचंड पाणी गळती असून ते कधीही कोसळू शकते. साठलेल्या पाण्यामध्ये प्रचंड प्रमाणात डास झालेले आहेत.
- पिण्याचे स्वच्छ पाणी विद्यार्थ्यांना मिळत नाही. पिण्याच्या पाण्याच्या टाकीमध्ये आळ्या झाल्याचा किळसवाणा प्रकारही समोर आला आहे.
- वापरण्याच्या पाण्याच्या टाक्यांमध्येही आळ्या झाल्या असल्याचे विद्यार्थी सांगत आहेत. वसतिगृहातील खोल्यांची व वॉशरूमची स्वच्छता नीट होत नाही.
- अनेक तक्रारीही पुणे महापालिका प्रशासनाने कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला.

> दोन्ही विद्यार्थ्यांच्या मृत्यूची घटना दुःखदायक आहे. ग्रामीण भागातून शिकायला येणाऱ्या व वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अडीअडचणीकडे, सोयीसुविधाकडे महापालिका प्रशासनाचे लक्ष्य नाही ही गंभीर बाब आहे..
> - कृष्णा साठे, एनएसयूआयचे महासचिव

## रक्तदान श्रेष्ठदान ..

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**सामाजिक बांधिलकी :** कौशिक आश्रम आणि अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात मुसळधार पाऊस सुरू असताना रक्तदात्यांनी शिबिरात येऊन आपले रक्तदानाचे पवित्र कर्तव्य निभावले.

## कौशिक आश्रम'च्या शिबिरात

# ५२६ रक्तदात्यांचे उत्स्फूर्त रक्तदान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कौशिक आश्रम आणि अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात ५२६ जणांनी उत्स्फूर्त रक्तदान केले. पुण्यात चार ठिकाणी ही शिबिरे आयोजित करण्यात आली होती. पुण्यात मुसळधार पाऊस सुरू असताना रक्तदात्यांनी शिबिरात येऊन आपले रक्तदानाचे पवित्र कर्तव्य निभावले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्व सरसंघचालक रज्जूभैया यांच्या स्मृतीप्रित्यर्थ कौशिक आश्रम आणि अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पर्वती, सिंहगड, कात्रज आणि कसबा या भागांच्या मदतीने चार शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. त्यासाठी जनकल्याण रक्तकेंद्र पुणे आणि नगर तसेच सोलापूर येथील डॉ. हेडगेवार रक्त केंद्रांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले.

कसबा भागाच्या शिबिरात डॉ. प्रशांत बोधे, बोरा फुड्सचे संचालक सतीश बोरा आणि अभिनेते रमेश परदेशी यांची प्रमुख उपस्थिती होती. पर्वती भागाच्या शिबिरात डॉ. सचिन केदार, तर कात्रज भागाच्या शिबिरात प्रसिद्ध उद्योजक ब्रिजेशभाई पटेल आणि भाग्योदय ग्रुपचे संचालक विक्रांतजी सेटिया यांची प्रमुख उपस्थिती होती.

### रक्त संकलन मोलाचे काम

- सततचा पाऊस, त्यामुळे पुण्यातील रुग्णांची वाढलेली संख्या आणि त्यासाठी वाढलेली रक्ताची मागणी या पार्श्वभूमीवर रक्त संकलन वाढत नव्हते. या पार्श्वभूमीवर ही शिबिरे झाल्यामुळे त्यात झालेले रक्त संकलन निश्चितच मोलाचे आहे.

## बारा ऑगस्टपर्यंत नियम लागू

# ३० रस्त्यांवर जड वाहनांना बंदी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे शहर वाहतूक पोलिसांनी रविवारी एक अधिसूचना जाहीर करून शहरातील ३० प्रमुख ठिकाणी सकाळी ९ ते रात्री १० पर्यंत अवजड वाहनांवर बंदी लागू केली आहे. या निर्णयामुळे शहरातील गंभीर वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण उपाययोजना करण्यात आली आहे. १२ ऑगस्टपर्यंत पुणे शहरातील ३० प्रमुख वाहतूक चौक आणि ठिकाणी अवजड वाहनांवर बंदी लागू केली जाणार आहे. या निर्णयामुळे शहरातील वाहतूक समस्या काही प्रमाणात सोडविण्यात येणार आहे.

शहरातील रस्त्यांवरील खड्डे आणि त्यांचा अपुरी दुरुस्तीमुळे वाहतूक कोंडी वाढली आहे. त्यामुळे शहरातील वाहतूक समस्येत वाढ झालेली आहे. हा बंदीचा नियम अवजड वाहनांसाठी असला तरी आपत्कालीन सेवांमध्ये सहभागी वाहनांना या नियमातून सूट देण्यात आली आहे.

रविवारी रात्री डीसीपी ट्रॅफिक रोहिदास पवार यांनी जाहीर केलेल्या अधिसूचनेत हे स्पष्ट केले आहे की, सततच्या पावसामुळे रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत.

या बंदीचा नियम ट्रक, डंम्पर, कंनटेनर मिक्सर आणि इतर अवजड वाहनांवर लागू होईल. पुण्यातील ३० प्रमुख वाहतूक चौक आणि ठिकाणी सकाळी ९ ते रात्री १० पर्यंत या वाहनांवर बंदी लागू राहील.

### या ठिकाणी ही बंदी

- संचेती चौक, पौड फाटा चौक, राजाराम पूल, दांडेकर पूल, निलायम पूल, सावरकर पुतळा चौक, लक्ष्मी नारायण सिनेमा चौक, सेव्हन लव्हस चौक, पंडोल अपार्टमेंट चौक, खणे मारुती चौक, पावर हाऊस चौक, आरटीओ चौक, पाटील इस्टेट चौक, ब्रेमन चौक, शास्त्रीनगर, आंबेडकर चौक, चंद्रमा चौक, मुंढवा चौक, नोबेल चौक, लुल्लानगर ते गोळीबार मैदान, लुल्ला नगर ते गंगाधाम, पुष्पा मंगल चौक, राजास सोसायटी, पोल्ट्री चौक, उंड्री, पिसोळी, हांडेवाडी, अभिमनाश्रे बाणेर आणि अभिमनाश्री पाषाण.

## सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या एसटीईएस रेसिंग संघाचा

# प्रतिष्ठेचा फॉर्म्युला स्टुडंट रशिया स्पर्धेमध्ये दणदणीत विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या एसटीईएस रेसिंग संघाने नुकतेच रशियातील सेंट पीटर्सबर्ग येथे झालेल्या प्रतिष्ठेच्या फॉर्म्युला स्टुडंट रशिया स्पर्धेत इलेक्ट्रिक वाहन प्रकारात एकूण द्वितीय क्रमांक मिळवून इतिहास रचला. कर्णधार निरज गोर्नाळे यांच्या नेतृत्वाखालील संघाने १६ देशांशी स्पर्धा केली आणि अनेक स्पर्धांमध्ये सर्वोच्च सन्मान मिळवला.

संघाच्या प्रभावी कामगिरीमुळे त्यांना एकूणच पूर्व-इव्हेंट तयारी पुरस्काराव्यतिरिक्त कॉस्ट इव्हेंट, बिझनेस प्रेझेंटेशन इव्हेंट आणि डिझाइन इव्हेंटमध्ये दुसरे स्थान मिळाले. ही उल्लेखनीय कामगिरी संघाचे अपवादात्मक कौशल्य, समर्पण आणि नाविन्यपूर्ण भावना दर्शवते. प्राचार्य डॉ.एस.डी. लोखंडे आणि डॉ.वाय.पी. रेड्डी यांनी संघाच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल अभिनंदन केले. अध्यक्ष एम.एन. नवले, सचिव डॉ. सुनंदा एम. नवले, उपाध्यक्ष (प्रशासन) डॉ. रचना नवले आष्टेकर आणि उपाध्यक्ष (एचआर) डॉ. रोहित एम. नवले यांनीही त्यांचे अभिनंदन केले.

संघ सल्लागार डॉ. धनंजय खंकाळ यांनी संघाला यश मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली त्याच बरोबर डॉ. ए.पी. पांढरे, प्रा. एस.बी. धोत्रे यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व STES रेसिंग टीमच्या कामगिरीने संस्थेला गौरव प्राप्त झाला आहे आणि इलेक्ट्रिक वाहन तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताला जागतिक नकाशावर आणले आहे.

## अभिनेत्री मृणाल कुलकर्णी, संगीतकार शौनक अभिषेकी यांचा गौरव

# मंडई म्हसोबा ट्रस्टचे भूषण पुरस्कार प्रदान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** स्वर व लयीने कलाकाराची एकाग्रता सिद्ध होते. संगीताने चित्त स्थिर आणि त्यातून चित्तवृत्ती स्थिर होते. चित्तवृत्ती स्थिर होऊन समाजातील गुन्हे कमी होण्यास सहाय्य मिळेल. गायन, वादन, नृत्य हे संगीताशी निगडीत विविध प्रकार आहेत. त्यामुळे समाजातील गुन्हे कमी होण्याचे संगीत हे प्रमुख माध्यम असल्याचे मत ज्येष्ठ तबलावादक पद्मश्री पं. सुरेश तळवळकर यांनी व्यक्त केले.

अखिल म्हसोबा उत्सव मंडई ट्रस्टतर्फे आयोजित म्हसोबा उत्सवांतर्गत गणेश कला क्रीडा मंच येथे भूषण पुरस्कार प्रदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तबलावादक पद्मश्री पं. विजय घाटे, आ. माधुरी मिसाळ, खारवडे देवस्थानच्या अध्यक्षा मधुरा भेलके-मारणे, उद्योजक अभय लुणावत आदी उपस्थित होते. वेंकीज उद्योग समूहाचे संचालक बालाजी राव आणि माणिकचंद उद्योग समूहाचे चेअरमन प्रकाश धारीवाल यांचे उत्सवाला विशेष मार्गदर्शन मिळाले आहे.

यंदाचा व्यापार भूषण पुरस्कार उद्योग भूषण पुरस्कार आर. के.लुंकड हौसिंग कॉर्पोरेशनचे संचालक रमनशेठ लुंकड, कला भूषण पुरस्कार अभिनेत्री मृणाल कुलकर्णी, संगीत भूषण पुरस्कार प्रख्यात संगीतकार व गायक शौनक अभिषेकी, धार्मिक भूषण पुरस्कार श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी आळंदीचे विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे आणि पत्रकारिता भूषण पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार सम्राट फडणीस यांना प्रदान करण्यात आला. डॉ. भावार्थ देखणे, सम्राट फडणीस यांचा पुरस्कार त्यांच्यातर्फे आलेल्या प्रतिनिधींनी स्विकारला. याशिवाय ज्येष्ठ अभिनेत्री सुरेखा कुडची व पोलीस गणेश गाडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, महावस्त्र, फळांची परडी असे पुरस्काराचे स्वरुप होते.

#रा

## दीप अमावस्येनिमित्त मंडई म्हसोबा मंदिरात १९०० दिव्यांचा दीपोत्सव

**पुणे :** अखिल म्हसोबा उत्सव मंडई ट्रस्ट च्या वतीने मंडईतील बुरुड आळीत आयोजित म्हसोबा उत्सवात दीप अमावस्येनिमित्त १९०० दिव्यांचा दीपोत्सव साजरा करण्यात आला. फिरत्या रंगीबेरंगी दिव्यांची व फुलांची आकर्षक आरास यानिमित्ताने मंदिराला करण्यात आली होती. तसेच १९०० दिवे यावेळी प्रज्वलित करण्यात आले. प.पू. कालीपूत्र कालीचरण महाराज यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी अंकुश काकडे, बाळासाहेब दाभेकर, विश्राम देव, ट्रस्टचे विश्वस्त अध्यक्ष राहुल सूर्यवंशी, विश्वस्त उपाध्यक्ष निवृत्ती जाधव यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. वेंकीज उद्योग समूहाचे संचालक बालाजी राव आणि माणिकचंद उद्योग समूहाचे चेअरमन प्रकाश धारीवाल यांचे उत्सवाला विशेष मार्गदर्शन मिळाले आहे.

कालीचरण महाराज यांचे पाद्यपूजन करून ट्रस्टतर्फे सन्मानचिन्ह व महावस्त्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. रंगीबेरंगी फिरत्या दिव्यांचे मनोहारी दृश्य मोबाईलमध्ये कैद करण्याकरिता देखील भाविकांनी मोठी गर्दी केली



# समाविष्ट गावात गार्डन, हॉस्पिटल, नाट्यगृह, मंडई, मैदानांची वानवा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेत समाविष्ट झालेल्या गावांत गार्डन, हॉस्पिटल, नाट्यगृह, मंडई, मैदानांची वणवा आहे. आपल्या जागेवर वरील आरक्षण टाकण्याच्या आधीच मोठ्या प्रमाणात बांधकामे करण्यात येत आहे. आणि स्वस्त किमतीत घर म्हणून विक्री केली जात आहेत. नागरिक सुध्दा स्वस्तात महापालिका हद्दीत घरे उपलब्ध असल्याने खरेदी करीत आहे.



पुणे महापालिका आता एकूण ३३१.२६ चौरस किलोमीटर क्षेत्रावर नियंत्रण ठेवते. विलीन झालेल्या गावांमध्ये उरुळी देवाची, फुरसुंगी, बावधन बुद्रुक, लोहेगाव (उर्वरित), हडपसर (साडेसत्रा नळी), मुंढवा (केशवनगर परिसर), शिवणे (उर्वरित), धायरी (उर्वरित), उंड्री, आंबेगाव खुर्द आणि आंबेगाव बुद्रुक यांचा समावेश आहे.

समाविष्ट गावांत २४ तास स्वच्छ पाणीपुरवठा करण्याची मागणी करण्यात येत आहे. कचरा नियमितपणे उचलण्यात यावा. ज्या प्रकारे टॅक्स करण्यात येतो. त्या प्रमाणात सोयीसुविधा देण्याची मागणी करण्यात येत आहे. सामान्य नागरिकांना शहरात राहणे परवडत नाही. त्यामुळे महापालिका हद्दीतील ग्रामपंचायत परिसरात भाड्याने राहायला पसंती देतात. १ बीएचकेला ८ हजार रुपये, १ आरकेला ६ हजार रुपये असे साधारण भाडे आकारण्यात येते. कात्रज, हडपसर, येरवडा, वाघोली, नगररोड, वारजे - माळवाडी, कोंढवे धावडे, सिंहगड रोड, धायरी परिसरात वास्तव्याला प्राधान्य देण्यात येत आहे. 'पीएमपीएमएल' गावांपर्यंत जात असल्याने सामान्यांना दिलासा मिळत आहे.

### गावांमध्ये बकालपणा वाढण्याची शक्यता

● समाविष्ट गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर टॅक्स आकारण्यात येते. मात्र, त्या प्रमाणात आवश्यक सोयीसुविधा मिळत नसल्याची गावकऱ्यांची ओरड आहे. गांवात ज्या जागेवर आरक्षण आहे, त्या जागा तातडीने ताब्यात घेण्याची गरज आहे. अन्यथा गावांमध्ये बकालपणा वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. पुणे जिल्हा परिषदेत ही गावे असताना सदस्य विकास निधी आणण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करत होते. आता मात्र हे सदस्य माजी झाले आहेत. त्यामुळे त्यांची सर्व जबाबदारी आता पालकमंत्री अजित पवार यांच्यावरच आहे.

## रस्त्यांवरील खड्ड्यांवरून खा.मोहोळ आणि प्रशासन आमनेसामने

**पुणे :** मागील ८ ते १० दिवसांपासून सुरू असलेल्या दमदार पावसामुळे पुण्यातील रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. त्यावरून केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी प्रशासनाला चांगलेच सुनावले. त्यानंतर रस्त्यावरील खड्डे बुजवायला प्रशासनाने लक्ष घातले आहे.

या रस्त्यांवरील खड्यात पाणी साचल्याने किरकोळ अपघातात वाढ झाली आहे. शिवाजीनगर, बाणेर - बालेवाडी - बावधन, हडपसर, कात्रज, स्वारगेट, वारजे - माळवाडी, शिवणे, एनडीए रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. त्यामुळे दूरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्याचे चित्र दिसून येत आहे. सकाळी आणि रात्री या खड्ड्यांचा अंदाज येत नाही. त्यामुळे पोलिसांची दमछाक होत आहे. यामध्ये भरीस भर म्हणून की काय ते रस्त्यावरील सिग्नल यंत्रणाही ठिकठिकाणी बंद पडत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे वाहनचालक मिळेल त्या



जागेतून वाहने हाकताना दिसून येते. शहर आणि उपनगरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली आहेत. ही अतिक्रमणे मुळात काल परवा झालेले नाही.

### वाहनचालकांची शक्कल

● सध्या रस्त्यांवर पाणी साचल्याने निसरडे झाले आहेत. पाण्याचा अंदाज न आल्याने अपघातात वाढ झाली आहे. एनडीए रस्ता तसेच काही ठिकाणी स्वयंसेवी संस्थाचे पदाधिकारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्न करतात. मात्र, जास्त वेळ वाहतुकीत अडकवले जाऊ नये म्हणून मिळेल त्या जागेत वाहने काढण्यात येत आहेत.

वर्षानुवर्षे ही अतिक्रमणे चालू आहेत. शहरातील प्रमुख रस्त्यांच्या कडेला भाजीपाला दुकाने, खमंग पदार्थांची वाहने, फळे, ताजा भाजीपाला रस्त्यांच्या कडेलाच विकला जातो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात रस्ता अडविला जातो. या दुकानासमोर दुचाकीधारक, चारचाकीधारक आपली वाहने उभी करतात. तेथून पायी चालणेही अवघड होते.

## पीएमआरडीएकडून २२५ कुटुंबाचे स्थलांतर

**पुणे :** पीएमआरडीएच्या पथकाने ही नदीकाठच्या नागरिकांना सुरक्षित स्थळे हलवून त्यांचे प्राण वाचवले. पीएमआरडीएच्या पथकाने विश्रांतवाडी शांतीनगर याबरोबरच एकता नगर मधील नागरिकांना सुरक्षित स्थळे हलवले रविवारी सायंकाळी सहा वाजेपर्यंत सव्वा दोनशे कुटुंबांची नजीकच्या शाळा समाज मंदिर येथे तात्पुरत्या निवासाची व्यवस्था केली. तसेच नागरिकांना जेवण, नाश्ता ही पुरविला.

महापालिका प्रशासनाने पुराच्या पार्श्वभूमीवर शहरातील नदीकाठच्या परिसरात राहणाऱ्या सुमारे दीड हजार अधिक लोकांचे स्थलांतर केले. महापालिकेचे योग्य नियोजन व समन्वयामुळे नागरिकांना योग्य वेळेत मदत मिळण्यास मदत झाली.खडकवासला व पवना धरणातून पाण्याचा विसर्ग वाढल्याने रविवारी मुळा मोठा नदीच्या पाणी पातळीत झपाट्याने वाढ झाली. त्यामुळे नदीकाठी असणाऱ्या सोसायट्या,वस्त्यामध्ये रविवारी सकाळपासूनच पाणी शिरण्यासाठी सुरुवात झाली. दरम्यान, महापालिका प्रशासनाने खबरदारी घेत नागरिकांना पुराचे पाणी येणार असल्याची पूर्व सूचना दिली होती. तसेच ठीकठिकाणी महापालिकेचे क्षेत्रीय कार्यालय, अधिकारी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे अधिकारी, कर्मचारी, अग्निशामक दलाचे जवान, पीएमआरडीए पुराचे पाणी शिरणाऱ्या भागात हजर होते. महापालिकेचे आयुक्त डॉ.राजेंद्र भोसले यांच्यासह वरिष्ठ अधिकारी शनिवारी मध्यरात्रीपासूनच पूरस्थिती वरती लक्ष ठेवून होते. याबरोबरच पूरबाधित नागरिकांना मदत करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करत होते.

महापालिका प्रशासनाने एकता नगर, ताडीवाला रोड, मुळा रोड, शांतीनगर झोपडपट्टी, इंदिरानगर झोपडपट्टी, चिमा गार्डन, यशवंत नगरी कळस, साईनाथ नगर वडगाव शेरी, पुलाचीवाडी, पाटील इस्टेट झोपडपट्टी, रजपूत झोपडपट्टी, तपोधाम इंदिरा नगर वसाहत, नारायण पेठ, अमृतेश्वर घाट, मंगळवार पेठ, श्रमिक नगर दत्तवाडी, बोपोडी, बालेवाडी गाव अशा वेगवेगळ्या ठिकाणच्या नागरिकांना दुपारीच बाहेर काढले. पीएमपी बस द्वारे नागरिकांना जवळच्या महापालिकेच्या शाळांमध्ये तात्पुरते निवासासाठी ठेवले. तेथे नागरिकांची जेवण नाश्त्याची व्यवस्था ही केली. महापालिकेने एकूण 387 कुटुंबातील सुमारे दीड हजार नागरिकांना जवळच्या शाळांमध्ये स्थलांतरित केले. अशी माहिती महापालिका आपत्ती व्यवस्थापन निवारण कक्षाचे

## अवतीभवती
CITY UPDATE

### पहिल्याच सोमवारी ओंकारेश्वर मंदिर पाण्याखाली

**पुणे :** गेल्या काही दिवसांपासून राज्यासह पुण्यात दमदार पाऊस झाला आहे. त्यामुळे पुणे जिल्ह्यातील सर्वच धरणे भरलेली आहेत. अशात खडवासला धरणातून मुळा-मुठा नदीत सतत सोडल्या जाणाऱ्या पाण्यामुळे शहरातील नदी पात्रात असलेले ओंकारेश्वर मंदिर पाण्याखील गेले आहे. दरम्यान ओंकारेश्वर मंदिरात पाणी शिरल्याने आज यंदाच्या श्रावण महिन्यातील पहिल्याच दिवशी भाविकांना दर्शनाला मुकावे लागणार आहे. सध्याच्या परिस्थित पुराचे पाणी हे मंदिराच्या गाभाऱ्यापर्यंत पोहचले आहे. त्यामुळे सकाळच्या सत्रात भाविकांना दर्शन घेता येणार नाही. मात्र, जर दुपारपर्यंत पुराचे पाणी ओसरले तर भाविकांना दर्शनासाठी मंदिर खुले केले जाऊ शकते.

### शहरात पुन्हा कोयता गँगची दहशत

**पुणे :** शहरात पुन्हा एकदा कोयता गँगच्या गुंडांनी धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली आहे. ऐन गटारीच्या दिवशीच कोयता गँगच्या टोळक्याने एका वाईन शॉपची तोडफोड केली. शहरातील कॅम्प परिसरात रविवारी साडेआठ वाजेच्या सुमारास ही घटना घडली. या घटनेचा व्हिडीओ समोर आला असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. याकडे पुणे पोलीस आयुक्त याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. परिसरात धुमाकूळ घालणाऱ्या या गुंडांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी देखील नागरिकांनी केली आहे. गेल्या वर्षभरापासून पुण्यात कोयता गँगच्या गुंडांनी धुमाकूळ घातला. लोकसभा निवडणुकीआधी पुणे पोलिसांनी या गुंडावर कारवाईचा बडगा उगारला होता. नागरिकांच्या मनात कमी झालेली दहशत पुन्हा निर्माण करण्याचा कोयता गँगच्या गुंडांचा डाव आहे. यातूनच ते शहरात तोडफोड करत असल्याचे समोर आले.

### पावसामुळे फळभाज्यांकडे पाठ

**पुणे :** पावसामुळे फळभाज्यांची आवक कमी झाली असून ग्राहकांकडून फळभाज्यांना मागणी कमी झाली आहे. टोमॅटो, मिरची, घेवडा, ढोबळी मिरचीच्या दरात घट झाली. अन्य फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी (४ ऑगस्ट) राज्य, तसेच परराज्यातून मिळून ८० ते ९० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेशातून मिळून ८ ते १० टेम्पो हिरवी मिरची, कर्नाटक, गुजरातमधून मिळून प्रत्येकी ३ ते ४ टेम्पो कोबी, कर्नाटकातून पावटा आणि घेवडा प्रत्येकी २ ते ३ टेम्पो, आंध्र प्रदेश, तमिळनाडूतून मिळून ४ ते ५ टेम्पो शेवगा, मध्य प्रदेशातील इंदूर भागातून ८ ते ९ टेम्पो गाजर, मध्य प्रदेशातून ७ ते ८ टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाली, अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.

पद्मश्री डॉ. तात्याराव लहाणे यांची धक्कादायक माहिती

## मोबाईलमुळे पाच टक्के कॅन्सर प्रमाण वाढले

**पुणे :** " पूर्वी नागरिकांच्या अन्न, वस्र,निवारा या गरजा होत्या आता त्या बरोबरच मोबाईल फोन ही मोठी गरज झाली आहे. अन्न, वस्त्र नाही दिले तरी चालेल अशी परिस्थिती सध्या समाजात झाली आहे. एखांद्या गेममध्ये काम दिलं जातं आणि माणूस चौदाव्या मजल्यावरू उडी टाकतो. आपण सगळे या छोट्याशा बॉक्समुळे वेडे झालो आहोत. मोबाईल जास्त वेळ वापल्यावर आपला कान दुखतो तरी आपण तो कानालाच लावून धरतो. सध्या वैज्ञानिकांनी शोध लावला आहे की, पाच टक्के मेदूचे कॅन्सर हे मोबाईलमुले झाले आहेत. अशी धक्कादायक माहिती पद्मश्री डॉ. तात्याराव लहाणे यांनी प्रसंगी दिली.



'सोमेश्वर फाऊंडेशन' तर्फे आयोजित कार्यसम्राट मोफत महा-आरोग्य शिबीराचे उदघाटन रविरवारी सकाळी, शासकीय कृषी महाविद्यालय मैदान, सिंचन नगर, शिवाजीनगर या ठिकाणी झाले, यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पद्मश्री डॉ. तात्याराव लहाणे बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले, नागरिकांनी मोबाईलचा वापर कमी केला पाहिजे असा मोलाचा सल्ला देखील त्यांनी दिला, तसेच आरोग्य विषयी काळजी कशी घेतली पाहिजे याचे मार्गदर्शन केले.

यावेळी आमदार सत्यजित तांबे, माजी मंत्री सुरेश नवले, माजी आमदार शाम सावंत, माजी आमदार सुभाष बणे, माजी महापौर दत्ता गायकवाड, माजी उपमहापौर मुकारी अलगुडे, मुख्यमंत्री वैधकीय सहाय्यता निधी कक्ष प्रमुख मंगेश चिवटे, निरामय सेवा फाऊंडेशनचे रामेश्वर नाईक, महापालिका अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज. बी, महापालिका उपायुक्त महेश पाटील, पोलिस अधीक्षक, पुणे ग्रमिण पंकज देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

धो -धो पाऊस असला तरी ३६ ठिकाणाहून बसेस येत आहेत, त्या बसमधून रूग्ण येत आहेत. सोळा स्पेशालिटी, आठ सुपर स्पेशालिटी रूग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टर या ठिकाणी सर्वसामान्य रूग्णांना तपासत आहेत. रूग्णांची तपासणी, नाव नोंदणी केली जात आहे. त्यानंतर त्यांच्या शस्त्रक्रिया केल्या जात आहेत. पावसातही रूग्णांची तपासणी, प्रथमोपचार करणे, त्यांना घरून घेऊन येणे, पुन्हा घरी सोडणे ही अतिशय चांगली गोष्ट आहे. या आरोग्याविषयी कामासाठी सनी निम्हण यांचे अभिनंदन करतो, सनी निम्हण यांनी विनायकरावांच्या पावलावर पाऊल ठेवत आता आमदार पदावर जायला काही हरकत नाही."

— पद्मश्री डॉ. तात्याराव लहाणे

**समाजातील गरिबांसाठी शिबीर वरदान -** अतिशय सुंदर उपक्रम कसा राबवावा हे विनायकशेठ यांच्याकडूनच सगळे शिकले आहेत, सनीचं कौतूक यासाठी की, तो हा उपक्रम तितक्याच ताकदीने पुढे घेऊन जातोय. पुण्यामध्ये बोललं जायचं की, उपक्रम कसा असावा? तर विनायकशेठ यांनी घेतल्यासारखा पाहिजे. समाजातील दिन दुबळे , गरीब वर्गासाठी शिबीर वरदान ठरत आहे. सनीने नगरसेवक असताना चांगले काम केले आहे. आता एक पाऊल पुढे टाकून काम केले पाहिजे."— प्रविण तरडे, अभिनेते

## विद्यापीठाच्या कुलसचिवपदाची निवड पारदर्शक व्हावी : कल्पेश यादव यांची मागणी

**पुणे :** विद्यापीठात कुलसचिव या पदाच्या निवडीवरून गेल्या काही दिवसांपासून विद्यापीठाकडे वेगवेगळ्या पद्धतीने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलसचिव पदाची निवड पारदर्शक पद्धतीने व्हावी. कोणताही आरोप नसलेल्या व्यक्तीची निवड करून नाव जाहीर करावे, अशी मागणी युवासेनेचे सहसचिव कल्पेश यादव यांनी केली. याविषयी त्यांनी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांना निवेदनाद्वारे दिले आहे.

यादव पुढे म्हणाले की, "सबळ पुरावे देऊन सुद्धा विद्यापीठाने काही व्यक्तींच्या दबावाखाली येऊन वादग्रस्त व्यक्तीचीच निवड कशी होईल, या दृष्टीने सतत पावले टाकली आहेत. ही अत्यंत खेदजनक बाब आहे. विद्यापीठाने माजी न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून तक्रारदारांची सुनावणी घेतली. या सुनावणीला उपस्थित राहून आम्ही आमच्याकडे असणारी सर्व कागदपत्रे न्यायाधीशांना सादर केली. वादग्रस्त व्यक्तीसाठी समिती स्थापन करून विद्यापीठाने केलेला खटाटोप शंकास्पद होता. नियुक्त केल्या जाणाऱ्या व्यक्तीला त्यांच्याच संस्थेने निलंबित केले आहे. आता अशा व्यक्तीची निवड होणार का, याचा खुलासा विद्यापीठाने तत्काळ करावा."

आतापर्यंत प्रत्यारोपणाच्या १६ रुग्णांना जीवनदान

## ससूनमध्ये किडनी प्रत्यारोपणाची यशस्वीरित्या शस्त्रक्रिया

**पुणे :** दौंड तालुक्यातील १३ वर्षीय मुलगी किडनी आजाराने ग्रस्त असल्याने डायलिसीस सुरू होते. अनेक महिन्यांपासून ती किडनीच्या प्रतीक्षेत होती. मेंदूमृत १३ वर्षीय तरुणाच्या अवयवदानामुळे पुण्यातील किडनी आजाराने ग्रस्त असलेल्या मुलीवर किडनी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वी पार पडली. ससून रुग्णालयात ही शस्त्रक्रिया झाली.

● ससून रुग्णालयामध्ये कमीत कमी खर्चात किडनी ट्रान्सप्लांट शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या करण्यात येत आहेत. सन २०१६ मध्ये प्रथमता कॅडेव्हर किडनी ट्रान्सप्लांट करण्यात आले. तेव्हापासून आजपर्यंत १५ रुग्णांवर कॅडेव्हर टू लाइव्ह किडनी ट्रान्सप्लांट शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या करण्यात आलेल्या आहेत, तसेच लाइव्ह टू लाइव्ह शस्त्रक्रिया प्रथमत: सन २०१८ मध्ये करण्यात आली आहे. त्यानंतर किडनी प्रत्यारोपणाच्या १६ रुग्णांवर शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडण्यात आल्या आहेत, असे ससूनचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार यांनी सांगितले.


दरम्यान, सोलापूर जिल्ह्यात रक्तस्राव झाल्याने मेंदूमृत (ब्रेनडेड) मुलाच्या नातेवाइकांनी अवयवदानाला संमती दिल्यावर त्यातील एक किडनी ससून रुग्णालयात पाठविण्यात आली. त्यासाठी मूत्ररोग शल्यचिकीत्सा तज्ज्ञ डॉ. राजेश श्रोत्री, तज्ञ डॉ. सुरेश पाटणकर, डॉ. हर्षद तोष्णीवाल, डॉ. विवेक बारेकर, नेफ्रोलॉजिस्ट डॉ. संदीप मोरखंडीकर, डॉ. एन. सी. अंबेकर,व्हॅस्क्युलर सर्जन डॉ. दानिश कामीरकर, शल्यचिकीत्सक डॉ. अनंत बीडकर, भूलतज्ञ डॉ. संयोगिता नाईक, भूलतज्ञ डॉ. विजय पाटील आणि डॉ.सुजित क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वी झाली. किडनी प्रत्यारोपण यशस्वी होण्यासाठी समन्वयक म्हणून सत्यवान सुरवसे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# नक्षलवादाला प्रत्युत्तर देताना...

वर्षानुवर्षांपासून नक्षलवाद हा अंतर्गत सुरक्षेसाठी धोका आणि आव्हान बनून राहिलेला आहे. १९६० पासून अनेक पिढ्या यामुळे नष्ट झाल्या आहेत. अलीकडील काळात सरकार आणि सुरक्षा दलांना रेड कॉरिडॉर मर्यादित करण्यात बऱ्यापैकी यश मिळाले आहे. त्यामुळे नक्षलवाद कमी होताना दिसत असला तरीही तो पूर्णपणे नामशेष होण्याच्या मार्गावर आहे असे म्हणता येणार नाही. याआधी भारतात पशुपतीनाथ (नेपाळ) ते तिरुपतीपर्यंत रेड कॉरिडॉरची स्थापना झाल्याचे सांगण्यात आले होते. गेल्या काही वर्षांत राज्य सरकारांच्या धोरणांमुळे अनेक नक्षलवादी आत्मसमर्पण करून समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील झाले आहेत. नक्षलवाद्यांचे शीर्षस्थ कमांडर एक तर मारले गेले आहेत किंवा त्यांनी शस्त्रे खाली टाकून समर्पण केले आहे. मात्र अजूनही जे हिंसेचा मार्ग सोडण्यास तयार नाहीत त्यांच्या विरोधात सुरक्षा दल कारवाई करत आहेत. अलीकडेच, महाराष्ट्रातील नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यात ६ तास चाललेल्या चकमकीत सुरक्षा दलांनी १२ नक्षलवादी ठार केले. छत्तीसगड सीमेच्या अगदी जवळ असलेल्या वंडोली गावात ही चकमक झाली. मारल्या गेलेल्या नक्षलवाद्यांमध्ये लाखो रुपयांचे बक्षीस असलेल्या नक्षलवादी नेत्यांचाही समावेश आहे. दरम्यान, छत्तीसगडमधील बिजापूरमध्ये नक्षलवाद्यांनी केलेल्या आरडीएक्सच्या स्फोटात दोन जवान शहीद झाले. नक्षलवादी निवडकपणे मारले जात असतानाही ते सुरक्षा जवानांना लक्ष्य करण्यापासून मागे हटत नाहीयेत. महाराष्ट्र आणि छत्तीसगडच्या जंगली भागामध्ये आजही नक्षलवाद्यांचे वर्चस्व आहे. जेव्हा-जेव्हा नक्षलवादी कमकुवत होतात तेव्हा ते आपले क्षेत्र सोडून पसार होतात. या काळात ते आपली ताकद वाढवतात आणि संधी मिळताच घात करत जबरी हल्ला करतात. यंदाच्या लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यापूर्वी, छत्तीसगडमधील कांकेर जिल्ह्यात सुरक्षा दलांनी चकमकीत २९ नक्षलवादी ठार केले. छत्तीसगडच्या डाव्या अतिरेकाविरुद्धच्या लढाईच्या इतिहासातील ही सर्वात मोठी चकमक होती. ६० आणि ७० च्या दशकात देशाची दशा आणि दिशा ठरवणाऱ्या नक्षलवादी चळवळीबाबत भेदक कवी सुदामा प्रसाद धुमिल यांनी म्हटले होते की, नक्षलवाडी हे भुकेने घट्ट बांधलेल्या मुठीचे नाव आहे, पण नक्षलवाद्यांनी धुमिलचे हे पाऊल मान्य केले नाही. आदिवासींना जल, जंगल आणि जमिनीवर हक्क मिळवून देण्यासाठी नक्षलवादी चळवळ सुरू झाली, पण आता ही चळवळ पूर्णपणे भरकटली आहे. सशस्त्र क्रांतीच्या माध्यमातून उच्चवर्गीयांचे अन्यायकारक अत्याचारी वर्चस्व संपवण्यासाठी निघालेली नक्षलवादी चळवळ आपली वाट चुकली आहे. आजघडीला खाण माफिया आणि भांडवलदार कंपन्यांकडून कर वसूल करून समांतर सरकार चालवण्याच्या जंगलात नक्षलवाद भटकला आहे. नक्षल्यांची राजधानी आता जनता नाही तर दहशत आणि क्रूरता बनली आहे. नक्षलबारी चळवळीचे संस्थापक कनू सन्याल, जे अनेक वर्षानंतर निष्क्रियतेच्या गर्तेतून बाहेर आले, त्यांचा भूतकाळ अत्यंत दु:खाने आणि नैराश्याने भरलेला होता. तो आठवत असताना, २००४ मध्ये त्यांनी कबूल केले - जेव्हा आम्ही बंदुकीच्या जोरावर दहशत पसरवत होतो, तेव्हा लोक आम्हाला साथ देत असत. पण दहशतवाद वाटेत हरवून जाणे आमच्यासाठी घातक ठरले. आज ते बंदुकीच्या जोरावर जनतेसोबत असल्याचा दावा करत आहेत, उद्या आणखी काही बंदूकधारीही असाच दावा करू शकतात. सशस्त्र टोळ्यांच्या बळावर क्रांतीचा दावा केला जात असेल, तर चंदन तस्कर आणि इतर दरोडेखोरांना सर्वात मोठे क्रांतिकारक घोषित केले पाहिजे. भीती आणि दहशतीवर आधारित संघटना जास्त काळ टिकू शकत नाही. बंदुकीच्या धाकावर काही लोकांना धमकावणे आणि तुमच्यासोबत असल्याचा दावा करताना प्रत्यक्षात जनतेशी प्रतारणा करणे हा द्रोह आहे. जनता त्यांच्यासोबत असेल तर ते जमीन सुधारणांसारख्या चळवळी का करत नाहीत, हा प्रश्न अनाठायी म्हणता येणार नाही. आजच्या नक्षलवादाने निव्वळ दहशतवादाचे रूप घेतले आहे. त्यांच्या छायेखाली उद्योगपती, व्यापारी, कंत्राटदार, कमिशन अधिकारी सगळे सुरक्षित आहेत. ते कधीही नक्षलवाद्यांच्या गोळ्यांनी मरत नाहीत. जेव्हा ते त्यांच्या गोळ्यांचे लक्ष्य बनतात, तेव्हा सुरक्षा दल घनदाट जंगलात आणि गुंतागुंतीच्या टेकड्यांमध्ये त्यांच्याशी लढण्यासाठी बाहेर पडतात. आता प्रश्न असा आहे की नक्षलवाद्यांना मदत मिळते कुठून? त्यांच्याकडे आधुनिक शस्त्रे कुठून येतात? याचाच अर्थ नक्षलवाद्यांना परकीय शक्तींची मदत होत असून स्थानिक लोकही त्यांना मदत करत आहेत. २०१४ ते २४ या १० वर्षात नक्षलवादी घटनांमध्ये ७२ टक्के घट झाली आहे. या कालावधीत सुरक्षा दलाच्या ४८५ जवानांना प्राण गमवावे लागले आणि नागरिकांच्या मृत्यूची संख्याही ६८ टक्क्यांनी घटून १३८३ झाली. नरेंद्र मोदी सरकारने नक्षलवादाच्या विरोधात शून्य सहनशीलतेचे धोरण स्वीकारले आहे. नक्षलवादी हिंसाचार केवळ बंदुकीच्या जोरावर नियंत्रित केला गेला नाही तर बहुआयामी रणनीतीमुळे तो नियंत्रणात आला आहे. छत्तीसगड, महाराष्ट्र, झारखंड, ओडिशा, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडूच्या सरकारांनीही नक्षलवादाचा समूळ उच्चाटन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मात्र, मोदी सरकारने डाव्या दहशतवाद्यांना हिंसाचार सोडून चर्चेसाठी पुढे येण्याचा प्रस्ताव दिला आहे. त्यांच्यासाठी, केंद्राने अनेक विकास प्रकल्प सुरू केले आहेत. यात डाव्या विचारसरणीच्या अतिरेकी प्रभावित भागात १७,६०० किमीचे रस्ते मंजूर केले आहेत. संरक्षणात्मक पायाभूत सुविधा वाढवण्यासाठी विशेष निधी देण्यात आला आहे. या विषयांतर्गत सुमारे ९७१ कोटी रुपयांच्या प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पांमध्ये २५० तटबंदी असलेल्या पोलीस ठाण्यांची स्थापना करणे देखील समाविष्ट आहे. नक्षलवाद संपवण्यासाठी आणखी बरेच काही करायचे आहे. योग्य रणनीतीसह सतत हल्ला करणे देखील आवश्यक आहे. सामाजिक संस्था आणि सरकारने आदिवासी भागात जाऊन जनजागृती करणेही महत्त्वाचे आहे.

अलीकडेच आंध्र प्रदेशातील नंदियाल येथे १३ ते १७ वर्षे वयोगटातील तीन अल्पवयीन मुलांनी आठ वर्षांच्या मुलीवर सामूहिक बलात्कार करून तिची हत्या करून तिचा मृतदेह कालव्यात फेकल्याची घटना समोर आली आहे. उत्तर प्रदेशातील बलिया येथेही एका १३ वर्षांच्या मुलाने आठ वर्षांच्या मुलीवर बलात्कार केल्याची घटना समोर आली आहे. सकाळी वृत्तपत्रांची पाने उलटली की अशा बातम्या सर्रास वाचायला मिळताहेत.बालमानसशास्त्र असे सांगते की, बालवयात थ्रीलकडे ओढा अधिक असतो. यातूनच मुले वाईट गोष्टींकडे लवकर आकर्षित होतात. मग त्यांना यापासून रोखण्याची जबाबदारी पालक म्हणून आपण पार पाडायला नको का?

# बालपण गुन्हेगारीकडे का झुकतंय?



संलिकडच्या वर्षांत, किशोरवयीन मुलांचे गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी होण्याचे प्रमाण लक्षणीयरित्या वाढले असून ही बाब सामाजिक दृष्ट्या अत्यंत चिंतेची आहे. या घटनांमुळे आपल्याला वारंवार प्रश्न पडतो की या गुन्ह्यांना आपल्या संगोपन, कौटुंबिक आणि सामाजिक वातावरणातील उणिवा जबाबदार ठरत आहेत का? अशी कोणती परिस्थिती आहे जी पौगंडावस्थेत मुलांना गुन्हे करण्यास प्रवृत्त करत आहे? मुले लहान वयात गुन्हेगार का बनत आहेत? मोठी महानगरे असोत किंवा छोटी शहरे असोत किंवा ग्रामीण भाग असो, अल्पवयीन मुले बलात्कार, खुनाचा प्रयत्न, दरोडा, छेडछाड आणि विनयभंगाच्या घटनांमध्ये सातत्याने अडकताना दिसत आहेत.

अलीकडेच आंध्र प्रदेशातील नंदियाल येथे १३ ते १७ वर्षे वयोगटातील तीन अल्पवयीन मुलांनी आठ वर्षांच्या मुलीवर सामूहिक बलात्कार करून तिची हत्या करून तिचा मृतदेह कालव्यात फेकल्याची घटना समोर आली आहे. उत्तर प्रदेशातील बलिया येथेही एका १३ वर्षांच्या मुलाने आठ वर्षांच्या मुलीवर बलात्कार केल्याची घटना समोर आली आहे. सकाळी वृत्तपत्रांची पाने उलटली की अशा बातम्या सर्रास वाचायला मिळताहेत. त्या वाचून प्रत्येकजण विचार करू लागतो की आपला समाज कुठे चालला आहे? वस्तुत: याची कारणे शोधली तर सर्वात मोठे संकट म्हणजे नैतिक मूल्ये नष्ट होणे हे असल्याचे दिसून येते.

लहान मुले म्हणजे मातीचा गोळा असतात. त्यांना घडवण्याचे काम आई-वडिल करतात. कुंभार ज्या पद्धतीने चिकण मातीला जो आकार देतो, त्यानुसार ती माती घडत जाते. त्यामुळे त्या मातीच्या भांड्याची सर्व जबाबदारी कुंभाराची असते. त्यानुसार मुलांकडून घडणाऱ्या गुन्ह्यांची पहिली जबाबदारी ही मातापित्यांची आहे. जागतिकीकरणानंतरच्या काळात समाजात झपाट्याने बदल होत गेले आहेत. आता संयुक्त कुटुंबे अस्तित्वात नाहीत, असे वातावरण निर्माण झाले आहे. आजी-आजोबा, काका-काकू आणि इतर नात्यांचे महत्त्व उरले नाहीये. पण याचा दुष्परिणाम म्हणजे बहुतेक कुटुंबे स्वतःच्या मुलांवर नियंत्रण ठेवून त्यांना सुसंस्कृत बनवण्यात अपयशी ठरत आहेत. प्रत्येकजण पैसे कमावण्याच्या शर्यतीत इतका व्यस्त झाला आहे की निरागस बालपणाला योग्य वेळ देता येत नाही. त्यामुळे आज मुलांच्या वैयक्तिक स्वातंत्र्यात प्रचंड वाढ झाली आहे.

» शुभांगी कुलकर्णी, समाजशास्त्राच्या अभ्यासक

त्याचबरोबरीने काही मुलांमध्ये नैतिक मूल्यांचा झपाट्याने ऱ्हास होऊ लागला आहे.

दुसरीकडे, अतिस्पर्धेमुळे किशोरवयीन मुलांमध्ये तणाव निर्माण झाला आहे. आज अत्यंत सहजतेने मुलांना मोबाईल फोन, कॉम्प्युटर आणि इंटरनेट उपलब्ध होत आहे. परिणामी, त्यांना कुटुंब आणि समाजापासून वेगळे करून एकटेपणात जगायला शिकवले जात आहे. याचा परिणाम म्हणजे मुले अधिकाधिक स्वैराचारी आणि नैराश्यग्रस्त होताहेत. तसेच गुन्हेगारीमध्ये अडकत आहेत.

शाळेतून आल्यानंतर मूल इंटरनेट, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आणि ओटीटीवर काय पाहते आणि शिकते? हे पाहण्यासाठी पालकांना वेळ नसणे यापेक्षा दुर्दैवी बाब कोणती असू शकते? आज इंटरनेट आणि ओटीटीवर ज्या प्रकारचा वायलेट कंटेंट दिला जातो त्याचा मुलांच्या मनावर मानसिक परिणाम होण्याचा धोका सर्वाधिक असतो. कोणतेही मूल गुन्हेगार म्हणून जन्माला येत नाही, पण परिस्थिती त्याला तसे बनवते. कधीकधी आई-वडिलांमधील भांडणे, ताणलेले नाते, विभक्त कुटुंब, कमकुवत आर्थिक परिस्थिती, अंमली पदार्थांचे सेवन अशी अनेक कारणे मुलांना गुन्हे करण्यास प्रवृत्त करतात. मुलांची गुन्हेगारीकडे वाटचाल होण्यात मित्र आणि मैत्रिणींच्या गटाचा मोठा वाटा आहे. अनेक मुले स्वत: गुन्हेगार नसतात, परंतु गुन्हेगारी मुलांच्या समुदायाच्या प्रेरणेने किंवा दबावामुळे ती अशी दुष्कृत्ये करतात. सर्वत्र अशा मुलांचा एक गट असतो जो इतर निरागस मुलांना शिवीगाळ करून किंवा धमकावून वाईट गोष्टी करण्यास प्रवृत्त करतो. पण आपली मुले कोणाशी खेळतात, कोणाच्या संगतीत राहतात याकडे पालक फारसे लक्ष देत नाहीत. मुलांना नवीन गोष्टी शिकण्याची इच्छा असते. कोणत्या गोष्टी चांगल्या आणि कोणत्या वाईट हे त्यांना माहीत नसते. बालमानसशास्त्र असे सांगते की, बालवयात थ्रीलकडे ओढा अधिक असतो. यातूनच मुले वाईट गोष्टींकडे लवकर आकर्षित होतात.

आज मोबाईल फोन्स, लॅपटॉप आणि कॉम्प्युटरवर सहज उपलब्ध होणारी पोर्नोग्राफी मुलांना अतिलहान वयात प्रौढ बनवत आहेत. यामुळेच अल्पवयीन मुलांकडून लैंगिक गुन्हे घडताहेत. अल्पवयीन गुन्हेगारांसाठी कायदेही कडक केले असले तरी सामाजिक परिस्थिती अतिशय गुंतागुंतीची बनली आहे. अल्पवयीन मुले अनेकदा पळून जातात; कारण कायदा प्रत्येक मुलाला तुरुंगात टाकू शकत नाही आणि त्यांना सुधारण्याची संधी देऊ इच्छितो. अशा गुन्ह्यांपासून समाजाला वाचवायचे असेल तर समाजानेच जागरूक होऊन मुलांमध्ये सामाजिक व कौटुंबिक मूल्ये रुजवली पाहिजेत. यासाठी सर्वांत पहिली बाब म्हणजे पालकांना मुलांसाठी वेळ द्यावा लागेल आणि त्यांच्या बदलत्या स्वभावाचा अभ्यास करून समुपदेशन करावे लागेल. त्याला चांगल्या-वाईटाची समज दिली पाहिजे. मुलांना सुसंस्कृत कसे बनवायचे याचे विश्लेषण समाजालाच करावे लागेल. अन्यथा उद्याची स्थिती गंभीर बनण्याचा धोका आहे.

## गुड मॉर्निंग

दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

### पंचांग

**मंगळवार, दिनांक ६ ऑगस्ट २०२४**
श्रावण शु. २ , श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू नक्षत्र :मघा, योग : वरियान , करण : बालव, शुभ दिवस, मंगलागौरी पूजन, मुस्लिम सफर मासारंभ, सूर्योदय : स.०६.१९ सूर्यास्त : सायं.०७.०९ वा., राहू काळ : दुपारी : ३:०० ते ४:३०

### दिनविशेष

*१९२५ : सुरेंद्रनाथ बॅनजी स्मृतिदिन. *१८८१ : पेनिसिलिनच्या शोधाचा जनक अलेक्झांडर फ्लेमिंग यांचा जन्मदिन. *१९२५ : हरित क्रांतीचे जनक डॉ. एम. एस. स्वामिनाथन यांचा जन्मदिन. *१९८६ : मिझोरामला घटक राज्याचा दर्जा प्राप्त *१९४५ : हिरोशिमा शहर अणूबॉम्बने नष्ट. हा दिवस 'अण्वस्त्रविरोधी दिन' म्हणून पाळला जातो. *१९८६ : पहिल्या भारतीय टेस्टट्यूब बेबीचा मुंबईत जन्म. *१९८८ : भारतातील पहिला नलिका बालिका मुंबईच्या केईएम रुग्णालयात जन्माला आली. *२००३ : भारताच्या अंजू बॉबी जॉर्ज हिने आंतरराष्ट्रीय सुपर ग्रां. प्रि. मैदानी स्पर्धेच्या मालिकेतील डीएन गॅलान मैदानी स्पर्धेत रौप्यपदक जिंकले. *१९९७ : कोलंबो येथे खेळल्या गेलेल्या भारताविरुद्धच्या कसोटी सामन्यात श्रीलंकेने ९५२ धावांचा डोंगर उभारून सर्वोच्च धावसंख्येचा विक्रम नोंदवला.

### राशीभविष्य

* **मेष** : आर्थिक उलाढाल होईल. * **वृषभ** : लिखाणात रमाल. ***मिथुन** : नवीन उपक्रम राबवाल. * **कर्क** : कामे मनासारखी घडतील. * **सिंह** : निर्णय पुढे ढकलावे लागतील. * **कन्या** : व्यावसायिकांना उत्तम दिवस. ***तुळ** : सुग्रास भोजनाचा योग. * **वृश्चिक** : ताणतणाव वाढतील.* **धनु** : इच्छा तिथे मार्ग हे लक्षात ठेवा. * **मकर** : अपेक्षित पत्रव्यवहार यशस्वी. ***कुंभ** : रागावर नियंत्रण ठेवावे लागेल. * **मीन** : नवीन व्यवसायाचा शुभारंभ कराल.

### मेसेज आया

आयुष्यात माझ्या जेव्हा...
कधी दुःखाची लाट होती
कधी अंधारी रात होती
सावलीलाही भिणारी एकट्याची
अशी वाट होती...
तेव्हा फक्त मित्रा,
तुझी आणि तुझीच साथ होती...



### म्हणी

**दैव देते आणि कर्म नेते**

एखादी गोष्ट नशीबाने मिळते पण, आपल्या चुकांमुळे तिचा लाभ घेता येत नाही आणि ती हातून निघून जाते.

### व्यक्तीविशेष

**सर सुरेंद्रनाथ बॅनर्जी**

सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांचा जन्म १० नोव्हेंबर १८४८ रोजी कलकत्ता येथे झाला. राष्ट्रीय काँग्रेसचे एक संस्थापक असणारे सुरेंद्रनाथ आय.सी.आय.एस. होते. काही काळ प्रथम सहाय्यक दंडाधिकारी म्हणून त्यांनी सिल्हेट येथे काम केले. पुढे कलकत्त्याच्या मेट्रोपोलिटन महाविद्यालयाची म्हणजे तत्कालन रिपन महाविद्यालयाची स्थापना केली. जनजागृतीसाठी १८७८ मध्ये 'बेंगॉली' हे इंग्रजी वृत्तपत्रही काढले. राष्ट्रवादाची जागृती करण्यासाठी आपल्या अस्खलित वक्तृत्वशैलीत 'शिखांचा इतिहास व भारताची एकात्मता' असे विषय सामान्यजनांपर्यंत पोहोचवले. दि. २६ जुलै १८७६ रोजी इंडियन असेसिएशनची स्थापना करून तिच्या प्रचारार्थ भारतभर दौरे केले. राष्ट्रीय काँग्रेसचे दोन वेळा अध्यक्षपद भूषविलेल्या सुरेंद्रनाथांना लोकमान्यांचा जहालवाद व महात्माजींचा असहकार, दोन्हीही अमान्य होते. दोन्हींतही समन्वय हवा ही त्यांची भूमिका होती. १९२१ ते १९२३ या काळात स्थानिक स्वराज्यमंत्री असणाऱ्या सुरेंद्रनाथांनी ए नेशन इन मेकिंगसारख्या अप्रतिम ग्रंथाबरोबरच आत्मचरित्रही लिहिले आहे. ६ ऑगस्ट १९२५ रोजी बराकपूर येथे बॅनर्जी यांचे निधन झाले.

### बोधकथा

**संतांचा शांतपणा**

जेथे सज्जन असतात. तेथे दुष्ट लोकही असतात. त्याला पैठण अपवाद नव्हते. काही लोकांना एकनाथांची कीर्ती पाहवत नव्हती. त्यांनी पैज लावली की, एकनाथांना जो कोणी राग आणून दाखवेल त्याला सोन्याचे एक कडे बक्षीस मिळेल. हे काम तसे सोपे नव्हते. तरीही कड्याच्या लोभाने एका तरूणाने पैज जिंकण्याचे ठरविले. दुसऱ्या दिवशी सकाळीच तो तरूण एकनाथांच्या घरी गेला व देवपूजेत मग्न असलेल्या एकनाथांच्या मांडीला मांडी लावून बसला. जेणेकरून ते चिडतील. यावर एकनाथांची तंद्री भंगली. मांडीला मांडी लावणाऱ्या त्या तरूणाकडे पाहून ते म्हणाले, मला भेटायला पुष्कळ लोक येतात, पण तुमचे निराळेच प्रेम पाहून आनंद वाटला हे ऐकून तो तरूण अचंबित झाला. आपले काम फार अवघड आहे, याची त्याला जाणीव झाली. नंतर भोजनाच्या वेळी त्या तरूणाचे ताट एकनाथ महाराजांच्या जवळच वाढलेले होते. सर्व वाढून झाल्यावर शेवटी एकनाथांच्या पत्नी गिरिजाबाई खाली वाकून तूप वाढू लागल्या. तेवढ्यात त्या तरूणाने त्यांच्या पाठीवर उडी घेतली. हा प्रसंग पाहून एकनाथ पत्नीला म्हणाले, सांभाळा, ब्राह्मणाला खाली पाडू नकोश, त्यावर गिरिजाबाई हसून म्हणाल्या, छे! छे! घाबरायचे काहीच कारण नाही. हरीला (एकनाथांच्या मुलाला) पाठीवर घेऊन काम करावयाची चांगली सवय आहे मला, तेव्हा या छोट्या मुलाला कसे पाडेन?. हे ऐकून त्या तरूणाचा चेहरा पाहण्याजोगा झाला. एकनाथ महाराजांना राग आणणे सोपे नाही, याची प्रचिती त्याला आली.

बोध : संतांची शांतता करणे सोपे नाही.

### भूगोल

**वाळवंटी प्रदेश**

वाळवंटे म्हणजे पृथ्वीच्या पृष्ठभागावरील असा अतिकोरडा प्रदेश जेथे वनस्पती आणि प्राणीजीवन अत्यंत विरळ असते किंवा नसते. तसेच मनुष्यवस्तीही नसते किंवा अतिशय विरळ असते. या भागात निवडूंग, बाभूळ यांसारखी काटेरी झुडपे व खुरटे गवत उगवते. सामान्यपणे शुष्क, ओसाड व वालुकामय भूमीला वाळवंट म्हणून ओळखले जात असले तरी तांत्रिक दृष्ट्या वसाहतीच्या दृष्टीने अतिथंड प्रदेशांचाही यात समावेश केला जातो. जीवनोपयोगी साधनांच्या अभावामुळे हे प्रदेश निर्जन बनले आहे. उष्ण वाळवंटी प्रदेशांनी पृथ्वीच्या भूभागापैकी १८ टक्के भाग व्यापला आहे; तर थंड वाळवंटांनी १६ टक्के भूभाग व्यापला आहे. पहिल्या प्रकारात आफ्रिकेतील मध्यसहारा व नामिब वाळवंट, इथिओपिया व येमेन यांचा किनारी प्रदेश आदींचा समावेश आहे. हवामान, स्थानिक वनस्पती, भुरूपे, जलस्वरुप आणि मृदा यांच्या वैशिष्ट्यांनुसार अशा कोरड्या वाळवंटाचे वेगवेगळे प्रकार आढळतात.

### नवं संशोधन

**गुरुत्वीय लहरींमुळे समजेल कृष्णविवराचे रहस्य**

ब्रह्मांडातील सर्वात मोठ्या कृष्णविवराच्या उत्पत्तीबाबतचे रहस्य आता गुरुत्वीय लहरींचा उपयोग करुन समजू शकेल, असे संशोधकांनी म्हटले आहे. कृष्णविवराची उत्पत्ती कधी व कशी झाली हे यामुळे स्पष्ट होईल. ब्रिटनमध्ये डरहम विद्यापीठाच्या संशोधकांनी याबाबतचे संशोधन सुरु केले आहे. त्यांनी व्यापक प्रमाणात ब्रह्मांडाशी निगडित सिमुलेशन केले. त्याचा उपयोग आता विशालकाय कृष्णविवरांची टक्कर कशा प्रकारे होऊन त्यापासून गुरुत्वीय लहरी उत्पन्न होतात हे समजण्यासाठी होईल. या लहरींच्या आयाम आणि आवृत्तींपासून त्यांच्या सुरुवातीच्या द्रव्यमानाची माहिती समजेल. त्याच्यापासूनच सुरुवातीला कृष्णविवरांची १३ अब्ज वर्षांपूर्वी उत्पत्ती झाली होती. यासाठी इवॉल्ड लेसर इंटरफेरोमीटर स्पेस अँटिना डिटेक्टरचा वापर करण्यात येईल. त्याचे काम २०३४ पर्यंत सुरु होईल. त्यानंतर विशालकाय कृष्णविवरांमधील टक्करीतून निर्माण होणाऱ्या गुरुत्वीय लहरींचा वर्षातून किमान दोन वेळेला छडा लावला जाईल. अल्बर्ट आईनस्टाईन यांनी आपल्या सापेक्षतावादाच्या सिद्धांतात शंभर वर्षांपूर्वीच अशा गुरुत्वीय लहरींची संकल्पना मांडली होती.

### सोडवा सुडोकू

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक १८६**


| | | | |
|---|---|---|---|
| 4 | | | 2 |
| 1 | 2 | 4 | 3 |
| 3 | | 2 | |
| 2 | | | |

**क्रमांक १८५ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 3 | 1 | 4 |
| 1 | 4 | 3 | 2 |
| 4 | 1 | 2 | 3 |
| 3 | 2 | 4 | 1 |

### हास्यविनोद

मोठ्या बोर्डवर सुंदर तरुणीने हातात मिक्सर घेत होते आणि लिहिले होते...
एक्स्चेंज ऑफर...
मी बराच वेळ ते बघत होतो...
ते बघून बायको ओरडली...
चला... ऑफर फक्त मिक्सरची आहे...



### महिलायन

**मुलांना शाळा का आवडत नाही?**

काही वेळा मुलांना शाळेतील एखादा विषय अथवा उपक्रम आवडत नाही त्यामुळे मुले शाळेत जायचा कंटाळा करतात. काही मुलांना शाळेत डबा खायला आवडत नाही, तर काहींना आपल्याजवळील कंपास, वॉटरबॅग, दप्तर इत्यादी शालेयोपयोगी वस्तू आवडत नसतात. कोणीतरी त्यावरुन शाळेत चिडवत असते. त्यामुळे त्यांच्या मनात एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण होतो आणि ती शाळेत जाण्यास टाळाटाळ करू लागतात. यापैकी एखादे किंवा या व्यतिरिक्त कितीतरी कारणे मुले शाळेत जायचे टाळण्यामागे असू शकतात. त्यापैकी नेमके कारण शोधण्यासाठी मुलांशी योग्य संवाद साधला पाहिजे.

मुलांनी आपल्याशी निखळपणे बोलावे यासाठी त्यांच्यासोबत क्वालिटी टाईम घालवावा. त्यांना त्यांच्या आवडत्या ठिकाणी फिरायला घेऊन जावे. आवडते खेळ त्यांच्याबरोबर खेळावेत. यामुळे मुलांना मोकळे वातावरण मिळते आणि मुले त्यांच्या मनातील गोष्ट आपोआपच पालकांना सांगू लागतात. एकदा मुलांच्या मनातील समस्या कळली की त्यावर उपाय करणे सोपे असते. अशा प्रकारे थोड्याशा संयमाने ही समस्या हातातळी तर मुलांना शाळा मनापासून आवडू लागेल आणि त्यासाठी त्यांना धाकाची अथवा मारण्याची गरज उरणार नाही. (उत्तरार्ध)

### ज्ञानसागर

*टाईम मासिकच्या मुखपृष्ठावर 'मॅन ऑफ द इयर' म्हणून पहिल्यांदा झळकण्याचा मान १९२७ साली चार्ल्स लिंडबर्ग यांना मिळाला होता. * जपानी भाषेत कराओके या शब्दाचा अर्थ म्हणजे पोकळ ऑकेस्ट्रा होय. * फक्त चिकटपट्ट्यांच्या साहाय्याने २००० किलो कार उचलता येते. * अलास्काच्या भूमीचे मूल्य जितके असेले तेवढेच न्यूयॉर्कमधील एकट्या सेंट्रल पार्कचेअसेल. * जगभरातील महिला सुमारे ३८ खर्व डॉलर्स इतकी कमाई करतात तर सुमारे २८ खर्व डॉलर्स खर्च करतात. * इतर वाहनांच्या तुलनेत हमर गाडी चालवणाऱ्या चालकांना पाचपट अधिक संख्येत दंड होतो. *भारतातील सर्वांत मोठे वाळवंट राजस्थान राज्यातील थर येथे आहे. * भारताचे डेट्राईट म्हणून पुणे या शहरास ओळखले जाते. * शारदा सदन ही संस्था पंडिता रमाबाई यांनी स्थापन केली. *२०१५ सालात अफगणिस्तान क्रिकेट संघाने विश्वचषक स्पर्धेत पदार्पण केले. * भरतनाटयम या नृत्यप्रकाराला प्रारंभी दासी अट्टम या नावाने ओळखले जायचे. * डॉटर ऑफ द ईस्ट हे आत्मचरित्र बेनझीर भुत्तो यांच्यावर लिहिले आहे. *बिर्ला वेधशाळा कोलकाता शहरात आहे. * बेथलहॅम येथे प्रभू येशू ख्रिस्ताचा जन्म झाला. * भारताची पहिली भूगर्भीय अणुशक्ती स्फोटचाचणी पोखरण येथे घेण्यात आली.

'राष्ट्र संचार' हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# कढईत उरलेले तेल वापरताय?



भजी आणि पुऱ्या तळल्यानंतर कढईत उरलेले तेलही तुम्ही भाजी करण्यासाठी वापरता का? जर उत्तर होय असेल, तर आयसीएमआरचा हा इशारा लक्षात घ्या. बहुतेक घरांमध्ये कढईत उरलेले तेल फेकून देण्याऐवजी अन्य काही पदार्थ तळण्यासाठी किंवा भाजी बनवण्यासाठी त्याचा पुनर्वापर होतो. पण ही सवय तुम्हाला लवकरच आजारी बनवू शकते. आयसीएमआरचे नवीन संशोधन असेच काहीसे सांगत आहे. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चने नुकत्याच जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये वारंवार तेल गरम करण्याच्या सवयीशी संबंधित धोक्यांविषयी सांगितले आहे. वैद्यकीय संशोधन संस्थेने म्हटले आहे की,वनस्पती तेल वारंवार गरम केल्याने त्यांच्यामध्ये विषारी संयुगे तयार होतात, ज्यामुळे हृदयरोग आणि कर्करोगाचा धोका वाढतो.

तेल पुन्हा गरम केल्यामुळे कुकिंग ऑईलच्या पौष्टिक आणि रासायनिक गुणधर्मांवर लक्षणीय परिणाम होतो. संशोधनात असे आढळून आले आहे की, खाद्य तेल वारंवार गरम करणे हे कर्करोग वाढण्याचे एक प्रमुख कारण आहे. सर्वप्रथम, ते शरीरातील फ्री रॅडिकल्सला प्रोत्साहन देते, ज्यामुळे जळजळ होते. ही स्थिती सूज, हृदयरोग आणि यकृताच्या आरोग्यास हानी यांसारखे अनेक गंभीर आजार वाढवते. तेच तेल वारंवार गरम करून ते स्वयंपाकासाठी वापरल्याने शरीरातील कोलेस्टेरॉलची पातळी वाढू शकते, असे संशोधनात म्हटले आहे.

कुकिंग ऑईल पुन्हा गरम केल्याने ट्रान्स-फॅट आणि एक्रिलामाईडसारखी हानिकारक संयुगे तयार होऊ शकतात, ज्यामुळे कर्करोगाचा धोका वाढू शकतो. हे धोके टाळण्यासाठी एकच तेल अनेक वेळा वापरण्याची सवय बदलण्याचा सल्ला दिला जातो. आयसीएमआरने सल्ला दिला आहे की, तुम्ही भाजी बनवण्यासाठी खाण्याचे तेल गाळून पुन्हा वापरू शकता. या संशोधनात वापरलेले तेल एक किंवा दोन दिवसांत वापरण्याचा सल्ला देण्यात आला आहे. घरी वापरलेले तेल गाळून भाजी बनवण्यासाठी वापरता येते, असे या अहवालात म्हटले आहे. पण पुऱ्या किंवा पकोडे तळण्यासाठी तेच तेल पुन्हा वापरणे टाळावे. याशिवाय वापरलेले तेल एक-दोन दिवसांत वापरावे. अहवालात म्हटले आहे की, आधीपासून वापरलेले तेल दीर्घकाळ वापरणे टाळावे कारण अशा तेलांमध्ये खराब होण्याचे प्रमाण जास्त असते.

# नट्टो : जपानी लोकांच्या दीर्घायुष्याचे रहस्य

आरोग्यासाठी आंबवलेले पदार्थ उपयुक्त ठरत असतात. असे पदार्थ प्रोबायोटिक्स म्हणजेच आतड्यातील लाभदायक जीवाणूंचे प्रमाण वाढवतात. जपानमधील लोक त्यांचे दीर्घकाळ टिकून राहिलेले तारुण्य आणि दीर्घायुष्य यासाठीही ओळखले जातात. त्यांच्या नाश्त्यामध्ये असलेला एक पदार्थ त्यासाठी त्यांना मदत करीत असतो. हा पदार्थ घाणेरड्या वासाचा आणि गिळगिळीत, चिकट असला, तरी तो त्यांचे सुपरफूड ठरलेला आहे. त्याचे नाव नट्टो. आंबवलेल्या सोयाबीनपासून नट्टो हा पदार्थ तयार केला जातो. अमोनियासारखा त्याचा वास आणि त्याचं चिकटसं दिसणं, हा पदार्थ खाऊन मोठं झालेल्या अनेक जपानी लोकांनाही आवडत नाही!

२०१७ साली जपानमधील निफ्टी या इंटरनेट पुरवणाऱ्या कंपनीने सर्वेक्षण केलं होतं. त्यात ६२ टक्के लोक हा पदार्थ आवडीने खात असल्याचं दिसलं, तर १३ टक्के याचे फायदे माहिती असूनही नट्टोला हात लावत नव्हते. लंडन कुकिंग स्कूल चालवणाऱ्या जपानी शेफ युकी गोमी म्हणतात, नट्टोचा वास फारच घाण असतो. त्याचा वास टाळता येत नाही; पण तरीही माझ्या फ्रिजमध्ये नट्टो नेहमी असतं. घराघरांत चीज आणि दही असावं, तसं गोमीच्या घरात नट्टो आढळतं. नट्टो हे एक सुपरफूड आहे, असं जपानी लोक मानतात. त्यामुळे रक्ताभिसरण सुधारतं आणि हृदयरोगाचं प्रमाण कमी होतं, असं त्यांना वाटतं. नट्टोमध्ये भरपूर प्रमाणात प्रथिनं, लोह आणि तंतुमय पदार्थ म्हणजे



फायबर्स असतात. त्यामुळे रक्तदाब आणि वजनावर सकारात्मक परिणाम होतो. तारुण्य टिकायलाही यामुळे मदत होते. जपान सरकारने निश्चित केलेली व्हिटॅमिन-के ची पातळी (प्रत्येक माणसाला दिवसभरात आवश्यक असलेलली पातळी) ४०-५० ग्रॅम नट्टो खाल्ल्यावर पूर्ण होते. त्यामुळे ऑस्टिओपोरोसिसला दूर ठेवण्यासाठी मदत होते. नट्टोमध्ये व्हिटॅमिन ब-६, व्हिटॅमिन- ई मोठ्या प्रमाणात असतं. त्यामुळे त्वचेवर सुरकुत्या पडत नाहीत. हे आंबवलेले सोयाबीन जपानी खाद्यसंस्कृतीत गेली अनेक शतके आहे.

# केस आणि त्वचेचे आरोग्य सांभाळताना....

■ डॉ. योगिता दर्डा

'हेल्थ इज वेल्थ' अर्थात आरोग्य हीच खरी संपत्ती अशी शिकवण आपल्याला वर्षानुवर्षांपासून दिली जा I तअसली तरी बदलत्या काळामध्ये या खऱ्या संपत्तीकडे आपले कमालीचे दुर्लक्ष होऊ लागले आहे. सध्याच्या काळात जीवनाचा केवळ वेगच वाढलेला नाहीये, तर स्पर्धात्मकताही प्रचंड वाढली आहे. या दोन्हीही गोष्टींमुळे पूर्वापार चालत आलेली आपली जीवन जगण्याची रितच बदलून गेली आहे. विशेषतः त्यातील नियमिततेवर आणि गुणवत्तेवर याचा प्रतिकूल परिणाम झाला आहे. आहाराबाबत ही बाब अधिक प्रकर्षाने दिसून येते. सकस आणि पोषणयुक्त आहाराअभावी शारीरिक आरोग्याशी संबंधित समस्यांमध्ये वाढ होत आहे. याखेरीज अनुवंशिक आजार, हार्मोन्समधील बदलांमुळे निर्माण होणारे आजार यांमध्येही वाढ होत आहे. अशा प्रकारच्या आजारांवर, समस्यांवर उपचार करताना रुग्णाच्या प्रकृतीचा, दिनचर्येचा, आहार-विहाराच्या सवयींचा सर्वंकष विचार करुन औषधोपचार करणे गरजेचे ठरते. तसे झाल्यास समस्या मुळापासून संपून उपचारांचे फायदे दीर्घकाळ टिकतात. त्यादृष्टीने होमिओपॅथी उपचारपद्धती ही प्रभावी ठरणारी आहे आणि कालोघात या पॅथीने आपली उपयुक्तता सिद्धही केलेली आहे. आपण उदाहरणच घ्यायचे झाल्यास हल्लीच्या काळात वायप्रदुषणामुळे, रसायनयुक्त पाण्यामुळे किंवा वाढलेल्या तापमानामुळे किंवा आहारविहाराच्या बदललेल्या सवयींमुळे असेल केसांच्या आणि त्वचेच्या समस्यांमध्ये लक्षणीयरित्या वाढ झाल्याचे भवताली पाहिल्यावर सहजगत्या लक्षात येते. केसगळतीची समस्या तर ऐन पंचविशी-तिशीतील तरुण-तरुणींमध्ये दिसून येत आहे. केसांचे शरीरशास्त्रातील महत्त्व अनन्यसाधारण आहेच; पण त्याचबरोबरीने



प्रभावी व्यक्तिमत्वासाठीही निरोगी केस महत्त्वाचे ठरतात. केसगळतीमुळे, टक्कल पडल्यामुळे मुलामुलींना विवाहामध्ये अडथळे निर्माण होतात. नोकरीच्या मुलाखतीदरम्यान काही प्रश्न उद्भवतात. यातून त्यांचा आत्मविश्वास कमी होत जाऊन नैराश्य आल्याचीही उदाहरणे आपल्याला दिसतात. केसांबरोबरच त्वचाविकारांनी त्रस्त असणाऱ्यांची संख्याही वाढ झाली आहे.

प्रत्यक्षात केस आणि त्वचेवर झालेल्या या परिणामांवर उपचार करताना सर्वंकष उपचार गरजेचे ठरतात. कारण केवळ केस किंवा त्वचाच बाधित झालेली नसते; तर शरारीतील अन्य घटकांवरही त्याचा परिणाम झालेला असतो. त्या सर्वांचा विचार करुन होमिओपॅथीमध्ये उपचार केले जातात.

या उपचारांचा सर्वांत मोठा फायदा म्हणजे त्याचे साईड इफेक्टस् किंवा दुष्परिणाम नसतात. तसेच केवळ केस अथवा त्वचेचा विचार न करता रुग्णाच्या संपूर्ण आरोग्याचा विचार करुन उपचार केले जातात. त्यामुळे अन्य काही समस्यांमध्येही आराम मिळतो.

केसांच्या आणि त्वचेच्या समस्यांमध्ये प्रामुख्याने संप्रेरकांमधील बदल आणि अनुवंशिकता हे घटक अधिक महत्त्वाचे ठरतात; पण त्याजोडीला जर ताणतणावयुक्त जीवनशैली असेल तर समस्या अधिक गंभीर बनते. आज विद्यार्थीदशेतील मुलामुलींच्या मनावर अभ्यासाचा, गुणांचा ताण वाढला आहे; तर तरुणांमध्ये नोकरीची हमी, चांगला पगार यांबाबतच्या चिंता वाढल्या आहेत. वैवाहिक जीवनात नातेसंबंधांमधील तणाव वाढत आहे. या तणावांचा शरीरावर अत्यंत प्रतिकूल परिणाम होत आहे. या वाढत चाललेल्या स्ट्रेस फॅक्टरमुळे केसांच्या समस्या वाढत आहेत.

यामध्ये केसगळतीची समस्या खूपच मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. यावर उपचार करताना असणारे केस टिकवण्यावर भर देणे गरजेचे ठरते. त्यासाठी स्काल्पमध्ये इन्फेक्शन आहे का याची तपासणी केली जाते. उपचारादरम्यान आधी त्यावर काम केले जाते. एकदा केसगळती थांबल्यानंतर मग केसांच्या वाढीसाठी उपचार केले जातात. यामध्ये औषधांबरोबरच डाएट प्लॅनही महत्त्वाचा ठरतो. याशिवाय रोजच्या आयुष्यातील ताणतणाव कमी करण्यासाठी रुग्णांचे समुपदेशन केले जाते. तसेच उपचारादरम्यान मेडिटेशन, ध्यानधारणा करण्याचा सल्ला दिला जातो. मुळाशी जाऊन समस्येचा शोध आणि त्यावर आधारीत सर्वंकष उपचार यामुळे केस गळती, चाई पडणे, त्वचेच्या समस्या यांवर होमिओपॅथी उपचार प्रभावी ठरतात. तसेच डाएट प्लॅन आणि व्यायाम यामध्ये सातत्य ठेवल्यास औषधोपचार थांबवल्यानंतरही हे परिणाम कायम राहतात.

# माया संस्कृतीतील बळींचे गूढ उकलले

रहस्यमय माया संस्कृतीमध्ये लहान मुलांचा बळी दिला जात असे. यापूर्वी बळी दिलेल्या व्यक्तींचे अवशेष सापडले होते; पण त्यांची लिंगनिश्चिती होत नव्हती. बळी गेलेल्या व्यक्ती मुली असाव्यात असे मानले जात होते. मात्र, आता डीएनए विश्लेषणातून दिसून आले आहे की, माया संस्कृतीमध्ये लहान मुलांचा बळी दिला जात होता. त्यामध्ये तीन वर्षांच्या मुलांचाही समावेश आहे. बहुतांश मुलं ही तीन ते सहा वर्षे वयोगटांतील आहेत. मॅक्स प्लँक इन्स्टिट्यूट फॉर इव्होल्युशनरी अँथ्रोपोलॉजीच्या संशोधकांनी प्राचीन डीएनएची तपासणी करून याबाबतचा दावा केला आहे.

चुल्टुन नावाच्या एका भूमिगत कक्षामध्ये तब्बल शंभर व्यक्तींचे अवशेष सापडले होते. त्यापैकी ६४ व्यक्तींच्या अवशेषांच्या अभ्यासातून हे स्पष्ट झाले की, हे सर्व अवशेष लहान मुलांचे आहेत. बहुतांश मुलं एकमेकांची नातेवाईक होती आणि त्यामध्ये दोन जुळे भाऊही होते. तरुण मुलींचा माया संस्कृतीमध्ये बळी दिला जात असे, या प्रचलित धारणेला छेद देणारे हे नवे संशोधन आहे. या नव्या संशोधनामुळे मेक्सिकोच्या युकाटन बेटावरील चिचेन इटजामधील मुलांच्या बळीच्या प्रथेची माहिती समोर आली आहे.

सेंट्रो आयएनएएच युकाटनचे आर्कियोलॉजिस्ट ओना डेल कॅस्टिलो-चावेज यांनी सांगितले की, ही लहान मुलं पाचशेपेक्षा अधिक वर्षे एकाच जागी दफन होती. बळी दिलेल्या मुलांची निवड विशिष्ट प्रकारे करण्यात आली होती. चुल्टुनमध्ये लहान वयाच्या



व्यक्तींचा बळी दिला जात असे, याची माहिती १९६७ मध्येच संशोधनामध्ये मिळाली होती. एका कक्षात शंभरपेक्षा अधिक मुलांचे अवशेष मिळाले होते. मात्र, केवळ हाडांवरून या व्यक्तींची लिंगनिश्चिती होत नव्हती. आता अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने वैज्ञानिकांनी प्राचीन डीएनएचा अभ्यास करून नवे संशोधन केले. इम्युनोजेनेटिक्स एक्सपर्ट रोड्रिगो बारक्वेरा यांच्या नेतृत्वाखाली संशोधकांच्या एका

# लठ्ठ झाल्यास शिक्षा अटळ!

जगभरात जितके देश, तितके नियम. काही नियम अतिशय महत्त्वाचे, अगदी अनुकरणीय तर काही नियम मात्र अगदी थक्क करायला लावणारे. आता असाच एक थक्क करायला लावणारा नियम जपानमध्ये आहे. हा नियम म्हणजे जपानमध्ये चक्क लठ्ठ असणे बेकायदेशीर आहे.

जगात विश्वास ठेवता येणार नाही, अशा काही नियमांपैकी हा एक अफलातून नियम आहे. जपानमध्ये जाड असण्यासाठी लोकांना चक्क शिक्षा दिली जाते. तसे पाहता, प्रत्येक व्यक्ती वेगवेगळा असतो, प्रत्येकाची शरीरयष्टी वेगळी असते. मात्र, एखादी व्यक्ती जाड आहे किंवा अगदीच किरकोळ आहे यावरून कोणी शिक्षा देऊ शकते का, हा विचारही मनात येणार नाही. पण, जपानमध्ये मात्र हा नियम प्रत्यक्षात अमलात आणला जातो आणि प्रदीर्घ कालावधीपासून त्याचे काटेकोर पालन केले जाते.


लठ्ठपणा या देशात बेकायदेशीर मानला



जातोच. पण, यासाठी या जाड लोकांना शिक्षाही मिळते. जपानमध्ये लठ्ठपणा थांबविण्यासाठी नियम आहेत. यासाठी मेटा बो लॉ आहे. २००८ मध्ये जपानच्या स्वास्थ, कल्याण मंत्रालयाने हा कायदा जारी केला होता. या कायद्यांतर्गत ४० ते ७४ वयांतील पुरुष आणि महिलेच्या कमरेचे माप घेतले जाते. पुरुष आणि महिलांच्या कमरेचा आकार किती असावा, हे यात निश्चित केले आहे. लठ्ठपणामुळे कुठलाही आजार होऊ नये, असे तेथील सरकारला वाटते आणि त्यामुळे हा नियम तेथे लागू करण्यात आला आहे. येथे लठ्ठपणा असणाऱ्या नागरिकांना शिक्षा म्हणून कमी होण्याचा क्लास घ्यावा लागतो. क्लासेस आरोग्य विमान कंपनीकडून आयोजित केले जातात आणि त्यात सहभागी होणे अशा जाड व्यक्तींना सक्तीचे असते!

# मान्सून अंदाजाच्या अंतरंगात...

हवामान खात्याचा अंदाज अतिशय महत्त्वाचा असतो. या अंदाजानुसारच, रेड अलर्ट, यलो अलर्ट, ऑरेंज अलर्ट दिले जातात, जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीसाठी सज्ज राहता येईल. पण, जे हवामान खाते हवामानाचे असे भाकीत करते, त्यांना कोणत्या यंत्रणेच्या माध्यमातून याचा अंदाज वर्तवता येतो, याचा आपण क्वचितच विचार केला जाईल. पाऊस



कुठे होणार, कसा होणार व किती होणार, यासाठी हवामान खात्याकडे अद्यावत प्रणाली असते आणि याच माध्यमातून ते याचा अंदाज वर्तवत असतात.


तसे पाहता, मान्सून देशभरातील प्रत्येकासाठी अनन्यसाधारण महत्त्वाचा असतो. शेतकऱ्यांचे सारे गणित तर यावरच अवलंबून असते. अशावेळी हवामान खात्याकडून येणारी माहिती अर्थातच महत्त्वाची असते. मान्सून एखाद्या राज्यात केव्हा धडकणार, किती दिवस असणार, किती सरासरीचे पाऊस पडणार, हे त्यातून कळत असते. आता ते यासाठी कोणते उपकरण वापरतात ते ही लक्षवेधी आहे. तसे पाहता, हवामानाच्या अंदाजासाठी अनेक घटक जबाबदार असतात.

भविष्यात जेव्हा जेव्हा हवामानाबद्दल सांगायचे असते किंवा भाकीत करायचे असते, त्यावेळी विविध उपकरणांच्या साहाय्याने वातावरणाचे तापमान आणि जमिनीचा पृष्ठभाग, आर्द्रता, वाऱ्याचा वेग आणि दिशा, दव, ढगांची स्थिती इत्यादी तपासले जातात. यासाठी अनेक साधनेही वापरली जातात. उदाहरणार्थ, जेव्हा पाऊस ओळखायचा असतो तेव्हा पावसाचा मापक वापरला जातो, वाऱ्याचा वेग मोजण्यासाठी ॲनिमोमीटर, वाऱ्याची दिशा मोजण्यासाठी पेन-इव्हपोरिमीटर, सनलाईट रेकॉर्डर, दव मोजण्यासाठी दव मापक, जमिनीचे तापमानासाठी वापरले जाते आणि त्या माध्यमातून हवामानाचा अंदाज वर्तवला जातो.

# ३७ हजार कोटींची 'मोस्ट वॉंटेड'

जगातील मोस्ट वॉंटेड महिलांच्या यादीत जी महिला अव्वलस्थानी आहे, तिचे एकाहून एक पराक्रम ऐकले, तर त्यावर विश्वासही बसणार नाही. आता ही मोस्ट वॉंटेड महिला अशी आहे, जिचा ठावठिकाणा कुठेच लागत नाही. मागील ५ वर्षांपासून ती बेपत्ता आहे. आता या महिलेचा सर्वात मोठा पराक्रम हा आहे की, तिने ३७ हजार कोटींची माया गोळा केली अन्? परिस्थिती बिघडत आहे, असे लक्षात येताच क्षणार्धात पसारही झाली!

एफबीआयच्या टॉप १० गुन्हेगारांच्या यादीत समाविष्ट असलेली ही ४४ वर्षांची महिला सध्या पुन्हा चर्चेत आली आहे. पाच वर्षांपूर्वी बेपत्ता झालेल्या ही महिला आहे डॉ. रुझा इग्नाटोवा. विविध



अहवालांमध्ये तिच्या पतीचा उल्लेख आहे आणि तिला एक मुलगीदेखील आहे. रुझाचे जर्मन वकील ब्योर्न स्ट्रेहल यांच्याशी विवाह झाल्याचे सांगितले जाते. तिला २०१६ मध्ये कन्यारत्नही झाले.

वन कॉईन नावाच्या बनावट क्रिप्टोकरन्सी कंपनीच्या माध्यमातून या महिलेने साडेचार अब्ज डॉलर्स म्हणजेच ३७ हजार कोटी रुपये जमा केले आणि परिस्थिती बिघडल्यानंतर पळून गेली. २०१९ मध्ये बीबीसी साऊंडस्वरील मिसिंग क्रिप्टोक्वीन पॉडकास्टवर जेमी बार्टलेट आणि जॉर्जिया कॅट यांनी रुझा इग्नाटोवाचा घोटाळा उघड केला होता. ऑक्टोबर २०१७ मध्ये रुझा बेपत्ता झाल्यापासून, एफबीआय वेबसाईट आणि अनेक वृत्त आऊटलेटवर तिचे पोस्टर्स लावण्यात आले आहेत. बीबीसीच्या याच अहवालात तिची हत्या झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

# प्रागमधील घड्याळ लोकप्रिय का आहे?

जगभरात अनेक प्रकारची घड्याळे पाहायला मिळतात. मात्र, झेक प्रजासत्ताकची राजधानी प्राग शहरात सहाशे वर्षांपूर्वीचे एक असे घड्याळ आहे, जे वेळेची नव्हे, तर खगोलीय घटनांची माहिती देते. सन १४१० मध्ये हे घड्याळ बसवण्यात आले होते. ते सूर्य व चंद्राची स्थिती तसेच पवित्र दिवसांची माहिती देते.

प्राग हे जगातील सुंदर शहरांपैकी एक आहे. या शहरात अनेक ऐतिहासिक इमारतीही आहेत. जगभरातील पर्यटक हे शहर पाहण्यासाठी येत असतात. त्यांच्या आकर्षणाच्या स्थळांमध्ये हे घड्याळही आहे. हे एक ॲस्ट्रॉनॉमिकल वॉच असून, लोकांना खगोलीय सूचना देण्यासाठी सहाशे वर्षांपूर्वी



त्याची निर्मिती करण्यात आली होती. या घड्याळाला प्राग ओर्लोज या नावाने ओळखले जाते. प्रागच्या ओल्ड टाऊन स्क्वेअरमध्ये असलेल्या ओल्ड टाऊन हॉलवर हे भव्य घड्याळ आहे. या घड्याळाच्या आसपास कॅथॉलिक संतांच्या मूर्ती आणि बारा राशींची चिन्हे आहेत. हे घड्याळ सूर्य-चंद्राची स्थिती, ग्रहांची स्थिती, वेगवेगळ्या राशींमध्ये नक्षत्रांचा प्रवेश, अशा अनेक खगोलीय घटनांच्या सूचना देते. विशेष म्हणजे ज्या वेळेपासून हे घड्याळ बसवण्यात आले आहे, त्या वेळेपासून हे घड्याळ निरंतर सुरू आहे.

## ड्रोन सर्वेक्षणाद्वारे मिळकतींचा शोध सुरु

# करवसुलीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** स्थानिक स्वराज्य संस्थांचा उत्पन्नाचा प्रमुख स्रोत म्हणून मालमत्ताकराकडे पाहिले जाते. या कर वसुलीसाठी यूजर फ्रेंडली प्रणाली विकसित करून त्यावर अधिक भर देत महानगरपालिकेने कर वसुली पद्धती सुलभ करण्याचा प्रयत्न केला आहे. शहरातील सर्व मिळकती कराच्या कक्षेत आणण्यासाठी ड्रोन सर्वेक्षणाद्वारे मिळकतींचे सर्वेक्षण सुरू असून, त्याद्वारे महापालिकेचे उत्पन्न निश्चितपणे वाढणार आहे, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.

करआकारणी व करसंकलन विभागामार्फत शहरातील इमारत व जमिनीवर मालमत्ताकर आकारणी व वसुली करण्यात येत आहे. जिओ सिक्वेन्सिंग करून मनपा क्षेत्रातील सर्व मालमत्तांना प्रत्यक्ष स्थळावर जाऊन नवीन मालमत्ता क्रमांक देण्यात येत आहे. करसंकलन विभागामार्फत नागरिकांना जलद आणि सोप्या पध्दतीने सेवा मिळाव्यात, यासाठी नव्याने ऑनलाईन पध्दतीने सेवा सुविधा देण्यात येत आहेत. यामध्ये नव्याने करआकारणी, पुन:कर आकारणी, स्वयं मूल्यांकन, मालमत्ता नोंदणी, सवलत योजना, मालमत्ता हस्तांतरण, मालमत्ताकर उतारा आदींचा समावेश आहे. तसेच महिला, दिव्यांग व्यक्ती, पर्यावरणपूरक उपक्रम राबविणाऱ्या सोसायट्यांना सामान्य करामध्ये भरघोस सवलत दिली जात आहे. या उपक्रमाला करदात्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून अनेक नागरिकांनी विहित वेळेत कर भरून विविध सवलतींचा लाभ घेता येणार आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अनेक नवनवीन उपक्रम महापालिका राबवत आहे. शहरात मालमत्तांची वाढती संख्या विचारात घेता या



मालमत्तांचे ड्रोनद्वारे सर्वेक्षण करण्याचे काम सुरू आहे. याद्वारे प्रत्येक मिळकतीचे अत्यंत सूक्ष्म मोजमाप होणार आहे. त्यामुळे नोंदणी नसलेल्या मालमत्ता आता कर कक्षेत येतील. तसेच अनधिकृत बांधकामांनादेखील आळा बसेल. याचा उपयोग फक्त मालमत्ता सर्वेक्षणासाठी मर्यादित नसून आपत्ती व्यवस्थापन, बांधकाम परवानगी, आकाशचिन्हे व परवाना तसेच अतिक्रमण विभागालादेखील होणार होणार आहे. मालमत्ताकर हा महापालिकेचा मुख्य उत्पन्नाचा स्रोत असून शहरात सुमारे ६ लाख ३० हजार मालमत्ता आजमितीस नोंदल्या गेल्या आहेत. ड्रोन सर्वेक्षण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर यात निश्चितपणे वाढ होईल. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात कर संकलन विभागाने महापालिकेच्या इतिहासात प्रथमच ९७७ कोटी कर जमा झाला आहे.

अनेक मालमत्तांची महापालिकेच्या दप्तरी नोंद नसल्याचे वेळोवेळी झालेल्या सर्वेक्षणातून समोर आले आहे. यापूर्वी महापालिकेने २०१३ मध्ये सर्वेक्षण केले असता यामध्ये सुमारे ३५ हजार तर २०२१ मध्ये झालेल्या सर्वेक्षणात २१ हजार नवीन मालमत्ता आढळून आल्या होत्या. मात्र, यानंतरही शहरात नोंद नसलेल्या मालमत्ता असण्याची शक्यता आहे. त्या शोधण्यासाठी आता अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे सर्वेक्षण केले जात आहे.

**• जिओ सिक्वेन्सिंगमुळे येणार सुसूत्रता**

महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्तांच्या ठिकाणी प्रत्यक्ष स्थळावर जाऊन नवीन मालमत्ता क्रमांक देण्यात येत आहेत. यामुळे मालमत्ताकर आकारणी न झालेल्या नवीन, वाढीव किंवा वापर बदल मालमत्ताकर आकारणी कक्षेत येऊन महापालिकेच्या उत्पन्न वाढीस मदत होणार आहे. मालमत्तांना सलग क्रमांक देण्यासाठी संपूर्ण मालमत्तांची सलग नोंदणी केल्यामुळे यापुढे कोणतीही मालमत्ता शोधण्यास अडचण निर्माण होणार नाही.

### मालमत्तेसाठी यूपीक आयडी

यूपीक आयडीचा वापर करून नागरिक एकाच आयडीच्या माध्यमातून महापालिकेच्या विविध विभागातील कामे करू शकणार आहेत. यूपीक आयडीमुळे नागरिकांची डिजिटल गोपनीयता जपली जाणार आहे. यूपीक आयडीमध्ये झोन क्रमांक, गट क्रमांक, ब्लॉक क्रमांक, इमारत क्रमांक आणि मालमत्ता क्रमांक नमूद करण्यात आला आहे. यामुळे महापालिका व शासनाच्या इतर विभागांमध्ये समन्वय साधण्यास मदत होणार आहे. तसेच, मालमत्तेबाबत विश्वासार्हता वाढून मालमत्तेची खरेदी किंवा विक्री व्यवहार अधिक सुलभ होईल.

---

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## पावसामुळे शहरातील वीजपुरवठा खंडित

**पिंपरी :** पावसामुळे शहरातील बहुतांश रस्त्यांची चाळण झाली आहे. त्यातच पाणी साचल्याने खड्ड्यांच्या खोलीचा अंदाज येत नाही. त्यामुळे, वाहने आदळत आहेत. दुचाकी घसरत आहेत. महापालिकेतील समाविष्ट गावांमध्ये रस्त्यांची परिस्थिती अधिक बिकट झाली आहे. मुळा, पवना, इंद्रायणी नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाल्याने नदी काठच्या भागांतील वीज पुरवठा खंडित होता. त्यामुळे, नागरिकांची गैरसोय झाली.

धोका टाळण्यासाठी वीज बंद

पाण्याच्या पातळीत वाढ झाल्यामुळे नदीपात्रालगत असणाऱ्या परिसरात संभाव्य अपघात टाळण्यासाठी महावितरणकडून वीजपुरवठा खंडित करण्यात आला. जुनी सांगवीसह निगडी व इतर परिसरात सकाळपासूनच वीजपुरवठा खंडित होता. पाण्याची पातळी कमी झाल्यानंतर वीजपुरवठा सुरळीत केला जाईल, अशी माहिती महावितरणच्यावतीने देण्यात आली.

जुनी सांगवी येथील मधुबन गल्ली क्रमांक तीन, चार व पाच या ठिकाणी सकाळी साडेअकरापासूनच वीजपुरवठा खंडित केला होता. निगडी, प्राधिकरण सेक्टर २७ मध्ये १२ तासांपासून वीजपुरवठा खंडित असल्याचे नागरिकांनी सांगितले. पिंपरीतील संजय गांधीनगर परिसरात दुपारी साडेबारापासून वीजपुरवठा बंद होता.



---

## अनोखे आंदोलन...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पिंपरी :** दाभाडे वस्ती, चऱ्होली येथे खड्ड्यांच्या प्रश्न संदर्भात आंदोलन करण्यात आले. यावेळी १०० खड्ड्यांमध्ये १०० कमळाची फुले लावून अनोखे आंदोलन करत खड्ड्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले.

### रस्त्यांच्या अवस्थेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

# खड्ड्यांमध्ये कमळाची फुले लावून आंदोलन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** चिखली- मोशी- चऱ्होली रेसिडेन्शिअल कॅरिडोर केल्याच्या बाता मारणाऱ्या भोसरीच्या आमदारांनी चऱ्होली, मोशी ते चिखली या रस्त्यांवर एकदा डोळे उघडे ठेवून प्रवास करावा. या रस्त्यावरील खड्डे पहावे. येथे होणारी वाहतूक कोंडी आणि त्यामुळे होणारा मनस्ताप यांचा अनुभव घ्यावा म्हणजे आपण नक्की गेल्या दहा वर्षात काय केले याची त्यांना उपरती होईल, अशी टीका स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केली आहे.

गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली दाभाडे वस्ती, चऱ्होली येथे खड्ड्यांच्या प्रश्न संदर्भात आंदोलन करण्यात आले. यावेळी १०० खड्ड्यांमध्ये १०० कमळाची फुले लावून अनोखे आंदोलन करत खड्ड्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले. दाभाडे वस्ती, चऱ्होली फाटा ते चऱ्होली गाव हा अत्यंत गजबजलेला, लोकवस्ती प्रचंड प्रमाणात वाढत असलेला भाग आहे. या भागातील रस्त्यांची प्रचंड प्रमाणात दुरावस्था झाली आहे. चऱ्होली पुण्याशी कनेक्टिव्ह असल्याने वेळेची बचत होते असे असताना या रस्त्यांकडे अतिशय दुर्लक्ष झाले आहे. याचा फटका येथील नागरिकांना तर बसला आहे.

---

### जलसंपदा विभागाने पाणीकोटा वितरणास दिली मान्यता

# पवना, भामा आसखेड धरणातील पाण्याचे वाटेकरी वाढले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना व भामा आसखेड धरणातील वाटेकरी वाढले आहेत. पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाला (पीएमआरडीए) ला वाणिज्यिक वापराकरिता पवना धरणातून ०.०५९१ दशलक्ष घन मीटर पाण्याचा कोटा मंजूर करण्यात आला आहे. तर भामा आसखेड धरणातून चाकण नगरपरिषदेला पिण्यासाठी ५.५६२ वाढीव दशलक्ष घन मीटर पाणी कोटा मंजूर करण्यात आला आहे. जलसंपदा विभागाने पाणीकोटा वितरणास मान्यता दिली आहे.

पिंपरी चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेत, पुढील ५० वर्षाच्या नियोजनासाठी पिंपरी चिंचवड महापालिका आता मुळशी धरणातून अतिरिक्त पाणीसाठा मिळविण्यासाठी प्रयत्नशील आहे. जिल्ह्यातील जलाशयांची संख्या मर्यादित असताना वाढत्या नागरिकरणामुळे पाण्याची मागणी वाढत असल्याने ती पूर्ण करताना जलसंपदा विभागाला आता उपलब्ध जलाशयांमधून ती पूर्ण करावी लागत आहे. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांबरोबरच खासगी संस्थांकडूनही पाणी कोटा उपलब्ध करुन देण्याविषयी जलसंपदा विभागाकडे वारंवार मागणी होत आहे.

कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालकांच्या वतीने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत चाकण नगरपरिषददेला घरगुती वापरासाठी पाणी कोटा उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव जलसंपदा विभागाला प्राप्त झाला होता. तर यापुर्वीच चाकण नगरपरिषदेला भामा आसखेड धरणातून ३.४८९६ दशलक्ष घन मीटर पाणीसाठा मंजूर असून, त्याचा वापर नगरपरिषदेकडून केला जात आहे. तर शासन निर्णयानुसार बिगर संचन मोठ्या प्रमाणात पाण्याचा हक्क प्रस्तावांना मंजुरी देण्यासाठी क्षेत्रिय वाटपाच्या मर्यादेनुसार सुधारित स्तर निश्चित करण्यात आलेला आहे. नव्या शासन निर्णयानुसार चाकण नगरपरिषदेची २०१५ मधील लोकसंख्या लक्षात घेत, वाढीव ५.५६२ दशलक्ष घन मीटर पाणी कोट्यास जलसंपदा विभागाने मंजुरी दिली आहे.

पीएमआरडीएच्यावतीने मावळ तालुक्यातील कुरवंडे येथे टायगर व लायन पॉइंट विकसित केला जात आहे. हे पॉइंट विकसित करण्यासाठी वाणिज्यिक वापरासाठी पाण्याची गरज भासणार असल्याचा प्रस्ताव जलसंपदा विभागाला प्राप्त झाला होता.

---

# अतिक्रमणांकडे दुर्लक्ष करणे पडले महागात

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** - शहरातील विविध भागात गेल्या काही दिवसांपासून अनधिकृत बांधकामे, पत्राशेड, हॉटेल्स, पब आणि बारचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अशा अनधिकृत बांधकामे, पत्राशेडवर नियंत्रण मिळविण्यात अपयशी झालेल्या आणि कारवाई न करणाऱ्या अतिक्रमण निर्मूलन विभागाचे उपायुक्त, सहा क्षेत्रिय अधिकारी यांच्यासह नऊ अधिकाऱ्यांना नोटीसा दिल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांनी दिली.

पिंपरी-चिंचवड शहरातून पवना, इंद्रायणी आणि मुळा या तिन्ही नद्या वाहत आहेत. या नदीकाठी मोठ्या प्रमाणात भराव आणि अतिक्रमणे झाली आहेत. त्यामुळेच नुकत्याच झालेल्या पावसात नदीकाठच्या रहिवासी भागात पाणी शिरल्याच्या घटना घडल्या. तसेच शहरातील विविध भागातही अनधिकृत बांधकामे, पत्राशेड, पादचारी मार्गावरील अतिक्रमणांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

यावर कारवाईसाठी महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाकडून कानाडोळा केला जात होता.

---

### सुमारे १ लाख ८६ हजार रुपयांचा दंड वसूल

# डासोत्पत्ती ठिकाणांवर दंडात्मक कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** किटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिकेच्या वतीने व्यावसायिक आस्थापना, गृह सोसायट्यांसह घरांची तपासणी मोहीम तीव्र करण्यात आली असून डासोत्पत्ती ठिकाणे आढळल्यामुळे आज दंडात्मक कारवाई करण्यात आली असून सुमारे १ लाख ८६ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे, अशी माहिती आरोग्य विभागाचे सहाय्यक



आयुक्त अजिंक्य येळे यांनी दिली.

शहरात किटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यासाठी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी तपासणी मोहिम तीव्र करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिकेच्या वतीने शहरात राबविण्यात येणारी तपासणी मोहीम तीव्र करण्यात आली असून डासोत्पत्तीची ठिकाणे आढळलेल्या व्यक्ती आणि आस्थापनांवर ही कारवाई करण्यात आली आहे.

तपासणी मोहिमेत अ' क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत २० हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. ब' क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत ६४ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. क' क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत १२ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. ड' क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत ९ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. इ' क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत ४ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

फ' क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत ४३ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. ग' क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत १३ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. ह' क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत १ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. कारवाई दरम्यान एकूण १ लाख ८६ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

#रा

---

» Selected

## वडगांव रस्ता व चाकण चौकी चेंबर तुंबल्याने रस्त्यावर पाणी



**आळंदी :** आळंदी येथील वडगांव रस्त्यावर चेंबर तुंबल्याने तेथील ते पाणी दूर पर्यंत वाहताना दिसत आहे.वेळोवेळी तेथील ठिकाणचे चेंबर तुंबत असल्याचे तेथील स्थानिक एका स्थानिक नागरिकाने सांगितले. तसेच अनेक जन तेथील फुटपाथवर कचरा टाकत असल्याने फुटपाथ वरून सुद्धा नागरिकांना चालता येत नाही.तिथे एका बाजूने फुटपाथवर अनेक दुकानांनी अतिक्रमणे केल्यामुळे नागरिकांना रस्त्यावरून चालावे लागत आहे. तेथील ती तिहेरी समस्या पालिकेने सोडवावी अशी यावेळी तेथील स्थानिक नागरिकाने मत मांडले. तसेच चाकण चौक येथील टॉयलेट शेजारील इंद्रायणी काठा जवळील चेंबर तुंबलेल्या अवस्थेत असून त्याचे पाणी बाहेर येत आहे. व त्या चेंबर शेजारीच खड्डा पडल्याने रहदारीस अडथळा निर्माण होत आहे.

## टास्कच्या नावाखाली तरुणाची ४१ लाखांची फसवणूक

**पिंपरी :** फेसबुक टास्क पूर्ण करण्यास सांगून एका तरुणाची ४० लाख ९४ हजार ४७५ रुपयांची फसवणूक केली. ही घटना कासारवाडी येथे घडली. ३० वर्षीय तरुणाने याबाबत भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी ९४१६९६२९६५ या मोबाइल नंबर धारकाच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी मंगेश हे घरी असताना आरोपी फिर्यादी यांच्या व्हॉटस्अपवर टेलिग्राम आयडी मेसेज केला. फेसबुक टास्क पूर्ण करायला सांगून फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून वेगवेगळ्या बँक खात्यावर ४० लाख ९४ हजार ४७५ रुपये घेऊन ऑनलाइन फसवणूक केली. भोसरी पोलीस तपास करीत आहेत.

## पावसामुळे साचलेल्या पाण्यातच स्कूलबस बंद



**पिंपरी :** चऱ्होली खुर्द येथील घोलप वस्ती जवळ संस्कार गुरुकुल शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. त्या साचलेल्या पाण्यातून अनेक वाहने व नागरिक ये जा करत असतात. अश्यातच स्कूल बस त्या पाण्यात बंद पडल्या. पाणी गुडघ्याच्या खाली असल्याने त्या बसमधून बसलेल्या विद्यार्थ्यांची स्कूलच्या स्टाफ ने तेथून त्यांची सुखरूप सुटका केली.

तेथील साचलेल्या पाण्याला बाहेर पडण्यासाठी मोठा स्रोत नसल्याने ती समस्या उद्भवत आहे.तेथील समस्या समजताच तत्काळ मुख्याधिकारी यांनी संबंधित टीमला तिथे पोहचण्यास सूचना केल्या व तेथील पाणी जाण्यासाठी थोडासा मार्ग काढला. संतत धार पावसामुळे तेथील परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते.तेथील परिस्थितीची वारंवार माहिती अग्निशमन दल कर्मचारी घेत आहेत.

## झाडाला गाडीचा धक्का लागला म्हणून मारहाण

**वाकड :** घरासमोरील झाडाला टेम्पोचा धक्का लागल्याच्या कारणावरून दोन जणांनी व्यावसायिकास लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. ही घटना शनिवारी (दि. 3) सायंकाळी काळाखडक, वाकड येथे घडली. संस्कार शिंदे (वय १८) आणि शंतनु नरेंद्र शिंदे (वय २२, रा. स्वामी विवेकानंद कॉलनी, काळाखडक, वाकड) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. मनिष कामताप्रसाद सिंग (वय ४६, रा. वाकड) यांनी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी यांना व्यावसायासाठी लागणारे व्हिनायल रोड घेऊन टेम्पो आला. या टेम्पोचा धक्का आरोपी यांच्या घरासमोरील पारिजातकाच्या झाडाला लागला. या कारणावरून चिडलेल्या आरोपी संस्कार याने फिर्यादी यांना शिवीगाळ केली. आरोपी शंतनु याने लाकडी दांडक्याने मारहाण करीत फिर्यादी यांना जखमी केले आहे. वाकड पोलीस तपास करीत आहेत.

## अमेरिकी मंदी, मध्य पूर्वेतील अशांततेचा फटका

# भारतीय शेअर बाजारात मोठी घसरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** अमेरिकेतील मंदीची भीती आणि इस्रायल-इराणमध्ये महायुद्ध होण्याची शक्यता यामुळे सोमवारी देशांतर्गत शेअर बाजारात भूकंप झाला. निर्देशांक वर्षातील सर्वात मोठ्या घसरणीसह उघडला.

निर्देशांक २,३९३ अंकांच्या घसरणीसह ७८,५८८ वर उघडला, तर निफ्टी ४१४ अंकांच्या घसरणीसह २४,३०२ वर उघडला.

बंद होताना, निर्देशांक १,२७३.९९ अंकांनी घसरून ७९,७०७.९६ वर, तर निफ्टी ३७८.०० अंकांनी घसरून २४,३३९.७० वर बंद झाला. नॅसडॅक फ्युचर्स २ टक्क्यांहून अधिक घसरले, तर नॅसडॅकने सर्वकालीन उच्चांकी पातळीवरून १० टक्क्यांनी घसरण झाल्याने अमेरिकेच्या फ्युचर्समध्ये घसरण झाली. आशियाखंडात निक्केई आणि टोपिक्स मध्ये तब्बल ७ टक्क्यांची घसरण झाल्याने जपानच्या बाजारपेठांना फटका बसला.



अमेरिकेतील मंदीची भीती वाढल्याने, तसेच पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे निर्देशांक आणि निफ्टीमध्ये सोमवारी सुरुवातीच्या व्यवहारात ३ टक्क्यांपर्यंत घसरण झाली. अमेरिकेतील मंदीच्या भीतीमुळे जागतिक स्तरावरील गुंतवणूकदारांच्या जोखीम घेण्याच्या क्षमतेला मोठा धक्का बसला. जुलै महिन्यातील पगाराची आकडेवारी जाहीर झाली. यात अमेरिकेतील बेरोजगारीचा दर जूनमधील ४.१ टक्क्यांवरून, गेल्या महिन्यात ४.३ टक्क्यांवर पोहोचला आहे. बेरोजगारीच्या दरात जुलैमध्ये सलग चौथ्या मासिक वाढीची नोंद झाली. अमेरिकेत रोजगाराच्या संधी कमी झाल्याने आणि अमेरिकेतील बेरोजगारीचा दर ४.३ टक्क्यांपर्यंत वाढल्याने अमेरिका मंदीकडे वाटचाल करत असल्याचे मानले जाते. ब्लूमबर्गच्या अहवालानुसार, गोल्डमन सॅक्सच्या अर्थतज्ज्ञांनी पुढील १२ महिन्यांत अमेरिकेत मंदीची शक्यता १५ टक्क्यांवरून २५ टक्क्यांवर नेली आहे. मंदीच्या भीतीमुळे यंदा अमेरिकेच्या मध्यवर्ती बँकेकडून व्याजदरात कपात होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. या वर्षी सप्टेंबर, नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये व्याजदरात कपात करू शकते. जेपी मॉर्गनच्या तज्ज्ञांनी सप्टेंबरमध्ये आणि नोव्हेंबरमध्ये दरकपातीची अपेक्षा ठेवली आहे.

इस्रायलने हमासचा म्होरक्या इस्माईल हनिया यांची हत्या केल्यानंतर, इराणने त्याचा बदला घेण्याचा निर्धार केला आहे. इस्रायल तसेच इराण हे दोघेही आपल्या भूमिकेवर ठाम असल्यामुळे युद्धाची शक्यता वाढली आहे. इस्रायल-हमास संघर्षात इराण ओढला गेला, तर त्याचा बाजारावर जोरदार परिणाम होईल. भारतीय शेअर बाजाराचे सध्याचे मूल्यांकन उंचावलेले असून, बाजार निरोगी सुधारणेसाठी सज्ज असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. विशेषतः मिड कॅप आणि स्मॉल कॅप सेगमेंटमध्ये ते जास्त गरजेचे आहे. संरक्षण आणि रेल्वे सारख्या बाजारपेठेतील ओव्हरव्हॅल्यूड सेगमेंट दबावाखाली येण्याची शक्यता आहे. या तीन कारणांमुळे सोमवारी भारतीय बाजारांवर दडपण आणले आणि त्यात घसरण पहायला मिळाली.

## » Selected

### बांगलादेशात मंदिरांची मोडतोड

**ढाका** : बांगलादेशात रविवारी झालेल्या हिंसाचारात १०० हून अधिक जणांचा मृत्यू झाला. या हिंसाचारात एका हिंदू नगरसेवकाचाही मृत्यू झाला. रंगपूर शहराचे नगरसेवक हरधन रॉय हारा यांच्या घरावर आंदोलकांनी हल्ला केला आणि त्यांची हत्या करण्यात आली. त्याचबरोबर हिंदूंची मंदिरे आणि त्यांच्या घरांनाही लक्ष्य केले जात असल्याची माहिती समोर येत आहे. इस्कॉन आणि काली मंदिरातही आंदोलकांनी तोडफोड केली आणि भाविकांवर हल्ले केले. हरधन रॉय हे रंगपूर शहरातील प्रभाग क्रमांक चारमधून परशुराम ठाणे अवामी लीग पक्षाचे नगरसेवक होते. रविवारी काजल रॉय नावाच्या एका नगरसेवकाचीही हत्या करण्यात आली. पंतप्रधान शेख हसीना यांच्या राजीनाम्यावर आंदोलक ठाम आहेत. आरक्षणाच्या निषेधार्थ सुरू झालेल्या हिंसाचाराला राजकीय रंगही मिळाला आहे. सरकारचे समर्थक आणि विरोधक यांच्यात हिंसक झटापट होत आहे. या हिंसाचारात आतापर्यंत ३०० हून अधिक नागरिकांनी आपला जीव गमवावा लागला आहे. बांगलादेशात हिंसाचाराच्या नव्या घटना घडत असल्याच्या पार्श्वभूमीवर, भारताने बांगलादेशात राहणाऱ्या आपल्या नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला आहे. तसेच सूचना मिळेपर्यंत बांगलादेशात जाऊ नये, असे आवाहन केले आहे.

## एससी, एसटी आरक्षण उपकोटा

# २१ तारखेला भारत बंद?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** गेल्या आठवड्यात सर्वोच्च न्यायालयाने एससी आणि एसटी आरक्षणात उपकोटा निश्चित करण्यास मान्यता दिली होती. एससी आणि एसटी प्रवर्गातील जात अधिक मागास आहे, असे राज्य सरकारांना वाटत असेल, तर त्यासाठी उपकोटा निश्चित करता येईल, असे न्यायालयाने म्हटले होते. इतकेच नाही तर ७ न्यायाधीशांच्या घटनापीठाने ४-३ च्या बहुमताने एससी आणि एसटीमध्येही क्रीमी लेयरची ओळख पटवावी, असे म्हटले होते.

या प्रवर्गातील क्रीमी लेअरअंतर्गत येणाऱ्यांना आरक्षणाचा लाभ मिळू नये. त्याऐवजी त्याच समाजातील



गरिबांना प्राधान्य द्यायला हवे, असे न्यायालयाने म्हटले. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे एका वर्गाने स्वागत केले आहे, तर दलित समाजातील एका मोठ्या वर्गात खळबळ उडाली आहे.

गेल्या दोन दिवसांपासून ट्विटरवर याविरोधात सातत्याने ट्रेंड सुरू आहे. इतकेच नाही तर अनेक दलित संघटनांनी २१ ऑगस्टला भारत बंदची हाक दिली आहे. विशेषत: बसपा प्रमुख मायावती यांनीही याला विरोध केला आहे. अशा प्रकारे आरक्षणच संपवण्याचे षडयंत्र रचले जात आहे, असा आरोप त्यांनी केला आहे. मायावती म्हणाल्या की, यामुळे सरकार आपल्या मनातील कोणत्याही जातीला आरक्षण देऊ शकतील आणि त्यांचे राजकीय हित साधता येईल. असा निर्णय योग्य नाही. इतकेच नाही तर क्रीमी लेअरबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयालाही त्यांनी विरोध केला.

मायावती म्हणाल्या की, दलित समाजातील १० टक्के गरजुंना लाभ मिळाला हे खरे आहे. ते पदांवर पोहोचले आहेत, पण आरक्षणाचा लाभ त्यांच्या मुलांकडून हिरावून घेता येणार नाही. दरम्यान, भाजप आणि काँग्रेसने याबाबत कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

# पुन्हा मुसळधार पावसाचा इशारा!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** महाराष्ट्र, दिल्ली, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, जम्मू-काश्मीर, पंजाब आणि हरयाणामध्ये पुढील पाच दिवस पावसाचा जोर कायम राहील, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. मध्य प्रदेश, गुजरात, महाराष्ट्रातील अनेक भागात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. हिमाचल प्रदेशात मुसळधार पाऊस आणि ढगफुटीच्या घटनांमुळे यापूर्वीच ८७ रस्ते बंद झाले आहेत. त्याचबरोबर गेल्या पाच दिवसांत दरड कोसळण्याचे प्रमाण वाढले आहे.

हिमाचल प्रदेशात ८ ऑगस्टपर्यंत मध्यम स्वरूपाचा पाऊस आणि वादळी वाऱ्याचा इशारा देण्यात आला आहे. हिमाचल प्रदेशात गेल्या आठवड्यात झालेल्या भूस्खलनात



मृतांचा आकडा अनुक्रमे २२१ आणि १३ वर पोहोचला आहे, तर उत्तराखंडच्या केदारनाथ यात्रेच्या पायथ्याशी अडकलेल्यांसह ३७० हून अधिक लोकांना वाचविण्यात आले आहे. केदारनाथ, भीमबली आणि गौरीकुंड येथून आतापर्यंत १० हजारांहून अधिक लोकांना वाचवण्यात आले आहे. गेल्या बुधवारी लिंचोलीजवळील जंगलचट्टी येथे ढगफुटीमुळे केदारनाथ यात्रेकडे जाणाऱ्या मार्गाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.

मुसळधार पाऊस आणि खडकवासला धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या विळख्यात अडकलेल्या रहिवासी भागात लष्कराचे जवान तैनात करण्यात आले आहेत. पुणे विभागातील खडकवासला, मुळशी, पवना आदी धरणांतून पाणी सोडण्यात येत असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अधिकाऱ्यांना सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत. याशिवाय गरज पडल्यास राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ), राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ) आणि लष्कराच्या मदतीने धोकादायक भागातील लोकांना सुरक्षित स्थळी हलविण्यासाठी पावले उचलण्यात यावीत, असे निर्देशही देण्यात आले आहेत. पुणे जिल्ह्यातील खडकवासला धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या पंधरवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे रविवारी धरणातून ३५ हजार क्युसेक (घनफूट प्रतिसेकंद) पाण्याचा विसर्ग करण्यात आला.

जम्मू-काश्मीरमधील गांदरबल जिल्ह्यात ढगफुटीमुळे आलेल्या पुरामुळे काही इमारतींचे नुकसान झाले आहे, तर श्रीनगर-लेह राष्ट्रीय महामार्ग बंद करण्यात आला आहे. महामार्ग बंद झाल्याने काश्मीर खोऱ्याचा लडाखशी संपर्क तुटला असून, अमरनाथ यात्रेसाठी असलेल्या बालटाल बेस कॅम्पवरही परिणाम झाला आहे. झारखंडमध्ये मुसळधार पावसामुळे राज्यातील काही नद्यांना पूर आला असून पूर्व सिंहभूम जिल्हा प्रशासनाने सखल भागात राहणाऱ्या लोकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. गुजरातमधील वलसाडमध्येही पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. तर झारखंडच्या पूर्व सिंहभूम जिल्ह्यात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. नद्यांना पूर आला आहे.

## पाक सीमेवर लष्कराचा गोळीबार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जम्मू :** जम्मू-काश्मीरमधील अखनूर आणि सुंदरबनी भागात पाकिस्तानच्या सीमेवर लष्कराने सोमवारी गोळीबार केला. या भागात घुसखोरांचे दोन गट संशयास्पदरित्या फिरत असताना, गोळीबार सुरू करण्यात आला. मात्र, घुसखोरांकडून गोळीबार झाला नाही. सीमेपलीकडून होणारी घुसखोरी रोखण्यासाठी दोन्ही भागात मोठ्या प्रमाणात शोधमोहीम सुरू करण्यात येत आहे.

ड्रोनद्वारे या भागावर लक्ष ठेवण्यात येत असून, सीमेला घेराव घालण्यासाठी अतिरिक्त फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. सकाळ होताच शोधमोहीम सुरू करण्यात आली. रात्री दीडच्या सुमारास तीन ते चार जणांच्या संशयास्पद हालचाली दिसल्या. यानंतर गोळीबार केला.

## पीडितांना ईडी पैसे परत करणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालय आता घोटाळ्यातील पीडितांना पैसे परत करण्याच्या तयारीत आहे. कोलकात्यात १२ कोटी रुपये वाटून त्याची सुरुवात केली जाणार असल्याचे सांगितले जाते. लोकसभेच्या प्रचारावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले होते की, ईडीने जप्त केलेल्या मालमत्तेत पीडितांना मदत करण्यासाठी कायदा केला जात आहे. हे आश्वासन आता पूर्ण होत आहे.

कोलकात्यातील रोज व्हॅली ग्रुप ऑफ कंपनीजची ११.९९ कोटी रुपयांची एफडी केंद्रीय एजन्सी २२ लाख लोकांना वितरित करणार आहे. मोठ्या परताव्याचे आमिष दाखवून आरोपी कंपन्यांनी या ठेवीदारांना पैसे जमा केले होते. पीएमएलए कोर्टाने २४ जुलै रोजी ईडीला जप्त केलेल्या १४ एफडी मालमत्ता विल्हेवाट समितीकडे (एडीसी) हस्तांतरित करण्यास सांगितले होते. ते पैसे आता पीडितांना दिले जाणार आहेत.

## भारतीय पासपोर्टमुळे व्हिसा लगेच

# या देशांमध्ये सहज प्रवेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जगातील जवळपास निम्म्या देशांनी भारतीय पर्यटकांसाठी व्हिसा प्रक्रिया अतिशय सोपी केली आहे. भारतीय पासपोर्टधारकांसाठी या देशांची प्रवास प्रक्रिया अत्यंत सोयीस्कर झाली आहे. परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, सध्या १६ देशांनी व्हिसामुक्त प्रवेश, ४० देशांकडे व्हिसा ऑन अराइव्हल आणि ४७ देशांनी ई-व्हिसा सुरू केला आहे. भारतीयांचा प्रवास सुकर व्हावा यासाठी उर्वरित जगाने पुढे यावे, यासाठी परराष्ट्र मंत्रालय सातत्याने प्रयत्नशील आहे.

व्हिसा प्रक्रियेसाठी वरील सुविधा पुरविणे हा देशाचा स्वतःचा विषय असला, तरी भारताशी त्याचे संबंध कसे आहेत, यावरही ते बऱ्याच अंशी अवलंबून आहे, असे परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. जसजसा भारत इतर देशांच्या



जवळ येत आहे, तसतशी सुलभ व्हिसा सुविधा देणाऱ्या देशांची संख्या वाढत आहे. अनेक देशांशी चर्चा सुरू असून, या वर्षाच्या अखेरपर्यंत आणखी काही देशांचा या यादीत समावेश होऊ शकतो.

थायलंड, भूतान, हाँगकाँग, मालदीव, मॉरिशस या देशांमध्ये व्हिसामुक्त प्रवासाचा समावेश आहे. अनेक देश ई-व्हिसा आणि व्हिसा ऑन अराइव्हल दोन्ही देतात. व्हिएतनाम, रशिया, संयुक्त अरब अमिराती, अझरबैजान, कझाकस्तान, किर्गिझस्तान, अर्जेंटिना, बहरीन, मलेशिया, न्यूझीलंड, ओमान, सिंगापूर, दक्षिण कोरिया, तैवान, युगांडा, उझबेकिस्तान आदी देशांनी ई-व्हिसा सुविधा दिली आहे. अराइव्हल व्हिसा सुविधा देणाऱ्या देशांमध्ये फिजी, इंडोनेशिया, इराण, जमैका, जॉर्डन, नायजेरिया, कतार, झिम्बाब्वे, ट्युनिशिया आदी देशांचा समावेश आहे.

व्हिसा-फ्री, अराइव्हल व्हिसा किंवा ई-व्हिसाची सुविधा मुळात टूरिस्ट व्हिसाला लागू आहे. देशात १५ दिवसांपासून जास्तीत जास्त ३ महिन्यांपर्यंत राहण्याची परवानगी आहे. व्हिसा प्रक्रिया सोपी करण्याचा फायदा म्हणजे दूतावासाकडून नियमित व्हिसा मिळविण्याच्या प्रक्रियेत लागणारा वेळ वाचतो. ई-व्हिसा, अरायव्हल व्हिसाची प्रक्रिया सोपी आहे. यामध्ये अरायव्हल व्हिसा घेताना विहित कागदपत्रे एकतर अपलोड करावी लागतात किंवा सादर करावी लागतात, त्या आधारे तात्काळ व्हिसा मिळतो.

## ज्वालामुखीचा उद्रेक

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



माऊंट एटना : येथील ज्वालामुखीचा उद्रेक झाला. या ज्वालामुखीतून लाव्हा तसेच वाफ मोठ्या प्रमाणावर बाहेर येत आहे.

## भारतात आश्रय घेतल्याचा दावा

# शेख हसीना यांचा राजीनामा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बांगलादेशमधील हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्या देश सोडून भारतात सुरक्षित स्थळी रवाना झाल्या आहेत. शेख हसीना सोमवारी दुपारी २.३० वाजता बंगाभवन येथून लष्कराच्या हेलिकॉप्टरने रवाना झाल्या. त्यांच्यासोबत त्यांच्या धाकटी बहीण शेख रेहाना होत्या. त्यांना "सुरक्षित स्थळी" नेण्यात आल्याचे वृत्त बांगलादेशमधील मीडियांनी दिले आहे.

दरम्यान, "पंतप्रधान शेख हसीना यांनी राजीनामा दिला आहे. आता अंतरिम सरकार देश चालवणार आहे." अशी पुष्टी बांगलादेशाच्या लष्करप्रमुखांनी



केली असल्याचे वृत्त रॉयटर्सने दिले आहे.

सरकारी नोकऱ्यांमध्ये ३० टक्के आरक्षणाच्याविरोधात झालेल्या आंदोलनात बांगलादेशमधील आतापर्यंत सुमारे ३०० लोकांचा मृत्यू झाला आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान शेख हसीना यांनी राजीनामा दिला असून त्या देश सोडून भारतात सुरक्षित ठिकाणी रवाना झाल्या आहेत

माध्यमातील वृत्तानुसार, सोमवारी दुपारी अडीचच्या सुमारास शेख हसीना या आपली धाकटी बहीण शेख रेहाना सोबत लष्करी हेलिकॉप्टरने बंगभवनहून सुरक्षित स्थळी रवाना झाल्या. लष्करप्रमुखांनी पत्रकार परिषद घेऊन त्यांच्या राजीनाम्यावर शिक्कामोर्तब केले. ते म्हणाले की, देश चालवण्यासाठी अंतरिम सरकार स्थापन केले जाईल. हिंसक निदर्शनांमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसला आहे, असेही ते म्हणाले.

## कायद्यात बदल करण्यासाठी विशेष प्रयत्न

# केंद्र सरकारचा वक्फ बोर्डावर प्रहार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने वक्फ बोर्डाच्या अधिकारांवर गदा आणण्याची तयारी सुरू केली आहे. १९९५ मध्ये पीव्ही नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सरकारने वक्फ कायद्यात बदल करून वक्फ बोर्डाची ताकद वाढवली होती.

देश स्वतंत्र झाल्यानंतर सात वर्षांनी म्हणजे १९५४ मध्ये पहिल्यांदा वक्फ कायदा संमत करण्यात आला. तेव्हा देशाचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू होते आणि त्यांच्या सरकारने वक्फ कायदा आणला. मात्र, नंतर तो रद्द करण्यात आला. वर्षभरानंतर १९५५ मध्ये पुन्हा नवा वक्फ कायदा आणण्यात आला. यामध्ये वक्फ बोर्डांना अधिकार देण्यात आले होते. त्यानंतर नऊ वर्षांनी म्हणजे १९६४ मध्ये केंद्रीय वक्फ कौन्सिलची स्थापना करण्यात आली, जी अल्पसंख्याक




मंत्रालयाच्या अखत्यारित होती. वक्फ बोर्डाशी संबंधित कामकाजाबाबत केंद्राला सल्ला देणे हे त्याचे काम आहे.

वक्फ कौन्सिलच्या स्थापनेनंतर सुमारे ३० वर्षांनी म्हणजे १९९५ मध्ये पीव्ही नरसिंह राव सरकारने पहिल्यांदा वक्फ कायद्यात बदल केले. त्या दुरुस्तीनंतर वक्फ बोर्डाला जमीन संपादनाचे अमर्याद अधिकार देण्यात आले.

वक्फ बोर्ड (कायदा) कायदा १९९५ रद्द करण्याचे खासगी विधेयक ८ डिसेंबर २०२३ रोजी राज्यसभेत मांडण्यात आले. उत्तर प्रदेशचे खासदार हरनाथसिंह यादव यांनी हे विधेयक मांडले. राज्यसभेत या विधेयकावरून वाद निर्माण झाला होता आणि त्यावेळी या विधेयकासाठी मतदानही झाले होते. तेव्हा ५३ सदस्यांनी विधेयक मांडण्याच्या बाजूने, तर ३२ सदस्यांनी विरोधात मतदान केले. त्यावेळी भाजप खासदार म्हणाले होते की, 'वक्फ बोर्ड कायदा १९९५' समाजात द्वेष आणि द्वेष निर्माण करतो.

सध्या वक्फ बोर्डाकडे ८ लाख ६५ हजार ६४४ स्थावर मालमत्ता आहेत. अल्पसंख्याक मंत्रालयाने डिसेंबर २०२२ मध्ये लोकसभेत याबाबत माहिती दिली होती. मात्र, सर्वात वादग्रस्त मुद्दा वक्फच्या अधिकारांचा आहे. कारण वक्फ कायद्याच्या कलम ८५ मध्ये बोर्डाच्या निर्णयाला न्यायालयात आव्हान देता येणार नाही, यावर भर देण्यात आला.

वक्फचा वाद इंग्रजांच्या काळातील आहे. वक्फ मालमत्तेच्या ताब्याचा वाद लंडनमधील प्रिव्ही कौन्सिलपर्यंत पोहोचला. ब्रिटिश राजवटीत ब्रिटनमध्ये न्यायाधीशांचे खंडपीठ बसले आणि त्यांनी ते बेकायदेशीर ठरवले, परंतु ब्रिटिश भारत सरकारने ते मान्य केले नाही आणि ते वाचविण्यासाठी १९१३ मध्ये नवा कायदा आणला. वक्फ हा अरबी शब्द आहे. ज्याचा अर्थ देवाच्या नावाने अर्पण केलेली गोष्ट. वक्फ बोर्डाकडे जंगम आणि स्थावर मालमत्ता आहे. या मालमत्तांच्या देखभालीसाठी राष्ट्रीय व राज्य स्तरावर वक्फ बोर्ड आहे. वक्फ बोर्डाला दान केलेली मालमत्ता गरिबांना मदत करते. वक्फकडे देशात ८ लाख एकरपेक्षा जास्त मालमत्ता असल्याचे आकडेवारी सांगते. यातील पहिले नाव उत्तर प्रदेशातील आहे. पश्चिम बंगाल दुसऱ्या तर पंजाब तिसऱ्या स्थानावर आहे.

#रा

**सणसवाडीच्या कंपनीतील स्टील दोघांनी लांबवले** : सणसवाडी ता. शिरुर येथील बी यु भंडारी इंडस्ट्रीज येथील थर्मो डायनामिक्स इंडस्ट्रीज कंपनीतील महागडे स्टील दोघा चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना घडली असताना दोघा चोरट्यांचा चोरीचा थरार सीसीटीव्ही मध्ये कैद झाल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे दोघा अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# श्रावणी सोमवार जिल्ह्यात सर्वत्र भक्तिभावात साजरा

छायाचित्र: विजय लोखंडे

## पांडवकालीन पांडेश्वर मंदिरात शिवभक्तांची गर्दी...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**सासवड/ जेजुरी:** पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागांतील कऱ्हे काठावरील शिल्प कलेचा उत्तम नमुना असणाऱ्या पुरातन पांडवकालीन पांडेश्वर शिव मंदिरात आज प्रथम श्रावणी सोमवारच्या निमित्ताने दिवसभर भाविकांनी दर्शनाला गर्दी केली होती. पहाटे चार वाजता पुजारी मंडळींनी महापुजा केल्यावर सांप्रदायिक भजनाच्या समवेत भाविकांकडून अभिषेक करण्यात आले. सहा वाजता महाआरती झाली दिवसभर पांडेश्वर व पंचक्रोशितील भाविकांनी दर्शनासाठी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. चासकमानचे स्वामी शिवदत्त महाराज यांच्या उपस्थितीत येथील शिवभक्त लालाअण्णा जगताप यांनी भाविकांना फराळ वाटप केले

सिंहासनाधिष्ट भव्य पुरातन शिवलिंग, गणेशगया क्षेत्र गणपती, कुंतीमाता मंदिर, शिवकालीन ओवऱ्या, उंच असा मिनार. दगडी सभामंडप व वटवृक्ष अशा स्वरुपातील मंदिर परिसर आज दिवसभर भक्ती रसात न्हाऊन

निघाला.. फुलांची आकर्षक सजावट, विद्युत रोषणाई, सुंदर रांगोळ्या, ध्वनीक्षेपका वरील भक्तीगीते यामुळे येथील वातावरण आज शिवमय होऊन गेले होते



वाघोली येथील वाघेश्वर देवस्थान मंदिर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाघोली:** वाघोली येथील वाघेश्वर मंदिराच्या बाहेरील दगडी कामाच्या वज्रलेपाचे काम मागील एक महिन्यापूर्वी सुरु करण्यात आलेले काम पूर्णत्वाकडे आले आहे. श्रावण महिन्याच्या पहिल्या सोमवारी काम पूर्ण होणार असून भाविकांना वाघेश्वराच्या दर्शनासाठी खुले करण्यात येणार असल्याची माहिती वाघेश्वर मंदिर विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र सातव पाटील दिली आहे.

पुणे-नगर महामार्गावर असलेल्या वाघोली गावाला स्वंयभू पुरातनकालीन वाघेश्वर मंदिर हे वाघोली गावास ऐतिहासिक वारसा म्हणून लाभले आहे. वाघोली विकास प्रतिष्ठाणच्या वतीने अतिशय चांगल्या पद्धतीने मंदिराची देखभाल केली जाते. पंचक्रोशीतील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या या मंदिराच्या बाहेरील दगडी कामाला वज्रलेप करण्याचे काम प्रतिष्ठाणने २२ जून रोजी हाती घेतले होते. दरम्यान वज्रलेपाच्या कामासाठी भाविक भक्तांनी सढळ हाताने मदत करावी असे आवाहन वाघोली विकास प्रतिष्ठाणचे अध्यक्ष राजेंद्र सातव पाटील, उपाध्यक्ष रामभाऊ दाभाडे यांच्यासह प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले होते.

आवाहनाला प्रतिसाद देत भाविकांनी सढळ हातानी मदत केली असून मंदिराच्या वज्रलेपाचे काम सोमवार पर्यंत पूर्ण होत आहे.

» Selected



आ संजय जगताप यांच्या हस्ते सपत्नीक आरती करण्यात आली

## सिध्देश्वर मंदीरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**सासवड:** पुरंदरच्या पश्चिमेकडील निसर्ग सौंदर्याने नटलेल्या अशा सिध्देश्वर मंदीरात आज श्रावणी सोमवार रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते सकाळी महारुद्र अभिषेक घालण्यात आला फुलांची सजावट संदिप टिळेकर सर स्वर्गीय अशोक रामचंद्र जगताप यांच्या स्मरणार्थ*श्री अतुल अशोकराव जगताप* व संदीप बबनराव मेरुकर* यांच्या वतीने संपूर्ण सजावट व महाप्रसाद फराळाचे आयोजन केले होते आ संजय जगताप यांनी सपत्नीक अभिषेक व आरती करून मंदिर परिसरात विकास कामांचा आढावा घेतला दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती

# राज्यपाल नियुक्त विधान परिषदेची उमेदवारी प्रदीप गारटकर यांना द्यावी

## स्वतः आमदार भरणे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना कार्यकर्त्यांसह दिले निवेदन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**इंदापूर :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पुणे जिल्हा अध्यक्ष प्रदीप गारटकर यांचे सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, सहकार, कला-क्रीडा क्षेत्र व विशेषतः दिव्यांग क्षेत्रात भरीव योगदान आहे. त्यांचे संघटन कौशल्य राज्यभर परिचित आहे. सन १९८२ पासून पतित पावन संघटना भारतीय जनता पार्टी - शिवसेना आणि सन २००६ नंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून तब्बल ४२ वर्षे सार्वजनिक जीवनात कार्यरत आहेत. त्यांचे राजकीय जीवन संघर्षमय आहे. गेली १८ वर्षे आपले नेतृत्व स्वीकारून अत्यंत प्रभावीपणे पक्ष संघटन मजबूत करण्याचे काम करीत आहेत. त्यांनी गोरगरीब, उपेक्षित घटकांसाठी अनेक वर्षे संघर्ष केला असल्याने, त्यांना राज्यपाल नियुक्त विधान परिषदेची उमेदवारी द्यावी अशी मागणी खुद्द आमदार दत्तात्रय भरणे यांनी कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन देवून मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केले आहे कि, राजकारणाबरोबरच अनेक क्षेत्रात काम करीत असताना, सद्गुरू वामनराव पै. यांच्या जीवनविद्या मिशनच्या माध्यमातून आध्यात्मिक क्षेत्रामध्ये त्यांचा वावर आहे. वारकरी संप्रदाय आणि इतरही अनेक आध्यात्मिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या अनेक संस्थाशी त्यांची जवळीक आहे. त्याचप्रमाणे समर्थ व्यायाम मंडळ संचलित मुकबधीर, मतीमंद, अपंग शाळेची उभारणी करून ही शाळा गेली ३० वर्षे त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत आहे. गेल्या २ वर्षापूर्वी महाराष्ट्र राज्यातील सर्व दिव्यांगाच्या शाळामधील मुला-मुलींच्या भव्य राज्यस्तरीय क्रीडा या संस्थेच्या माध्यमातून स्पर्धा बालेवाडी, पुणे येथे आयोजित केल्या होत्या.

राज्यपालनियुक्त विधानपरिषदेची संधी आप ल्या पक्षाने दिल्यास त्यांच्यावर विविध क्षेत्रातील प्रेम करणारे असंख्य चाहते खुश होतीलच, पण त्यांचे विरोधक देखील खुष होतील आणि संघटनेचे बळ निश्चित वाढेल अशी आम्हाला खात्री वाटते.

### पुणे जिल्ह्यात वाढेल राष्ट्रवादीची ताकद

● आपल्या पुणे जिल्हयामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची ताकद आहेच, पण मागील विधानसभा निवडणूकीच्या वेळी ग्रामीण भागातून सात आमदार व एकाचे दोन खासदार करण्यासाठी प्रदीप गारटकर यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. पक्ष दुभंगल्यानंतर आपल्याबरोबर आलेल्या जिल्हयातील पदाधिकारी-कार्यकर्त्यांमध्ये गारटकर यांच्या इतका सामाजिक क्षेत्रात, राजकीय क्षेत्रात अनुभव असलेला व स्वतःचे गुडवील असलेला कार्यकर्ता आपल्या पाठीशी असणे हे समाजामध्ये निश्चित भूषणावह असणार आहे. आपण राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून देशाची जबाबदारी सांभाळत असणारा आपला स्वतःचा असलेला पुणे जिल्हा हा योग्य व विश्वासू कार्यकर्त्यांच्या हाती सोपविणे महत्वाचे आणि गरजेचे आहे. असे आम्हाला वाटते. आजवर गारटकर यांनी केलेला संघर्ष हा एकाकी होता, जर आपले पाठबळ व विधानपरिषदेच्या आमदारांची ताकद त्यांच्या पाठीशी उभी राहिली तर श्री. प्रदीप गारटकर यांच्या माध्यमातून पक्षाची ताकद वाढण्यास नक्कीच उपयोग होईल.

## जेजुरी नगरीचे ग्रामदैवत श्री नागेश्वर मंदिरचा प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न



**जेजुरी :** श्रीक्षेत्र जेजुरी नगरीचे ग्रामदैवत श्री नागेश्वर मंदिराचे नूतनीकरणा निमित्त प्राणप्रतिषठापना सोहळा विविध धार्मिक उपक्रमांनी संपन्न झाला. जेजुरी शहर समस्त नाभिक बांधव व ग्रामस्थांच्या वतीने सोमवार दिनांक ५ ऑगस्ट रोजी श्री नागेश्वर देवतेच्या नूतनमंदिरा निमित्त प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने मंदिर गृहप्रवेश,पुण्यहावाचन, मातृका पूजन, नांदी श्राद्ध,नवग्रह पूजन, वास्तू पीठ पूजन,मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व अभिषेक पूजन,होम हवन,पूर्णाहुती या धार्मिक विधींचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्या निमित्त दूध व खिचडीचा महाप्रसादाचे भाविकांना वाटप करण्यात आले. या धार्मिक सोहळ्यासाठी पुरंदर हवेलीचे आमदार संजय जगताप यांच्या हस्ते धार्मिक विधी करण्यात आले. जेजुरी नगर परिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त ईंगुले यांचा यावेळी सहकार्याबद्दल सन्मान करण्यात आला. या धार्मिक कार्यक्रमासाठी माजी नगराध्यक्षा वीणा सोनवणे,माजी नगरसेवक रुक्मिणी जगताप,सचिन सोनवणे,महेश दरेकर,बाळासाहेब सातभाई,अजिंक्य देशमुख, रवींद्र जोशी,हेमंत सोनवणे ईश्वर दरेकर,सामाजिक कार्यकर्ते सचिन खोमणे संभाजी काळाने आदी उपस्थित होते.

# नाझरेतील पाणी; जेजुरीला मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**जेजुरी :** जेजुरी शहरात आजही तीव्र पाणी टंचाई असून आठ ते दहा दिवसांनी नागरिकांना पाणी पुरवठा केला जातो. नाझरे धरणात 75 टक्क्यांहून अधिक पाणी साठा निर्माण झाला असून नाझरे धरणाचे पाणी जेजुरी शहराला त्वरित द्यावे अशी मागणी आमदार संजय जगताप यांच्या सूचनेनुसार जेजुरी पालिकेचे मुख्याधिकारी यांच्याकडे माजी नगराध्यक्षा वीणा सोनवणे व काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

गेली वर्षभर पाणी टंचाईला जेजुरी कर नागरिकांना सामोरे जावे लागले आहे. नाझरे धरणातील पाणी साठा संपुष्टात आल्यानंतर मांडकी योजनेतून शहराला पाणी पुरवठा केला जात होता.मात्र या योजनेची क्षमता कमी असल्याने आठ ते दहादिवसातून पाणी दिले जात असल्याने आजही शहरात पाणी भेडसावत आहे. गेली आठ ते दहा दिवसात झालेल्या समाधान कारक पाऊस झाल्याने नाझरे धरणात पाणी साठा उपलब्ध झाला आहे. या पाण्याची तपासणी करून धरणातून पाणी उचलून दोन दिवसाआड पाणी पुरवठा करावा अशी मागणी माजी नगराध्यक्षा वीणा सोनवणे व काँग्रेस पक्षाने मुख्याधिकारी चारूदत्त इंगूले यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



शाळा व्यवस्थापन समितीचे नवनियुक्त अध्यक्ष,उपाध्यक्ष,सदस्य यांच्या सत्कार प्रसंगी मान्यवर.

# शाळा समितीच्या अध्यक्षपदी विठ्ठल गायकवाड;उपाध्यक्षपदी कोमल गायकवाड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाघोली :** कोलवडी-साष्टे (ता. हवेली) येथील गायकवाड वस्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी विठ्ठल गायकवाड व उपाध्यक्षपदी कोमल गायकवाड यांची बिनविरोध निवड पार पडली.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गायकवाड वस्ती येथे पालक सभा आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये सन २०२४ ते २०२६ साठी नवीन शाळा व्यवस्थापन समिती गठित करण्यात आली.यावेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष,उपाध्यक्ष,सदस्य पदांच्या सर्वानुमते बिनविरोध निवडी जाहीर करण्यात आल्या.यामध्ये समितीच्या अध्यक्षपदी विठ्ठल गायकवाड व उपाध्यक्षपदी कोमल गायकवाड तर सदस्य पदी संतोष मदने,नितीन गायकवाड, म्हस्कू गायकवाड, देवानंद शेंडगे, सुवर्णा गायकवाड, माधुरी गायकवाड, संध्या गायकवाड, आम्रपाली रोकडे,अमृता गायकवाड,ग्रां. पं,सदस्य रमेश मदने, शि क्षणतज्ञ स्वाती गायकवाड अशा नियुक्ती करण्यात आल्या.

शाळेच्या अडीअडचणी सोडवणे,शाळेची प्रगती साधने,शाळेचा विकास साधण्यासाठी प्रयत्न करणे,विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढ व प्रगतीकडे लक्ष देणे,आदी शाळे संदर्भात शाळा व्यवस्थापन समितीने एकत्रित येऊन कामे करणे, यासाठी शाळा व्यवस्थापन समितीने यापुढे लक्षपूर्वक कामे करणे गरजेचे आहे. नवनियुक्त अध्यक्ष,उपाध्यक्ष,सदस्यांचे आम्ही कोलवडी-साष्टे ग्रामपंचायतीच्या व ग्रामस्थांच्या वतीने अभिनंदन करीत आहोत.

**— रमेश मदने,उपसरपंच- ग्रामपंचायत कोलवडी-साष्टे**

निवड झाल्याबद्दल सर्वांचा सत्कार कोलवडी ग्रामपंचायतीचे उपसरपंच रमेश मदने यांच्या हस्ते संपन्न झाला.याप्रसंगी शिवशक्ती विकास सोसायटीचे चेअरमन शरद गायकवाड, माजी सरपंच बबन गायकवाड, माजी चेअरमन कैलास गायकवाड,अजित गायकवाड, राजू गायकवाड, गणेश गायकवाड ,लक्ष्मण गायकवाड आदी उपस्थित होते.

# चासकमान ९६ टक्के भरले : ३० हजार क्यूसेक्सने पाणी विसर्ग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** खेड तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यात संततधार पाऊस बरसत असल्याने 8.53 टीएमसी क्षमता असलेल्या चासकमान धरणाचे पाचही दरवाजे 160 सेंटीमीटरने उघडून धरणाच्या पाचही सांडव्याद्वारे भीमा नदीपात्रात 29790 हजार क्युसेकने विसर्ग सोडण्यात आला आहे.

धरणाच्या पाणलोट क्षेत्रांत जून, जुलै महिन्यामध्ये 488 मिलिमीटर पाऊस पडला होता; मात्र पावसाने ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीलाच 90 मिलिमीटर गाठली आहे. गतवर्षी याच कालावधीत पावसाने 250 मिलिमीटर गाठली होती.

चासकमान धरण 96.31 टक्के भरले असून, रविवारी (दि. 5) सकाळपासूनच धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाने दमदार बॅटिंग चालू ठेवल्याने भीमा नदी व आरळा नदीद्वारे चासकमान धरणात 25 हजार क्युसेक वेगाने पाण्याची आवक होत असल्याने दिवसभरात येणाऱ्या पाण्याचा कमी-जास्त अंदाज घेऊन वेळोवेळी धरणातून संध्याकाळी हा मोठा विसर्ग करण्यात येत आहे.

धरणाच्या कालव्याद्वारे 475 क्युसेकने विसर्ग सुरू असून, अतिवाहिनीद्वारे भीमा नदीपात्रात 375 क्युसेकने विसर्ग सुरू आहे, अशी माहिती उपअभियंता शुभम सुसुंदरे यांनी दिली.




## दुष्काळी समजले जाणारे गाव उपाययोजनांमुळे पाणीदार गाव अशी ओळख

# केंदूरचा तलाव भरल्याने ग्रामस्थांकडून जलपूजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

केंदूर ता. शिरुर येथील ठाकरवस्ती येथे जलपूजन करताना ग्रामस्थ.



**शिक्रापूर :** केंदूर ता. शिरुर हे दुष्काळी समजले जाणारे गाव मात्र ग्रामस्थांनी विविध उपाययोजना राबवत पाणीदार गाव अशी ओळख निर्माण केलेली असताना येथे काही तलाव देखील निर्माण केलेले असताना येथील ठाकरवाडी तलाव पूर्ण क्षमतेने भरल्याने ग्रामस्थांच्या वतीने जलपूजन करण्यात आले आहे.

केंदूर ता. शिरुर हे दुष्काळी समजले जाणारे गाव मात्र काही वर्षांपूर्वी ग्रामस्थांनी वृक्षलागवड, पाणी अडवा पाणी जिरवा यांसह आदी उपक्रम राबवत काही तलाव देखील निर्माण केले, सध्या मोठ्या प्रमाणात पाऊस होत असताना येथील ठाकरवाडीचा पिंपळखोरी पाझर तलाव पूर्ण क्षमतेने भरला असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत जलपूजन केले, यावेळी पोलीस पाटील सतीश गावडे, गणेश थिटे, उद्योगपती माऊली भालेकर, नवनाथ भालेकर, कुमार भालेकर, प्रकाश गावडे, अमोल गावडे, सोमनाथ जाधव, रमेश भालेकर यांसह आदी उपस्थित होते, यावेळी बोलताना प्रत्येकाने पाण्याचे महत्व लक्षात घेऊन पाण्याचे योग्य नियोजन करणे गरेजेचे असल्याचे पोलीस पाटील सतीश गावडे यांनी सांगितले तर गणेश थिटे यांनी सर्वांचे आभार मानले. #रा

## श्रावणानिमित्त सोमवारसह दररोज शिवपिंडीवर अभिषेक

# ज्योतिर्लिंग व जोतिबा उत्सव मुर्तींना नीरा स्नान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** पुरंदर तालुक्यातील गुळूंचे येथील काटेबारस यात्रेसाठी प्रसिद्ध असलेल्या श्री ज्योतिर्लिंग व श्री जोतिबा देवाच्या उत्सव मुर्तींना श्रावणा निमित्त नीरा नदीच्या पवित्र तिर्थात स्नान घालण्यात आले. तिर्थक्षेत्राचा 'ब' दर्जा असलेल्या गुळुंचे येथील ज्योतिर्लिंग मंदिरात श्रावण महिन्यातील सोमवार सह इतर दिवशी शिवपींडीवर अभिषेक करण्याची परंपरा आहे.

कार्तिक महिन्यातील एकादशीला ज्योतिर्लिंग व जोतिबा देवाच्या मुर्तींना यात्रेत निमित्त व श्रावण महिन्यातील पहिल्या सोमवारी नीरा नदीच्या तीर्थात स्नान घालण्याची परंपरा आहे. त्यानंतर महिनाभर मंदिरातील शिवपिंडीला अभिषेक घालण्याची परंपरा आहे.



गुळूंचे येथील श्री ज्योतिर्लिंग व श्री ज्योतिबा देवाच्या उत्सवमुर्ती नीरा नदीच्या पात्रात स्नान घातले.

सोमवारी (दि.५) सकाळी नऊच्या सुमारास कर्नलवाडीतील जोतिबा देवाच्या मुर्तीची आरती झाल्यावर उत्सव मुर्ती पालखीतून मंदिर प्रदक्षिणेनंतर फुलांनी सजविलेल्या रथात ठेवण्यात आल्या. साडेदहाच्या सुमारास गुळुंचेच्या ज्योतिर्लिंग मंदिरात आरती झाल्यावर उत्सव मुर्ती पालखीतून मिरवणूक काढून रथात ठेवण्यात आल्या. नीरा नदीला सोमवारी पुर आल्याने पैलतीरा वरील दत्तघाटावर जाता येत नव्हते. त्यामुळे रथ संत ज्ञानेश्वर महाराज पालखी विसाव्याच्या ठिकाणी थांबवण्यात आला. पालखीतील उत्सव मुर्ती नीरा स्नानासाठी मानकऱ्यांच्या ताब्यात देण्यात आल्या. ब्रिटीशकालीन पुलावरून सर्व शिवभक्त चालत गेले व पुलाशेजारीच पुराच्या वाहत्या पाण्यात उत्सव मुर्तींना मोठ्या भक्तिभावाने स्नान घालण्यात आले. या स्नान सोहळ्यासाठी युवकांसह ज्येष्ठांनी गर्दी केली होती. प्रत्येक भाविकाला स्वहस्ते स्नान घालण्याची संधी असल्याने शिवभक्त या संधीचा वर्षातून किमान एकदा तरी लाभ घेतात. स्नानानंतर मुर्ती पुन्हा पालखीत ठेवल्यावर आरती झाली. त्यानंतर वैशिष्ट्य पुर्ण असा गुळ शेंगदाण्याचा प्रसाद भाविक एकमेकांना देत होते.

सोमवारच्या नीरा स्नानानंतर दुपारी पालखी नीरेतील प्रसिद्ध वालचंद शहा पेढीच्या समोर दर्शनासाठी ठेवली होती. यावेळी परिसरातील शिवभक्तांनी मोठ्या श्रद्धेने दोन्ही मुर्त्यांचे दर्शन घेतले. दुपारी अडीचच्या सुमारास हा सोहळा नीरा बाजारपेठेतून वाजत गाजत गुळुंचेकडे मार्गस्थ झाला.

> "श्रावण महिन्यातील सोमवारसह इतर दिवशी सकाळी ज्योतिर्लिंग मंदिरातील शिवपींडीवर अभिषेक घालण्याची परंपरा आहे. युवकांसह जेष्ठ नागरिक मोठ्या श्रद्धेने अभिषेक घालतात. मागील काही वर्षांपासुन पुर्ण श्रावण महिन्यात दररोज सकाळी नऊ ते बारा वाजेपर्यंत अभिषेक घातले जात आहेत."
> — **गोरखभाऊ निगडे,** अध्यक्ष - ज्योतिर्लिंग मंदिर जिर्णोद्धार कमिटी.

## Selected

### राजगुरूनगर अग्निशमन दलात फायर बुलेट दाखल



**राजगुरूनगर :** येथील नगरपरिषद अग्निशमन दलात फायर बुलेट दाखल झाली असून यामुळे राजगुरूनगर शहर व परिसरातील अरुंद रस्त्यांच्या जागी देखील जलद गतीने पोहचून आगीवर नियंत्रण आणण्यात मोठी मदत होईल अशी माहिती राजगुरूनगर नगरपरिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांनी दिली. अग्निशमन दलाचे अत्याधुनिकीकरण करणे, त्यामध्ये जलदता आणणे, कमी खर्चामध्ये, कमी मनुष्यबळामध्ये घटनास्थळापर्यंत तात्काळ पोहोचविण्यासाठी यंत्रणा निर्माण करणे हा उद्देश समोर ठेवून या फायर बुलेटची रचना करण्यात आली आहे. रॉयल एनफिल्ड 350 सीसीची बुलेट मॉडीफाईड करण्यात आली असून यामध्ये दोन फोम सिलेंडर ज्याची क्षमता नऊ लिटरची आहे,बसविण्यात आले आहेत.

पान १ वरून

### २७ ऑगस्ट रोजी बाजारपेठा बंद

अँड ट्रेड (मुंबई), दि ग्रेन, राईस अँड ऑईल सीडस् मर्चेंटस् असोसिएशन (मुंबई), दी पूना मर्चंटस चेंबर (पुणे) या संघटनाचे प्रतिनिधी परिषदेत सहभागी झाले होते. अन्नधान्यावर वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) लागू करण्यात आल्याने बाजार समितीकडून आकारण्यात येणारा नियमन कर (सेस) रद्द करण्यात यावा, जीएसटी कायदा सुटसुटीत करुण्यात यावा, यासह विविध मागण्यासाठी राज्यभरातील व्यापाऱ्यांकडून २७ ऑगस्ट रोजी बाजारपेठा बंद ठेवण्यात येणार आहे, असा इशारा महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीकडून देण्यात आला.

### वाहनावर दिवा लावल्यास कारवाई!

आणि तरीही गाडीवर दिवा असेल, तर त्या आधिकाऱ्यावर कारवाई करण्यात येणार आहे. मंत्रालयातील अधिकाऱ्यांच्या आणि बाहेरुन येणाऱ्या अधिकाऱ्यांच्या गाड्यांवर असणाऱ्या दिव्यांची पाहणी करण्यासाठी मुंबई पोलिसांचे विशेष पथक आहे. गाडीवर दिवा लावण्याची परवानगी नसल्यास, त्या अधिकाऱ्यावर गुन्हा देखील दाखल होऊ शकतो. जिल्हाअधिकारी आणि सचिव यांच्या गाड्यांवरचे दिवे काढायला सुरुवातही झाली आहे.

### बांगलादेश सीमेवर 'हाय अलर्ट'चे आदेश

कोलकात्यात दाखल झाले आहेत. डीजींनी तयारीचा आढावा घेण्यासाठी उत्तर २४ परगणा जिल्हा आणि सुंदरबन भागाचा दौरा केला. बांगलादेशमध्ये गेल्या महिन्यात वादग्रस्त नोकरी आरक्षण योजनेविरोधात विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू झाले होते. या आंदोलनाचे रूपांतर आता सरकारविरोधी आंदोलनात झाले आहे.

# रासप शिरूर विधानसभा स्वबळावर लढविणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री महादेव जानकर साहेब यांच्या आदेशानुसार राज्यामध्ये १०९ जागांवर निवडणुका लढवण्याचा निर्णय झालेला असून राष्ट्रीय समाज पक्ष शिरुर हवेली विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवणार असल्याचे राष्ट्रीय समाज पक्षाचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव कुऱ्हाडे यांनी सांगितले.



शिरुर तालुका रासपच्या बैठकीप्रसंगी पदाधिकारी व कार्यकर्ते.

राष्ट्रीय समाज पक्षाची शिरुर तालुका बैठक नुकतीच संपन्न झाली, यावेळी पक्षाचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री महादेव जानकर साहेब यांच्या आदेशानुसार प्रदेशाध्यक्ष काशिनाथ शिवते, महासचिव माऊली सलगर, पश्चिम महाराष्ट्र समन्वयक विधानसभा निरीक्षक सचिन गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात राष्ट्रीय समाज पक्ष १०९ जागेवर उमेदवार देणार असून शिरूर हवेली विधानसभा मतदारसंघात देखील राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने उमेदवार देण्याचा निर्धार करण्यात आला आहे, यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष किरण गोपने यांनी पक्षाची ध्येय धोरणे व येणारी विधानसभा यावर मार्गदर्शन केले तर यावेळी बुथ कमिटी, पक्ष संघटन मजबूत करणे याबाबत चर्चा झाली दरम्यान राष्ट्रीय समाज पक्षाचे ज्येष्ठ नेते रामकृष्ण बिडगर यांनी मार्गदर्शन केले, तर राष्ट्रीय समाज पक्षाचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव कुऱ्हाडे यांनी शिरुर हवेली विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवणार असल्याचे जाहीर करत लवकरच शिरूर हवेली विधानसभा तसेच लवकर बुथ प्रमुख, गन प्रमुख गटप्रमुख यांचा मेळावा घेणार असल्याचे सांगितले.



निमगाव म्हाळुंगी ता. शिरुर येथून ग्रामदैवताची भीमास्नान साठी निघालेली पालखी.

# निमगाव म्हाळुंगीत आषाढी निमित्त ग्रामदैवतला भीमास्नान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** निमगाव म्हाळुंगी ता. शिरुर येथील ग्रामदैवत म्हसोबा महाराज यांना गेल्या तीस वर्षांपासून आषाढी अमावस्या अर्थात दिपअमावस्या निमित्ताने पालखीतून मिरवणूक काढून जवळील भीमा नदीतीरी घेऊन जात भीमास्नान घातले असून नुकतेच आषाढी अमावस्येच्या निमित्ताने ग्रामस्थांनी पालखीतून ग्रामदैवत म्हसोबा महाराज यांची मिरवणूक काढून भीमानदीतीरी भीमास्नान घालून परत गावामध्ये दाखल केले आहे.

निमगाव म्हाळुंगी ता. शिरुर येथील ग्रामस्थांच्या परंपरेनुसार नुकतेच ग्रामदैवत म्हसोबा महाराज यांची सरपंच बापूसाहेब काळे यांच्या हस्ते पूजा करत पालखीतून मिरवणूक काढत पालखीचा पहिला मान बाराबलुतेदार समाजापैकी नाईक समाजाला, दुसरा मान वडार समाजाला, तिसरा मान हरिजन समाजाला आणि चौथा मान मातंग समाजाला देत नंतर चांभार, कुंभार, सुतार, माळी, कोळी, गोपाळ, धनगर, लोहार या सर्व समाजाला देत पालखी भीमा नदीतीरी नेण्यात आली, यावेळी पालखी सोहळ्यात संजय लांडगे, केरबा चौधरी, शोभाताई भागवत, काळुराम चव्हाण, बाळासाहेब चव्हाण, दत्तात्रय काळे, भाऊसाहेब काळे यांनी स्वागत केले.

# नीरानदीने धारण केले रौद्ररूप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** नीरा खो-यातील भाटघर, नीरा देवघर, गुंजवणी धरणाच्या परिसरात शनिवारी पावसाने जोरदार झाल्याने रविवारी (दि.४) सकाळी आठ वाजल्यापासून वीर धरणात पाण्याची आवक सतत वाढत राहिल्याने टप्याटप्याने नीरा नदीत विसर्ग वाढविण्यात आला. दरम्यान, रविवारी ( दि.४) संध्याकाळी सव्वा पाच वाजता वीर धरणाचे पाच दरवाजे आठ फुटांनी तर चार दरवाजे चार फुटांनी उचलून नीरा नदीत ६३ हजार १७३ क्युसेक्सने विसर्ग करण्यात आला होता. त्यामुळे नीरानदीने रौद्ररूप धारण केले. नीरा नदीकाठावरील प्रसिद्ध दत्तमंदीरात पाणी शिरले तर ब्रिटीशकालीन जुन्या पुलावरून पाणी जोरदार वाहत होते.

रविवारी ( दि.४) संध्याकाळी पाच वाजता नीरा खो-यातील ब्रिटीशकाशीन भाटघर धरण १०० टक्के भरून २३.५० टीएमसी पाणी साठा उपलब्ध झाला आहे. भाटघर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात रविवारी सकाळी सहा वाजले पासून ते संध्याकाळी पाच वाजेपर्यंत ३८ मि.मी.पावसाची नोंद झाली आहे. नीरा देवघर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात ३७ मि.मी.पावसाची नोंद झाली आहे. नीरा देवघर धरण ९६.१३टक्के भरून ११.२७६ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. तर गुंजवणी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात ८७ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे.गुंजवणी धरण ९०.५९ टक्के भरून ३.३४३ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध झाला आहे..

रविवारी संध्याकाळी सहा वाजता भाटघर धरणातून १५ हजार ६३१ क्युसेक्सने विसर्ग सुरू होता. नीरा देवघर धरणातून रविवारी संध्याकाळी सहा वाजता ८ हजार ७०२ क्युसेक्सने विसर्ग सुरू होता. तर गुंजवणी धरणातून ४ हजार २८२ क्युसेक्सने विसर्ग सुरू होता. तसेच भाटघर , नीरा देवघर,गुंजवणी धरणातील पाण्याचा विसर्ग वीर धरणात आल्याने सकाळी आठ वाजल्यापासून वीर धरणात पाण्याची आवक सतत वाढत राहिल्याने टप्याटप्याने वीर धरणातून नीरा नदीत विसर्ग वाढविण्यात आला. रविवारी संध्याकाळी सहा वाजता वीर धरणाच्या नऊ दरवाजातून ६३ हजार १७३ क्युसेक्सने विसर्ग नीरा नदीत सुरू होता.

वीर धरणातून ६३ हजार १७३ क्युसेक्सने नीरा नदीत विसर्ग सुरू राहिल्याने नीरानदीने रौद्ररूप धारण केल्याने नीरा नदीकाठावरील प्रसिद्ध दत्तमंदीर निम्म्याच्यावर पाणी शिरले होते. ब्रिटीशकालीन जुन्या पुलावरून पाणी वाहू लागले होते. गत आठवड्यातही जुन्या पुलावरून पाणी वाहिले होते. नीरा ,पाडेगांव परिसरातील लहान मुले, महिलांसह नागरिकांनी नीरा नदीला आलेल्या पुराचे पाणी पाहण्यासाठी नविन पुलावर गर्दी केली होती.

दरम्यान,नीरा नदीकाठावरील रहिवाशांनी खबरदारी बाळगावी असे आवाहन नीरा पाटबंधारे उपविभागाचे सहाय्यक अभियंता योगेश भंडलकर यांनी केले आहे.

**वीर धरणाच्या विसर्गामुळे नीरा नदीने रौद्र रूप धारण केल्याने प्रसिद्ध दत्तमंदीर न निम्म्याच्यावर पाण्याखाली गेले आहे.**




# तालुक्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती:** आगामी काळात कऱ्हा व नीरा नदी जोडप्रकल्प राबविणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली. बारामतीत राष्ट्रवादी शहर कॉंग्रेसच्या वतीने एक कुटुंब एक झाड या उपक्रमाचा प्रारंभ अजित पवार यांच्या हस्ते झाला. त्या प्रसंगी त्यांनी या महत्वाकांक्षी प्रकल्पाची घोषणा केली.

दरवर्षी पावसाळयात नीरा नदीमध्ये पाणी येथे हे पाणी वाहून जाते, ते पाणी क-हा नदीला आणून मिळविण्यासह मधल्या पट्टयातील तलाव भरुन घेण्याची ही योजना असून बारामतीत रविवारी (ता. 4) संध्याकाळी बोरकरवाडीत होणा-या कार्यक्रमात याची सविस्तर माहिती देणार असल्याचे पवार यांनी जाहीर केले.

महायुतीच्या योजनांवर विरोधक चुनावी जुमला म्हणून टीका करतात, अनेक विरोधक खालच्या पातळीवर जाऊन टीका करीत आहेत,

पान १ वरून

### पुरावर तोडगा काढणारच!

एनडीआरएफ, एनजीओ या सगळ्यांनी मदत केली. त्यांना मी धन्यवाद देतो. तुम्ही विश्वास ठेवा, खात्री बाळगा आपण नक्कीच कायस्वरूपी तोडगा काढू. आता आम्ही पूरग्रस्त भागातील नागरिकांना काही कमी पडू देणार नाही. प्रशासन सर्वतोपरी काळजी घेण्यासाठी सज्ज आहे, असे आश्वासन त्यांनी दिले.

### अजित पवार कोणत्या मतदार संघातून?

मताधिक्य घेतले होते. त्यामुळे ते तोडणे अजित पवार यांना भारी जाणार असल्याची चर्चा आहे.

लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रामधील सर्वात हाय व्होल्टेज असलेल्या बारामती लोकसभा मतदारसंघामध्ये जनतेने परत एकदा सुप्रिया सुळे यांनाच पसंती दिली. बारामतीकरांची लेकीला पसंती राहिली हे दिसून आले. कारण सुप्रिया सुळे यांनी तब्बल दीड लाखांपेक्षा जास्त मतांनी विजय मिळवला. बारामती लोकसभा मतदारसंघामध्ये येणार सहा विधानसभा मतदारसंघांमधील आकडेवारी पाहिली, तर पाच मतदारसंघात त्यांना लीड मिळाले होते. महत्त्वाचे म्हणजे अजित पवार यांचा मतदारसंघ असलेल्या बारामतीतही सुप्रिया सुळे यांना जास्त मतदान झाले. त्यामुळे अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा धक्कादायकरित्या पराभव झाला होता. पुणे जिल्ह्यात २१ मतदारसंघ असून, त्यामध्ये शरद पवार आणि अजित पवार यांना मानणारा मोठा वर्ग आहे. राष्ट्रवादी फुटल्यावर २ गट पडले आहेत.

### कलम ३७० हटवल्याचा वर्धापनदिन

या कालावधीत ने-आण करू नये, असेही या अ‍ॅडव्हायजरीमध्ये म्हटले आहे. मात्र, अमरनाथ यात्रा मार्ग आणि राष्ट्रीय महामार्गासाठी रस्ते उघडण्याचे काम सोपविलेल्या एजन्सींना सक्रिय तैनात ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. केंद्र सरकारने ५ ऑगस्ट २०१९ रोजी जम्मू-काश्मीरला भारतीय संघराज्यात विशेष दर्जा देणारे कलम ३७० रद्द केले होते. केंद्राने जम्मू-काश्मीर पुनर्रचना कायदा आणला, ज्यामुळे पूर्वीच्या राज्याचे लडाख आणि जम्मू-काश्मीर या दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये विभाजन झाले. जम्मू-काश्मीरमधील बहुतांश राजकीय पक्ष कलम ३७० हटवण्याच्या निर्णयाचा निषेध करत असले, तरी विशेष घटनात्मक तरतूद रद्द करणे हे भाजपचे निवडणुकीतील आश्वासन होते.

### ही जम्मू-काश्मिरच्या प्रगतीची...

तेथील नागरिकांचे जीवन बदलले आहे. त्यानंतर समाजातील महिला, युवक, मागास, आदिवासी आणि उपेक्षितांना सुरक्षितता, सन्मान आणि नव्या संधी मिळाल्या. ते आतापर्यंत विकासाच्या लाभापासून वंचित होते. त्याचवेळी या निर्णयामुळे जम्मू-काश्मीरमध्ये दशकांपासून पसरलेला भ्रष्टाचार आता दूर झाला आहे. मी जम्मू, काश्मिर आणि लडाखच्या जनतेला आश्वासन देतो की, आमचे सरकार त्यांच्यासाठी काम करत राहील आणि येणाऱ्या काळात त्यांच्या आकांक्षा पूर्ण करेल, असा दावाही त्यांनी केला.

### महाविकास आघाडीची...

महायुतीचे सरकार आणायचे आहे, त्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागण्याचे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. महाविकास आघाडीचे जागावाटप अंतिम टप्यात असले तरी महायुतीचे उघडपणे काहीच ठरेना. पडद्यामागून त्यांच्या हालचाली सुरू आहेत. भाजपने अंतर्गत सर्वेक्षण सुरू केले आहे.

### 'मनसे'कडून दोन...

मनसेच्या दिलीप धोत्रे यांच्याशी त्यांचा सामना होईल. त्याशिवाय भगीरथ भालके आणि मविआकडून अभिजित पाटील मैदानात असतील. त्यामुळे मतविभाजन होऊन अवताडे यांच्या विजयाचा मार्ग सुकर होईल, असा कयास राजकीय विश्लेषकांकडून बांधला जात आहे.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना कळविण्यात येते की, श्री. दत्ता लक्ष्मण तुपे रा. तुपे चाळ, वाल्हेकरवाडी पीसीएमसी हॉस्पिटल जवळ, चिंचवडगाव, पुणे - ४११०३३ यांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली सदर मिळकत Protium Finance Limited यांना गहाण करण्याचे मान्य व कबुल केले आहे. सदर मिळकतीच्या मालकाचे क्लिअर टायटलच्या खात्रीबाबत सदर जाहीर नोटीस देत आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असल्याचा भरवसा सदर मिळकतीचे उपरोक्त विद्यमान मालक यांनी दिलेला आहे. तरीही सदर मिळकतीवर इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबध करार, लिज, ताबा, वहिवाट, साठेखत, विसारपावती, भाडेपट्टा, कुळ, दावा, चार्ज, पोटगी, इ. काही असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून आठ (०८) दिवसांचे आत मूळ कागदपत्रानिशी खालील नमूद केलेल्या पत्त्यावर कळवून रितसर पोहोच घ्यावी. तसे न केल्यास सदर मिळकतीचे मालक यांच्याशिवाय अन्य कोणाचेही, कसलेही हक हितसंबंध नाहीत व असल्यास संबंधीतांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत. असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करून घेतील. त्यानंतर कोणाचीही कुठल्याही प्रकारची हरकत वा तक्रार चालणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट - तुकडी पुणे, पोट- तुकडी, तालुका - हवेली, मे. सब रजिस्ट्रार हवेली यांचे हद्दीतील गाव मौजे चिंचवड येथील सर्वे नं. १००/१/२ यांसी क्षेत्र ०० हे ८.५ आर म्हणजेच ८५०० चौ. फू. पैकी क्षेत्र ० ० हे ६.७५० आर म्हणजेच ६७५० चौ. फू. पैकी श्री. दत्ता लक्ष्मण तुपे यांच्या मालकीचे क्षेत्र • हे ०३.६० आर व त्यावरील बांधकाम हि मिळकत. येणेप्रमाणे जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे.

**अॅड. अजित बापू खामकर**
ऑफिस नं.३, तळमजला, माणिकराज पार्क, हेरिटेज प्लाझा समोर,
पिंपरी-चिंचवड लिंक रोड, चिंचवड, पुणे ० ३३ मो. नं. ८६६८४१६७५७

**-: दि.पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि., पंढरपूर :-**
प्रधान कार्यालय, ४१६३ ब, नवीपेठ, पंढरपूर फोन नं.०२१८६-२२८४५१
pucb@pandharpurbank.com

**-: बँकेच्या सर्व ग्राहकांसाठी रि-केवायसीबाबत जाहीर सुचना :-**

या जाहीर सुचनेद्वारे सर्व ग्राहकांना विनंती करणेत येते की, मे.रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्वानुसार ग्राहकाने आपल्या खात्याची केवायसी अद्ययावत करणे बंधनकारक आहे. तरी खाली नमुद केल्याप्रमाणे केवायसीबाबत पुर्तता करावी.

१. केवायसी-ओळखीचा पुरावा, अद्यावत फोटो, सध्याचा पत्याचा पुरावा सादर करावा. (उदा.आधारकार्ड, पासपोर्ट, मतदान कार्ड, वाहन परवाना, पॅनकार्ड इ.)
२. ज्या ग्राहकांनी आपल्या खात्याची रि-केवायसी अद्याप केलेली नाही व देय तारीख होवून गेली आहे. अशा खातेदारांवर मे.रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या सुचनेप्रमाणे ग्राहकांच्या खात्यावरील व्यवहार थांबवणे बंधनकारक आहे.
३. गेली २ वर्षापासून ज्या सेव्हींग खातेदांराच्या खात्यावरील शिल्लक रू.०.०० (शुन्य) आहे, व अशा खातेदारांनी चेकबुकची सुविधा घेतली नाही, अशी सर्व खाती दि.१०/०९/२०२४ पासून (CBS) प्रणालीद्वारे बंद करण्यात येणार आहे. याची सर्व ग्राहकांनी नोंद घ्यावी.
४. ज्या खातेदारांनी आपल्या खात्यावर मागील १ वर्षापासून एकही व्यवहार केलेला नाही, त्यांनी आपल्या खात्याची अद्ययावत केवायसीची पुर्तता करून खात्यावर व्यवहार करावा, यासाठी ग्राहकांना रजिस्टर मोबाईल नंबर व ई-मेल आयडी वर खात्यावर व्यवहार करणेसाठी एस.एम.एस. आणि ई-मेल पाठविले आहेत, तसेच पत्रव्यवहारही केले आहेत, याची ग्राहकांनी नोंद घ्यावी.
५. तसेच ज्या खातेदारांनी १० वर्षापेक्षा जास्त काळात खात्यामध्ये व्यवहार केला नाही, अशा खात्यांमधील सर्व रक्कम मे.रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या डिफ खात्यामध्ये जमा(वर्ग) केली जाते. यामुळे बँक अशा खातेदारांच्या वारसांना व्यवहार करणेसाठी संपर्क करीत आहे.
६. तरी ग्राहकांना या सुचनेद्वारे कळविण्यात येते की, ज्या खात्यांची रि-केवायसी अपुर्ण आहे व ज्या खातेदारांनी खात्यावर २ वर्ष व्यवहार केलेले नाही, अशी सर्व खाती इनऑपरेटीव्ह/डॉरमंट झालेली आहे. असे या सुचनेद्वारे खातेदारांना कळवु इच्छितो.
७. तरी अशा सर्व खातेदारांनी त्वरीत आपल्या शाखेशी संपर्क साधुन वरील प्रमाणे रि-केवायसी व व्यवहार करून खाते दि.३०/०९/२०२४ पुर्वी सक्रिय करावे व आम्हाला बँकींग सेवा देणेची संधी द्यावी.

कळावे ही विनंती,

**उमेश रामचंद्र विरधे**
**(मुख्य कार्यकारी अधिकारी)**
यांचे आदेशावरून

**जाहीर नोटीस**

आमचे अशिलांनी सांगितलेवरून व माहिती दिलेवरून तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत ही मेघा राजेंद्र कडुसकर, ऋषिकेश रा. कडुसकर, अनिकेत रा. कडुसकर, मृणाल रा. कडुसकर, श्रीपाद श्रीनिवास कडुसकर, उमा सदाशिव पाटसकर, निलीमा सुनिल जोशी, सर्व रा : पुणे यांचे १ / ६ क्षेत्रामधील २९.७१ चौ.मी. वडिलोपार्जित अविभक्त मालकी व ताबे वहिवाटीची असून सदर विद्यमान "मालकांनी आमच्या अशिलांना खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत कायमस्वरूपी तबदिल/हस्तांतरण / वर्ग करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकतीवर कोणत्याही बँक अथवा वित्तीय संस्थेचा बोजा नाही. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी, बोजारहित असलेबाबत व संपूर्ण हक्क व अधिकार विद्यमान मालकांना असल्याची पूर्ण खात्री व भरवसाही त्यांनी आमचे अशिलांना दिला आहे. तसेच सदरची मिळकत कुठल्याही वित्तीय संस्थेकडे गहाण ठेवलेली नसून व त्यावर कुठल्याही प्रकारचा बोजा निर्माण केले नसलेबाबत खात्री व भरवसा त्यांनी आमचे अशिलांना दिला आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, लीन, पोटगी, मालकी इ. स्वरूपाचा कोणताही हक्क, अधिकार वा बोजा असल्यास विद्यमान मालक वा त्यांचे कोणी कायदेशीर वारस यांची सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत कोणतीही कसलीही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाचे आत आमचे अशिलांना तशी लेखी कागदपत्रांच्या पुराव्यानिशी खात्री पटवून द्यावी, अन्यथा सदर मिळकत ही पूर्णपणे निर्वेध व निजोखमी आहे, तिच्यावर अन्य कोणाचाही कोणत्याही स्वरूपाचा हक्क व अधिकार नाही, असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत वा तक्रार चालणार नाही याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**परिशिष्ट :** तुकडी पुणे, पोट तुकडी ता हवेली, जि-पुणे मे. सब-रजिस्ट्रार हवेली क्र. १ ते २८ यांच्या हद्दीतील तसेच पुणे महानगरपालिका हद्दीतील मौजे औंध गाव ता - हवेली, जि - पुणे येथील गावठाण हद्दीतील सि.स.नं. ४९३ यांसी एकूण क्षेत्र २१३.९० चौ. मी. पैकी १/६ म्हणजेच ३५.६५ पैकी खरेदी देणारे २९.७१ चौ.मी. क्षेत्र व त्यावरील जुन्या बांधकामासह अविभक्त मिळकत.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.
पुणे
दि : ६/८/२०२४

**सचिन श्रीकांत कडुसकर**
९८, औंधगांव, श्रीदत्त मंदीर, पुणे- ४११००७
मो: ९४२२००८२१०

## उच्च न्यायालयाने फेटाळली आव्हान याचिका

# लाडकी बहीणचा मार्ग मोकळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई** : राज्य सरकारची महत्वाकांक्षी योजना मानल्या जाणाऱ्या लाडकी बहीण योजनेला दिलेले आव्हान मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळले आहे. त्यामुळे राज्यातील महिलांच्या पहिल्या हप्त्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सरकारच्या धोरणात हस्तक्षेप करण्यास कोर्टाने नकार दिला आहे. त्यामुळे राज्य सरकारला मोठा दिलासा मिळाला असून १४ ऑगस्टला सरकारी तिजोरीतून जाणा-या निधीला अडचण येणार नाही.

मुंबई उच्च न्यायालयात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेविरोधात याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेत १४ ऑगस्टला वितरीत करण्यात येणारा मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा पहिला हप्ता थांबवण्याची मागणी करण्यात आली होती. सोमवारी मुंबई उच्च न्यायालयात या याचिकेवर तातडीची सुनावणी झाली. या सुनावणीत सरकारी धोरणात हस्तक्षेप करण्यास न्यायालयाने नकार दिला आहे. कर भरतो म्हणून सुविधा द्या, अशी मागणी करता येत नाही. 'फी' आणि 'कर' यात फरक आहे.

### याचिकाकर्त्यांची कानउघडणी

● तुम्हाला वाटले म्हणून अशा पद्धतीने सर्वसामान्यांच्या हिताचा मुद्दा पुढे करत धोरणात्मक निर्णयाला आव्हान देता येणार नाही, असे म्हणत मुख्य न्यायमूर्तींच्या खंडपीठाने याचिकाकर्त्यांची कानउघडणी केली. योजना समाजातील आर्थिक दुर्बल घटकांना विचारात घेऊन आखल्याचा राज्य सरकारने कोर्टात दावा केला होता.

### काय होती याचिका?

● लाडकी बहीण योजना म्हणजे करदात्यांच्या पैशांचा अपव्यय आहे. विधानसभा निवडणूक डोळ्यांसमोर ठेवून राज्य सरकारने ही योजना आणली आहे. ही भ्रष्ट कृती असून हा मतदारांना आमिष दाखवण्याचा प्रकार आहे. निवडणुकीत पैसे वाटल्यास निवडणूक आयोगाकडून कारवाई केली जाते. मात्र, सध्या विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू नसल्यामुळे निवडणूक आयोग कारवाई करु शकत नाही, असे याचिकाकर्त्यांनी म्हटले होते.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स

## फडणवीस यांचे राजकीय करियर संपेल : जरांगे



**अमरावती :** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सगळं घडवून आणत आहेत. त्यांचे राजकीय करियर संपून जाईल. बोंडे यांनी माझ्या नादी लागू नये, असे म्हणत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी भाजपचे राज्यसभा खासदार अनिल बोंडे यांच्यावर निशाणा साधला आहे. जरांगे म्हणाले, मुख्यमंत्री शिंदे मराठ्यांना आरक्षण देऊ शकतात, फक्त त्यांना आरक्षण देण्यासाठी कोणी अडवू नये. देवेंद्र फडणवीस यांना भांडण घडवून आणायचे आहे. नारायण राणे जाहीर धमकी देणार असतील तर आम्ही त्यांनाही सोडणार नाही. राणे ज्यांनी मराठ्यांच्या आई बहिणीला गोळ्या घातल्या, त्यांचे रक्त सांडले, त्यांच्या बाजूने बोलत आहेत. राणे यांनी मराठा समाजाच्या बाजूने बोलावे. फडणवीस यांचे ऐकून ते मला बोलत आहेत. तुम्ही फडणवीस यांची सुपारी घेतली आहे, असे मनोज जरांगे म्हणाले. मराठे फक्त हक्क मागत आहेत. कुणबी आणि मराठा रक्ताने एकत्र आहेत, आमचे दुखणे सारखेच आहे. आपल्या पोरांच्या भल्यासाठी आपण एकत्र या, असे आवाहन त्यांनी केले.

» Selected

## खरी शिवसेना शिंदेंची : आंबेडकर

**अमरावती** : उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांना मिळालेल्या मतांचा अभ्यास केला तर शिंदे यांचा स्ट्राईक रेट डबल आहे. शिवसेनेची मतं एकनाथ शिंदे यांच्याकडे राहिली आहेत. आता शिवसैनिक शिंदे यांनाच खरी शिवसेना मानतो आहे. ठाकरे यांचा स्ट्राईक रेट आरक्षणवादी आणि मुस्लीम यांच्यामुळे वाढला आहे, असे मत वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केले आहे. ते सध्या आरक्षण बचाव यात्रेवर आहेत. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी, शासनाचा निधी परप्रांतीय नागरिकांवर खर्च होत आहे असा आरोप केला होता. त्यावर आंबेडकर म्हणाले, की अशा लोकांना टाडा लागला पाहिजे. महाराष्ट्रातला माणूस यूपीमध्ये आहे. ओडिशामध्ये आहे. पश्चिम बंगालमध्ये आहे. मध्यप्रदेशात आहे. गुजरातमध्ये सुद्धा आहे.

## रेल्वे कर्मचारी महिलेची प्रवासी महिलेस मारहाण

**कल्याण** : मध्य रेल्वेवरील महत्वाचे स्थानक असलेल्या कल्याण स्टेशनवर तिकीट काऊंटरवरील महिला स्टाफने एका महिला प्रवाशाला स्टंपने मारहाण केल्याचा प्रकार घडला. संबंधित प्रवासी महिला जखमी झाली आहे. सोमवारी सकाळी कल्याण स्टेशनवर पीडित महिला तिकीटाच्या रांगेत उभी होती. सुट्ट्या पैशांच्या मुद्यावरून तिचे तिकीट काऊंटरवरील स्टाफशी भांडण झाले. बघता बघता त्याचा वाद वाढला. त्यावेळी प्रवासी महिलेने स्टाफचा व्हिडीओ काढण्यास सुरूवात केली. त्यामुळे तिने त्या महिलेला आत ऑफीसमध्ये बोलावले आणि मारहाण केली. प्रवासी महिलेला याचा मोठा मानसिक धक्का बसला आहे. घटनेच्या व्हिडीओत स्टाफमधील महिला अरेरावी करत वाद घालत असल्याचे दिसत आहे. यामुळे प्रवाशांमध्ये संतापाचे वातावरण असून संबंधित स्टाफवर वेळीच कारवाई करावी आणि कर्मचाऱ्यांना नीट वागण्याची सूचना द्यावी.

# आणखी पाच दिवस पावसाचा जोर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई** : राज्यात गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेला पावसाचा जोर आणखी चार - पाच दिवस कायम राहणार असल्याचे भारतीय हवामान विभागाने म्हटले आहे. पुणे आणि नाशिकमध्ये रविवारी झालेल्या पावसामुळे धरणांमधून मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरु आहे. यामुळे नाशिकमधील गोदावरी तर पुण्यातील मुळा-मुठा नदीला पूर आला आहे. पुण्यातील सिंहगड रोडवरील भागात पाणी शिरले आहे.

नाशिकमध्ये गेल्या २४ तासांत १०४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. गोदावरीला हंगामातील पहिला पूर आला आहे. गोदा घाट परिसरातील दुतोंडी मारुतीच्या कमरेपर्यंत पाण्याची पातळी गेली आहे. नाशिकमध्ये पावसाने सध्या विश्रांती घेतली असली तरी गंगापूर धरणातून मात्र पाण्याचा विसर्ग सुरू आहे. यामुळे गोदाघाट परिसरातील रहिवाशांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे

पुण्यातील एकता नगर भागात अजूनही पाणी आहे. या ठिकाणच्या सर्व नागरिकांचे स्थलांतर करण्यात आले आहे. अग्निशमन दल आणि पुणे महानगरपालिकेचे कर्मचारी रविवारपासून एकता नगरमध्ये मदत कार्य करीत आहेत. पुणे शहरासह धरण पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर ओसरला आहे. परंतु हवामान विभागाने पुण्याला ऑरेंज अलर्ट दिला आहे. रविवारी संध्याकाळनंतर पुण्यात पावसाने विश्रांती घेतली आहे. धरण क्षेत्रातून नद्यांमध्ये विसर्ग अद्यापही सुरू आहे.

पुणे हवामान विभागाचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ के.एस.होसाळीकर यांनी राज्यात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. राज्यातील काही ठिकाणी ऑरेंज अलर्ट तर काही भागांत यलो अलर्ट दिला आहे

सांगलीत कृष्णा नदीची पाणी पातळी गेल्या २४ तासांत कमी झाली आहे.

रविवारी सकाळी ३९ फूट ११ इंच तर सोमवारी सकाळी पातळी ३९ फूट आली आहे. गेल्या २४ तासांत फक्त ११ इंचने नदीचे पाणी कमी झाले आहे. पाच दिवस कृष्णा नदीच्या पाण्याची पातळी ४० आणि ३९ फुटावर स्थिर आहे. कृष्णा नदीची इशारा पातळी ४० फूट तर धोका पातळी ४५ फूट आहे. सध्या कोयना धरणातून ५० हजार क्यूसेक्स आणि चांदोलीतून १० हजार क्यूसेक्स पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

पुण्यातील ओंकारेश्वर मंदिर अजूनही पाण्याखाली आहे. खडकवासला धरणातून सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे मुठा नदीमध्ये पाण्याचा प्रवाह अद्यापही सुरू आहे. श्रावण महिन्याच्या पहिल्या सोमवारी ओंकारेश्वर मंदिर पाण्याखाली गेल्यामुळे भाविकांना दर्शन घेता आले नाही.

# घाटगे यांच्या उमेदवारीची चिंता नाही : मुश्रीफ़

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर** : आगामी विधानसभा निवडणुकीत कागल विधानसभा मतदारसंघात मंत्री हसन मुश्रीफ यांच्या विरोधात समरजीत घाटगे यांना रिंगणात उतरवण्याची तयारी शरद पवार गटाने सुरु केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील वरिष्ठ नेते त्यांच्या संपर्कात असल्याची माहिती आहे. मात्र, मला विधानसभा निवडणुकीत कोण उभे राहील, याची चिंता नाही, असे मुश्रीफ यांनी म्हटले आहे.

ते म्हणाले की, २५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या प्रत्येकाला निवडणूक लढवण्याचा अधिकार आहे. तिरंगी-चौरंगी कशीही लढत होऊ दे, मी आमदार होणार आणि मंत्रिमंडळात असणार. आठ-दहा पक्ष झाले आहेत. तिसरी आघाडी, चौथी आघाडी तयार होईल. या निवडणुकीत अनेक उमेदवार उभे असतील. बच्चू कडू तिसरी आघाडी करू शकतात.

कागल लढाई सोपी करण्यासाठी मुश्रीफ संजय घाटगे यांना रिंगणात उतरायला सांगतात, त्यासाठी ते घाटगे यांना पैसे देतात, अशी कुजबूज सुरु आहे. याबाबत मुश्रीफ यांनी म्हटले की, आईशपथ मी कधीही संजय घाटगे यांना विधानसभेला उभा राहण्यासाठी पैसे दिले नाहीत. शिवसेना ठाकरे गटाचे संभाव्य उमेदवार संजयबाबा घाटगे यांनी आपण यावेळी मुश्रीफ यांना पाठिंबा देण्याचे जाहीर केले. त्यानंतर पैसे देण्याच्या चर्चेला पुन्हा सुरुवात झाली. मात्र, मी कधीही संजयबाबा घाटगे यांना पैसे दिले नाहीत असं मुश्रीफ म्हणाले. तुमच्या थर्मामीटरमध्ये मी बसत असेल तर यंदा मी पुन्हा लग्नाला उभा राहणार आहे, माझ्यावर अक्षता टाका असे म्हणत मुश्रीफ यांनी प्रचाराचा एकप्रकारे शुभारंभच केला.

# गिरणा पात्रात अडकले मासेमार युवक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नाशिक** : जिल्ह्यातील मालेगाव येथे गिरणा नदीत नदी पात्रात मासेमारीसाठी गेलेले युवक अडकून पडले असून त्यांना वाचवण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न सुरु आहेत. मालेगावचे आमदार मुफ़्ती महमद इस्माईल यांनी बचाव कार्यासाठी हेलिकॉप्टर पाठवण्याची मागणी केली आहे.

चणकापूर आणि पुनद धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस सुरु आहे. यामुळे धरणांमधून पाण्याचा विसर्ग केला जात आहे. रविवारी या दोन्ही धरणांमधून २० हजार क्यूसेक पाण्याचा विसर्ग गिरणा नदीपात्रात केला. मालेगावच्या संवदगाव शिवारात गिरणा नदीत मासेमारीसाठी १५ पेक्षा जास्त युवक गेले होते. नदीपात्रातील टेकडीवर उभे राहून ते मासेमारी करत होते. रविवारी सायंकाळी अचानक पाणी वाढू लागले. पाण्याचा प्रवाह वाढल्यामुळे काही युवक परत आले.

त्यातील १५ युवक मासेमारी करत थांबले. परंतु पाणी जास्त वाढल्यामुळे ते परत येऊ शकले नाही. युवकांना बाहेर काढण्यासाठी प्रशासनातर्फे रविवारपासून बचावकार्य सुरु करण्यात आले. रविवारची रात्र युवकांना नदी किनारी काढावी लागली. नदीच्या पूर पातळीपासून ही टेकडी जवळपास दहा फूट उंच आहे. यामुळे सध्यातरी या युवकांना धोका नाही.

## वेळीच थांबले असते तर घर फुटले नसते

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बीड** : शरद पवार वेळीच थांबले असते तर त्यांच्या घरामध्ये जे घडले ते घडले नसते. राजकारणात मोठ्याने कुठे थांबायचे हे ठरवायला पाहिजे, असा टोला लगावत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार प्रकाश सोळंके यांनी आपल्या राजकीय निवृत्तीची घोषणा केली. तसेच पुतण्या जयसिंह सोळंके हे राजकीय वारसदार असतील अशी घोषणा देखील केली.

ते म्हणाले की, पाच वर्षांपूर्वीच जयसिंह सोळंके हेच पुढे राजकीय वारसा चालवतील असे जाहीर केले होते. मी निवडणुकीच्या राजकारणातून निवृत्ती घेतली असली तरी सगळ्या यंत्रणेमध्ये असणार आहे. मला दोन मुले आहेत, मात्र त्यांना राजकारणामध्ये इंटरेस्ट नाही. मुलीला देखील नाही. प्रकाश सोळंके यांचे लहान बंधू धैर्यशील सोळंके यांचे जयसिंह हे चिरंजीव आहेत. जयसिंह सोळंके धारूर पंचायत समितीचे उपसभापती राहिलेले आहेत.

## महापूर

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**नाशिक :** गंगापूर धरणातून सुरु असलेल्या विसर्गामुळे गोदावरी नदीला आलेला पूर.

## राज यांचा घणाघात : महाराष्ट्राने देशाला दिशा दिली

# राज्य जातीपातीत खितपत पडलेय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर** : राज्यात सध्या भीषण वातावरण आहे. आपण भरकटत चाललो आहोत. महाराष्ट्राने देशाला दिशा दिली. ते राज्य जातीपातीमध्ये खितपत पडावे, यापेक्षा दुर्भाग्य नाही, असे परखड विचार मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी व्यक्त केले.

सोलापूर दौऱ्यावर असताना त्यांनी मीडियाशी संवाद साधला. यावेळी आरक्षणाच्या विषयावर ते म्हणाले, राज्यात जातीयवादी वातावरण आहे. मराठवाड्यात जास्त वाईट परिस्थिती आहे. मुळात हा विषय शिक्षणाचा, नोकरीचा आहे. महाराष्ट्रात भूमिपुत्रांना नोकऱ्या, चांगले शिक्षण मिळाले पाहिजे. यात जात येते कुठे? ओबीसी असो किंवा मराठा. कुठल्याही जातीचा असो, मुला-मुलींना चांगले शिक्षण, रोजगार मिळाला पाहिजे. महाराष्ट्रात जितक्या नोकऱ्या उपलब्ध होतात, तितक्या दुसऱ्या कुठल्या राज्यात होतात? किती प्रमाणात आरक्षण आहे, किती जातींना मिळणार? किती नोकऱ्या उपलब्ध होणार? हे आपण तपासणार आहोत का? की, माथी भडकवून मते मिळवायची एवढाच उद्योग आहे? असा प्रश्न विचारत ठाकरे म्हणाले, "हे सर्व राजकारण कोणाच्या तरी खांद्यावर बंदुक ठेवून सुरु आहे. बाहेरच्या राज्यातून मुले येतात. आपल्या नोकऱ्या बळकावतात. आपल्या राज्यात शिक्षण घेतात, आपल्या मुला-मुलींना शिक्षण, रोजगार मिळत नाही, याचा आपण विचार केला पाहिजे, असे ते म्हणाले.

### पवारांनी हातभार लावू नये

● शरद पवारांनी महाराष्ट्रात मणिपूरसारखी स्थिती निर्माण होईल, असे विधान केले आहे. त्यावर राज ठाकरे म्हणाले की, पवारांनी मणिपूर बनवायला हातभार लावू नये. महाराष्ट्राचा मणिपूर होणार नाही, याची काळजी शरद पवारांनी घेतली पाहिजे. त्यांचे आजपर्यंतचे राजकारण पाहता, त्यांना हवे का नको मणिपूरसारखे?

### फेक नरेटिवची हवा काढली

● महाविकास आघाडीने फेक नरेटिव्ह सेट केल्याने आम्ही लोकसभा निवडणूक हरलो, असा दावा भाजप आणि महायुतीने केला होता. त्यांच्या या विधानाचा समाचार घेताना राज ठाकरे यांनी सडेतोड उत्तर दिले. 'सर्वात आधी भाजपचा अयोध्येचा उमेदवार हे बोलला. ४०० पार झाले की आम्ही संविधान बदलणार हे त्यांच्याच उमेदवाराचे विधान होते, असे राज यांनी लक्षात आणून दिले.

#रा

# विधानसभा निवडणुकीसाठी नांदगांवकर, धोत्रे यांना मनसेची उमेदवारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मनसेचे विधानसभा निवडणुकीसाठी दोन उमेदवार जाहीर केले. पंढरपूर विधानसभा मतदारसंघातून दिलीप धोत्रे तर दक्षिण मुंबईतील शिवडी विधानसभेसाठी बाळा नांदगांवकर यांना मैदानात उतरवण्याचा निर्णय राज ठाकरे यांनी घेतला आहे.

सध्या शिवडीत शिवसेना ठाकरे गटाचे अजय चौधरी, तर पंढरपूर मतदारसंघात भाजपचे समाधान अवताडे विद्यमान आमदार आहेत. शिवडी विधानसभा मतदारसंघ दक्षिण मुंबईतील महत्त्वाचा मतदारसंघ आहे. चौधरी हे २०१४ आणि २०१९ असे दोनवेळा निवडून आले आहेत. २०१४ मध्ये चौधरी यांनी नांदगावकर यांचा पराभव केला होता. तर २०१९ मध्ये अजय चौधरी यांनी मनसेच्याच संतोष नलावडे यांचा पराभव करुन, दुसऱ्यांदा विधानसभेवर ठाकरेंचा झेंडा फडकवला होता.

नांदगावकर शिवसेनेत असताना मांझगाव विधानसभा मतदारसंघातून सलग तीन वेळा निवडून आले. त्यानंतर २००९ मध्ये मनसेच्या तिकिटावर ते शिवडी मतदार संघातून चौथ्यांदा आमदार म्हणून निवडून आले.

### दिलीप धोत्रे कोण?



● दिलीप धोत्रे १९९२ साली पंढरपूर कॉलेजच्या विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष झाले. धोत्रे यांच्या कामाची दखल घेऊन राज ठाकरे यांनी त्या वेळीच त्यांच्यावर विद्यार्थी सेनेची जबाबदारी टाकली होती. राज ठाकरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची स्थापना केली. त्यावेळी धोत्रे यांनीही सोलापूर जिल्ह्यातून शिवसेना सोडून राज ठाकरेंच्या मनसेत प्रवेश केलेला. सोलापूर जिल्ह्यात मनसेच्या विस्तारात धोत्रे यांचा मोठा वाटा आहे. जिल्हा संघटक, शॅडो सहकारमंत्री, प्रदेश सरचिटणीस अशी महत्त्वाची जबाबदारी त्यांनी पार पाडली. त्यानंतर त्यांना पक्षात नेतेपद देण्यात आले आहे.

### जखमी असूनही २२ वर्षीय पोरानं प्रतिस्पर्धीला झुंजवलं

# 'लक्ष्य'कडे मेडलचे दुर्लक्ष

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पॅरिस :** भारताचा युवा स्टार लक्ष्य सेन याने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये इतिहास घडवला होता. पुरुष गटाच्या उपांत्य फेरीत धडक देणारा तो भारताचा पहिला बॅडमिंटनपटू ठरला होता. पण, उपांत्य फेरीतील पराभवानंतर लक्ष्य कांस्यपदक नक्की जिंकेल, असे वाटले होते, परंतु १-० अशा आघाडीनंतरही त्याला हार मानावी लागली. मलेशियाच्या ली जि जियाने भारतीय खेळाडूचे सर्व डावपेच हाणून पाडले आणि त्याला पदकापासून वंचित ठेवले. उजव्या हाताला दुखापत असूनही लक्ष्यने जागतिक क्रमवारीत सातव्या क्रमांकावर असलेल्या खेळाडूला झुंजवले.

लक्ष्य आणि जिया यांच्यात पहिल्या गुणासाठीच जबरदस्त रॅली पाहायला मिळाली आणि त्यात सेनने मलेशियन खेळाडूला कोर्टबाहेर फटके खेळण्यास भाग पाडून पहिले दोन गुण घेतले. मलेशियन खेळाडूला लक्ष्य कोर्टवर चांगला पळवताना दिसला आणि त्यामुळे प्रतिस्पर्धीकडून चुका होत राहिल्या. मलेशियन खेळाडू ५-११ असा माघारी पडल्याने दडपणाखाली गेलेला दिसला आणि तो वारंवार कोचकडून मदतीची अपेक्षा करत होता.

लक्ष्यच्या स्मॅशचे मलेशियन खेळाडूकडे उत्तर नव्हते. दोन्ही खेळाडू नेट जवळ अधिक खेळ करण्यावर भर देताना दिसले, परंतु लक्ष्य त्यातूनही स्मॅशची संधी शोधत होता. ती संधी मिळताच तो मलेशियन खेळाडूकडून गुण हिसकावून घेत राहिला. लक्ष्यच्या १६-१० अशा आघाडीने पहिला गेम त्याच्या बाजूने निश्चित केला होता. लक्ष्य सेनने हा गेम २१-१२ असा जिंकून सामन्यात आघाडी घेतली.

**ऐतिहासिक झेप...**

- ऑलिम्पिक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश करणारा लक्ष्य पहिला पुरुष भारतीय बॅडमिंटनपटू ठरला आहे. भारताकडून सायना नेहवाल आणि पी व्ही सिंधू यांनी ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकले आहेत. लक्ष्य सेनला उपांत्य फेरीत डेन्मार्कच्या ॲक्सलसन याच्याकडून पराभव पत्करावा लागला. त्यामुळे त्याला आता कांस्यपदकाच्या लढतीत मलेशियाच्या ली जि जियाविरुद्ध खेळावे लागले.

### भारताला ऐतिहासिक झेप घेऊन दिली

- पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत सोमवारी टेबल टेनिसपटू मनिका बत्रा हिने जागतिक क्रमवातील १०व्या क्रमांकावर असलेल्या रोमानियाच्या बेर्नाडेट्टे शेजॉक्स हिचा पराभव करून धक्कादायक निकाल नोंदवला. भारत-रोमनिया सामना २-२ बरोबरीत असताना पुन्हा एकदा अनुभवी मनिकावर भारतीयांच्या अपेक्षाचे ओझे आले. मनिकाने आपल्या जबरदस्त खेळाने तो विश्वास सार्थ ठरवला आणि भारताला उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळवून दिला.
- टेबल टेनिस गटात महिला सांघिक प्रकारात भारतासमोर रोमानियाचे आव्हान होते. दुहेरी गटाच्या पहिल्या सामन्यात भारताच्या अर्चना कामथ/श्रीजा अकुला या जोडीने रोमानियाच्या एलिझाबेथ समारा/एडिना डिएकोनू जोडीचा ११-९, १२-१०, ११-७ असा पराभव करून १-० अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर सर्वांच्या नजरा महिला एकेरीत मनिका आणि शेजॉक्स यांच्या लढतीकडे वळल्या. या सामन्यात रोमानियन खेळाडू सहज वर्चस्व गाजवेल, असा अनेकांचा अंदाज होता.

## अभिजीत, रहीम यांचा उपांत्य फेरीत प्रवेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सोमेश्वर फाऊंडेशन व क्रीडा जागृती आयोजित व महाराष्ट्र राज्य कॅरम संघटना यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या माजी आमदार कै. विनायक निम्हण यांच्या स्मरणार्थ राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत पुरुष गटात पुण्याच्या अभिजीत त्रिपनकर, रहीम खान यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

सनीज वर्ल्ड, पाषाण सुस रोड या ठिकाणी आजपासून सुरू झालेल्या या स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत पुरूष एकेरीत पुण्याचा आंतरराष्ट्रीय कॅरमपटू अभिजित त्रिपनकरने मुंबईच्या पंकज पवारला १८-१४, २४-८ असे तर पुण्याच्या रहिम खानने आपला शहर सहकारी सागर वाघमारेला २४-८, २५-२१ असे हरवून उपांत्य फेरी गाठली.

महिला एकेरीत उपांत्यपूर्व फेरीत मुंबईच्या काजल कुमारीने सिमरन शिंदेचा १३-२१, २४-१६, २०-५ असा तर, मुंबईच्या उर्मिला शेंडगेने रत्नागिरीच्या आकांक्षा कदमचा १८-२४, २५-१६, २५-१५ असा पराभव करून उपांत्य फेरीत धडक मारली.

## ऑलिम्पिक गेम्स पॅरिस २०२४

| पदक तक्ता | | सुवर्ण | कांस्य | रौप्य | ५ ऑगस्ट ९ दिवस |
|---|---|---|---|---|---|
| संघ | | | | | एकुण |
| १ | चीन | २० | १५ | १२ | ४७ |
| २ | अमेरिका | १९ | २७ | २६ | ७२ |
| ३ | फ्रान्स | १२ | १४ | १८ | ४४ |
| ४ | ऑस्ट्रेलिया | १२ | ११ | ८ | ३१ |
| ५ | ग्रेट ब्रिटेन | १० | १२ | १६ | ३८ |
| ५७ | भारत | 0 | 0 | ३ | ३ |

## असा राहिला ९ वा दिवस




- **पॅरिस :** हॉकी आणि बॅडमिंटन. किमान एक सामना जिंकला की, पदक निश्चित. ऑलिंपिकमधील भारताच्या आजच्या कामगिरीचे सार हेच. हॉकीमध्ये चुरशीच्या उपान्त्यपूर्व सामन्यात ग्रेट ब्रिटनला नमवत भारताने उपान्त्य फेरी गाठली. बॅडमिंटनमध्ये मात्र उपान्त्य सामन्यात लक्ष्य सेन पराभूत झाला.
- टोक्यो ऑलिंपिकमध्ये आपला उपान्त्यपूर्व सामना ग्रेट ब्रिटनशीच झाला होता. त्यात आपण ३-१ असा विजय मिळवला होता. विजयाच्या कामगिरीची पुनरावृत्ती झाली, तरी आज त्यासाठी झुंजावे लागले. आक्रमक ब्रिटनला पाचव्याच मिनिटाला पेनल्टी कॉर्नर मिळाला. अमित रोहिदासच्या उत्तम बचावामुळे धोका टळला. अकराव्या मिनिटाला मिळालेला पेनल्टी कॉर्नर श्रीजेशच्या बचावामुळे वाया गेला. आपल्याला पहिली संधी मिळाली तेराव्या मिनिटाला आणि पाठोपाठ दोन. पण ती साधता आली नाही.
- दुसऱ्या क्वार्टरची सुरुवात खराब झाली. धोकादायक खेळाबद्दल अमित रोहिदासला 'रेड कार्ड' दाखविण्यात आले. परिणामी भारताला १० खेळाडूंनिशीच खेळावे लागले.
- तथापि त्यानंतर पाचच मिनिटांनी मिळालेला पेनल्टी कॉर्नर कर्णधार हरमनप्रीतने गोलात रूपांतरित केला. ह्या आघाडीचा आनंद जेमतेम पाच मिनिटे टिकला. ली मॉर्टन ह्याने बरोबरी साधली आणि मग पुढची ३३ मिनिटे दोन्ही संघांनी आटोकाट प्रयत्न करूनही गोल झाला नाही. अखेरच्या काही मिनिटांमध्ये ब्रिटनने जोरदार आक्रमण केले खरे; पण ह्या स्पर्धेनंतर निवृत्त होणारा श्रीजेश खंबीरपणे उभा राहिला.
- पेनल्टी शूट आऊटमध्ये जेम्स आलबरी ह्याने पहिली संधी साधल्यावर हरमनप्रीत सिंग ह्याने बरोबरी केली. झॅक वॉलेस ह्याचा फटका अडविण्यात श्रीजेश अपयशी ठरला. सुखजित सिंग ह्यानेही कर्णधाराचा कित्ता गिरवला.
- ब्रिटनला फटका बसला तो तिसरी आणि चौथी संधी साधण्यात अपयश आल्याचा. कॉनर विल्यम्स चेंडू गोल जाळ्यात ढकलण्यात साफ चुकला. त्यानंतर ललितकुमार उपाध्यायने भारताला आघाडीवर नेले. फिलिप रोपर ह्याचा फटका श्रीजेशने सुरेख अडवला आणि मग राजकुमार पाल ह्याने चौथी संधी साधत उपान्त्य सामन्यात भारताला नेले!
- ह्या लढतीत भारताने गोलजाळ्यावर आठ वेळा, तर ब्रिटनने तब्बल २१ वेळा आक्रमण केले. चारपैकी एका पेनल्टी कॉर्नरवर भारताने गोल केला. प्रतिस्पर्ध्यांना दहा वेळा पेनल्टी कॉर्नर मिळाला, पण सारे प्रयत्न फोल ठरले. भारताहून ब्रिटनचे आक्रमण अधिक खोल आणि सरस होते. पण त्याचे प्रतिबिंब गोलफलकावर अजिबात दिसले नाही.
- उपान्त्य फेरीत भारतासमोर जर्मनीचा संघ असेल. त्यांनाच हरवून भारताने टोक्योमध्ये कांस्यपदक जिंकले होते. धोकादायक बेल्जियम संघ पराभूत झाला. दुसरी उपान्त्य लढत स्पेन व द नेदरलँड्स ह्यांच्यात होईल. ब्रिटनला ३६ वर्षांत ऑलिंपिकचं पदक जिंकता आलेलं नाही. ते स्वप्न पुन्हा एकदा लांब गेलं.
- बॅडमिंटनच्या पुरुष एकेरीतील उपान्त्य सामन्यात लक्ष्य सेन पराभूत झाला. ऑलिंपिक विजेता डेन्मार्कच्या व्हिक्टर अक्सेलसेन ह्याने त्याच्यावर सरळ दोन गेममध्ये विजय मिळवला. उंच्यापुऱ्या व्हिक्टरच्या खेळाचे दडपण न घेता पहिल्या गेममध्ये लक्ष्यने जोरदार झुंज दिला. काही वेळ तर तो आघाडीवर होता. हा गेम २०-२२ असा गमावला.
- दुसऱ्याही गेममध्ये रॅली रंगल्या. व्हिक्टरच्या चुकांचा फायदा घेत लक्ष्य ७-० अशा आघाडीवर होता. तथापि व्हिक्टरने त्याला दहा गुणांवर गाठले आणि मग मागे वळून पाहिलेच नाही. जोरदार आक्रमक खेळ करीत त्याने हा गेम २१-१४ असा जिंकला. आता कांस्यपदकासाठी लक्ष्य आणि मलेशियाचा ली झी जिया ह्यांच्यात सामना होईल.
- टोक्योमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या लव्हलिन बोरगोहेन हिची वाटचाल उपान्त्यपूर्व फेरीत थांबली. मिडलवेट गटात तिला चीन ली कियान हिने सहज हरविले.
- नेमबाजीमध्ये पुरुषांच्या २५ मीटर रॅपिड फायर पिस्टोल प्रकारात विजयवीर सिधू ह्याला पात्रता फेरीचा अडथळाच ओलांडता आला नाही. तो नवव्या स्थानावर राहिला. अनिश भानवाल त्याच्याही मागे राहिला. महिलांच्या स्कीट प्रकारात पात्रता फेरीत  माहेश्वरी चौहान चौदावी, तर रईझा ढिल्लाँ तेविसावी आली.
- ॲथलेटिक्समध्ये आपल्या खेळाडूंना काही ठसा उमटवता आला. पुरुषांच्या लांब उडीच्या पात्रता फेरीत जेस्वीन आल्ड्रिन तेराव्या क्रमांकावर राहिला. पात्र ठरलेला शेवटचा स्पर्धक आणि त्याच्यातील अंतर ३१ सेंटीमीटरचे! महिलांच्या ३ हजार मीटर स्टीपलचेस शर्यतीच्या पहिल्या हीटमध्येअसलेली पारूल चौधरी आठवी आली आणि अर्थातच पुढच्या फेरीसाठी अपात्र ठरली.
- गोल्फमध्ये शुभंकर शर्मा ह्याने ऑलिंपिकमधील भारतीय स्पर्धकांची आजवरची सर्वोत्तम कामगिरी नोंदविली. तो चाळिसाव्या स्थानावर राहिला.

## प्रो गोविंदा लीगसाठी संघांची उत्साही वातावरणात निवड



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** प्रो गोविंदा लीगच्या २०२४ मौसमासाठी संघांची निवड आणि नामांकन समारंभ बांद्रा येथील ताज लॉन्स हॉटेल मध्ये अत्यंत उत्साही वातावरणात पार पडला. यावेळी सर्व संघ मालकांनी आपापल्या संघांची निवड करताना स्पर्धेचा थरार सर्वोच्च स्तरावर नेला. शेकडो गोंविदांचा सहभाग असलेली ही स्पर्धा १८ ऑगस्ट २०२४ रोजी पार पडणार आहे.

यावेळी प्रो गोविंदा लीगचे संस्थापक अध्यक्ष आमदार प्रताप सरनाईक, युवा सेनेचे कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक, डोम एंटरटेनमेंट व्यवस्थापकीय संचालक व सिनेयुग समूहाचे संचालक मजहर नडीयादवाला, डोम एंटरटेनमेंट व सिनेयुग समूहाचे अध्यक्ष व संचालक मोहमद मोरानी आणि सर्व १६ फ्रँचायझीचे मालक उपस्थित होते.

कोकण जायंटस हा या लीगमधील निवड झालेला पहिला संघ ठरला. जे कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्सचे मालक नलीन गुप्ता यांनी संघाची हिरवी जर्सी काढली. कोकण जायंटस संघ कोकण नगर गोविंदा पथकाचे प्रतिनिधित्व करणार आहे. त्यापाठोपाठ पीआरएस इन्फ्राचे प्रतीक शेळके यांनी सातारा सिंघम्सचे अनावरण केले. सातारा सिंघम्स संघ पहिल्या मोसमातील जय जवान गोविंदा संघाचे प्रतिनिधित्व करणार आहे.

### आर. बी. होरांगी, सेंट फेलिक्स शाळेच्या खेळाडूंना

## आंतरराष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत चार सुवर्ण, दोन कांस्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** दक्षिण कोरिया येथे आयोजित १७ व्या जागतिक तायक्वांदो कल्चरल एक्स्पोमध्ये मुजू इंटरनॅशनल तायक्वांदो क्योरुगी आणि पूमसे आयोजित आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पुण्यातील आर. बी. होरांगी तायक्वांदो दो जंग असोसिएशन व सेंट फेलिक्स शाळेच्या क्रीडापटूंनी क्योरुगी आणि पूमसे प्रकारात चार सुवर्ण, तर दोन कांस्य पदके जिंकली. वॉन मुजु येथे झालेल्या या स्पर्धेत भारतासह दक्षिण कोरिया, चीन, थायलंड, तैवान, ऑस्ट्रेलिया, अमेरिका, नेपाळ, ट्युनिशिया, जर्मनी, रशिया, जपान, उत्तर कोरिया, इंडोनेशिया आदी २७ देशांतील तीन हजारांहून अधिक स्पर्धक सहभागी झाले होते.

युथिका संदीपकुमारने तायक्वांदो पूमसे आणि क्योरुगीमध्ये सुवर्ण, अरविन पिलाकुडी व स्वालिहा खान यांनी तायक्वांदो पूमसेमध्ये कांस्य आणि क्योरुगीमध्ये सुवर्ण पदक जिंकले.

या खेळाडूंना मास्टर रवींद्र भंडारी (फिफ्त डॅन ब्लॅक बेल्ट) यांचे मार्गदर्शन लाभले. तायक्वांदो कुकीवॉनचे अध्यक्ष डॉंग सूप ली आणि वर्ल्ड हापकिडो फेडरेशनचे अध्यक्ष डॉन ओह चोई यांच्या हस्ते युथिका संदीपकुमार हिला सेकंड डॅन ब्लॅक बेल्ट प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. आरबी होरांगीचे अध्यक्ष मास्टर रवींद्र भंडारी, सेंट फिलिक्स स्कूलच्या उर्सुला पिंटो, रोझमेरी आल्मेडा, मुख्याध्यापिका जेनिफर परेरा, पर्यवेक्षक सिस्टर एल्सा, लीना पॉल यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले.

## तायक्वांदो स्पर्धेत योधी अकॅडमीचे घवघवीत यश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** दक्षिण कोरियामध्ये आयोजित केलेल्या सतराव्या 'जागतिक तायक्वांदो कल्चर एक्स्पो २०२४', आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पुण्यातील 'योधी तायक्वांदो अकॅडमी'च्या खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले. योधी तायक्वांदो अकॅडमीचे संस्थापक अध्यक्ष आणि फिफ्त डॅन ब्लॅक बेल्ट मास्टर राजेश पुजारी आणि ग्रँडमास्टर चंद्रकांत भोसले यांच्या मार्गदर्शनात योधीच्या सर्व विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत कौतुकास्पद यश मिळवले.

एकूण २६ देशांतून आलेल्या ३५०० खेळाडूंचा यात सहभाग होता. ज्यामध्ये योधीचे स्वतः मास्टर राजेश पुजारी (पुमसे - कांस्य, क्युरोगी - रौप्य) अकॅडमीचे प्रशिक्षक अनुक्रमे - योगेश ठीक (पुमसे - रौप्य, क्युरोगी - सुवर्ण), मनिषा गद्रे (पुमसे - रौप्य, क्युरोगी - सुवर्ण), स्मिता सावर्डेकर (पुमसे - रौप्य, क्युरोगी - सुवर्ण) यांनी यश संपादन केले.

या स्पर्धेत योधी तायक्वांदो अकॅडमीचे यश संपादन केलेले विद्यार्थी अनुक्रमे - आर्यन अकोलकर (पुमसे - कांस्य, क्युरोगी - सुवर्ण), दर्श कुलकर्णी (पुमसे - रौप्य, क्युरोगी - सुवर्ण),श्रीया केळकर (पुमसे - कांस्य, क्युरोगी - रौप्य), रुचिर केळकर (पुमसे - रौप्य, क्युरोगी - कांस्य), अवनी खाडिलकर (पुमसे - सुवर्ण, क्युरोगी - रौप्य), किमया वर्तक (पुमसे - कांस्य, क्युरोगी - कांस्य), गौतम पुराणिक (पुमसे - सुवर्ण, क्युरोगी - कांस्य), गंधार जोगळेकर (पुमसे - कांस्य, क्युरोगी - रौप्य), अनय कळमकर (पुमसे - कांस्य, क्युरोगी - कांस्य), शिवान लाटे (पुमसे - सुवर्ण, क्युरोगी - सुवर्ण).

बेल्ट, वय आणि उंची यानुसार झालेल्या गटांत आलेल्या प्रत्येक देशांतून स्पर्धकांसोबत ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा रंगली. या स्पर्धेच्या निमित्ताने प्रत्येक देशाच्या पारंपारिक नृत्याचे आणि वाद्याचे दर्शनदेखील या स्पर्धेत आयोजित केलेल्या कार्यक्रमात पाहण्याची संधी मिळाली.

दरवर्षी होणाऱ्या या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत योधी तायक्वांदो अकॅडमीचे विद्यार्थी चकमत असतात. हाच नित्यक्रम त्यांनी यंदाच्या वर्षी देखील अगदी चमकदार कामगिरी करत स्पर्धा पार पाडली.

### एव्हरग्रीन चषक दुसरी राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धा

## डेक्कन जिमखाना क्लबचे दोन्ही संघ उपांत्यपूर्व फेरीत



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** प्रौढांची एव्हरग्रीन चषक दुसरी राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेतील सांघिक विभागात डेक्कन जिमखाना क्लबच्या 'अ' आणि 'ब' या दोन्ही संघांनी विजय मिळवित उपांत्यपूर्व फेरीकडे वाटचाल केली.

ही स्पर्धा पुणे जिल्हा टेबल टेनिस संघटना व महाराष्ट्र राज्य प्रौढ टेबल टेनिस समिती यांच्या संयुक्त मान्यतेने सुरू आहे. या स्पर्धेतील सामने डेक्कन जिमखाना क्लब येथील दहा टेबल्सवर तसेच सिम्बॉयसिस स्पोर्ट्स सेंटर येथील पाच टेबल्स वर आयोजित करण्यात आले आहेत.

या स्पर्धेतील सांघिक विभागात डेक्कन जिमखाना 'अ' संघाने एमबीपीए संघाचा ३-२ असा पराभव केला. त्यावेळी त्यांच्याकडून सुयश कुंटे, अमित ढेकणे आदित्य गर्दे यांनी शानदार खेळ केला. जिमखाना 'ब' संघाने सोलापूर 'ब' संघाचा ३-० असा पराभव केला, त्याचे श्रेय सागर शहा, संतोष मदीकुंट व शंतनु जोशी यांना द्यावे लागेल.

अन्य सामन्यांत टॉस अकादमी संघाने करिअर इलेव्हनचा ३-० असा पराभव करीत उपांत्यपूर्व फेरी गाठली. त्यामध्ये संतोष वाकराडकर, कृपाल देशपांडे व दीपेश अभ्यंकर या अनुभवी खेळाडूंचा सिंहाचा वाटा होता. काउंटर अटॅक संघाने सिद्धांचल संघाला ३-० असे पराभूत केले त्यावेळी त्यांच्याकडून नितीन कुलकर्णी, नहुश दांडेकर व विवेक फडणीस हे चमकले. ड्रीम टीम संघाने देखील अपराजित्व राखताना स्मार्ट मास्टर्स संघाला ३-२ असे हरविले.

या स्पर्धेचे उद्घाटन पुणे जिल्हा टेबल टेनिस संघटना व महाराष्ट्र राज्य प्रौढ टेबल टेनिस समितीचे अध्यक्ष राजीव बोडस यांच्या हस्ते झाले यावेळी सन्मय परांजपे, स्मिता बोडस श्रीकांत अंतुरकर,मनीषा बोडस, श्रुती परांजपे मिहिर केळकर, गिरीश इनामदार, आशिष बोडस हे उपस्थित होते.

# ४२ वर्षांची गौरवगाथा

## दिमाखदार कार्यक्रमात

# माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाचा स्थापना दिवस साजरा

४२ वर्षांपूर्वी चार खोल्यांच्या एका लहानशा जागेत माईर्स एमआयटी ची स्थापना झाली. तेव्हापासून त्याचा हा शिक्षणवेल उंचावत गेला आणि आज तो आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील पसरला. ४२ वर्षांच्या या अविरत प्रयत्नांचा एक आनंद सोहळा आज एमआयटीच्या कॅम्पस मध्ये साजरा करण्यात आला




"संस्थेत जगभरातील विद्यार्थ्यांनी दाखला घ्यावा असं संकल्प घेऊन त्या दिशेने सर्वांनी कार्य करावे. शिक्षकांच्या निरलस कार्यामुळे ५ खोल्यांतून सुरू केलेल्या संस्थेचा आज मोठा वटवृक्ष झाला आहे. संस्थेची ५ विद्यापीठे आणि विश्वशांतीचा नारा देणारा जगातील सर्वात मोठ्या घुमटाची निर्मिती झाली."
**— प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड**
एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक




एमआयटीच्या जडणघडणीत सहभाग देणाऱ्या 14 सहकाऱ्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. सर्वांना सन्मानपत्र मेडल आणि श्री ज्ञानेश्वरांची प्रतिमा देण्यात आली. यावेळी उपस्थित प्रा. वि. दा . कराड , बाळासाहेब बडवे , उल्हास दादा पवार , संजय उपाध्ये, शरदचंद्र दराडे पाटील , डीआरएम चिटणीस विनायक घैसास

# मानवी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी शिक्षण महत्वाचे : उल्हास पवार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "सृष्टीवर वाढत जाणाऱ्या मानवी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी शिक्षण म्हणजे शहाणपण आणणे गरजेचे आहे. संकटात सापडलेल्या वाळवंटात पाण्याचा झरा जसा हवा असतो तसे सामाजिक व्यवस्थेसाठी शिक्षण महत्वाचे आहे." असे विचार उर्वरित वैधानिक विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष उल्हास पवार यांनी व्यक्त केले.

देशातील शिक्षण क्षेत्रात माइल स्टोन ठरलेली माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाचा ४२ वा स्थापना दिवस कोथरूड येथील एमआयटी डब्ल्यूपीयू मधील संत ज्ञानेश्वर सभागृहात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

यावेळी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ. मंगेश तु. कराड, ज्येष्ठ संपादक बाळासाहेब बडवे, डॉ. विनायक घैसास, डॉ. संजय उपाध्ये, अधिष्ठाता प्रा. शरदचंद्र दराडे पाटील व एमआयटी डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर.एम. चिटणीस उपस्थित होते. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड यांनी संदेशातून आपल्या शुभेच्छा दिल्या.

एमआयटी डब्ल्यूपीयूचे प्र कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अतुल कुलकर्णी व प्रा. शालिनी टोणपे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. आर.एम.चिटणीस यांनी आभार मानले.






"महाराष्ट्रात तंत्र शिक्षणाचे दालन उघडणारे वसंतदादा यांनी आमुलाग्र क्रांती घडविली आहे. त्यांची इच्छा आणि प्रामाणिकता ही अत्यंत महत्वाची होती. त्याच आधारे एमआयटीने आपला विस्तार वाढवून आकाशाला गवसणी घालत आहे."
**— उल्हास पवार**
वैधानिक विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष



"भारतीय संस्कृतीला वरदान ठरलेले माईर्स एमआयटी शिक्षण संस्था अर्ध्या अधिक विश्वात परिचित झालेली आहे. अध्यात्माच्या वृक्षछायेत वाढणारी ही संस्था आता विश्वात साकार होण्यास तयार आहे."
**— बाळासाहेब बडवे**
ज्येष्ठ पत्रकार

### संस्थेच्या वाटचालीत महत्वाचे योगदान देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा गौरव

माईर्स एमआयटीच्या ४२व्या स्थापनादिनाचे औचित्य साधून संस्थेच्या वाटचालीत महत्वाचे योगदान देणाऱ्या ११ कर्मचाऱ्यांचा व संस्थेत १४ वर्षे अविरत सेवा देणाऱ्या ३ कर्मचाऱ्यांचा विशेष गौरव करण्यात आला. यामध्ये दिलीप पाटील, गणेश कराड पाटील व राजू उगलमुगले यांचा विशेष पुरस्काराने सन्मान करण्यात आला. तसेच विश्वंभर गदले (डब्ल्यूपीयू, पुणे), पद्माकर फड (एडीटी, लोणी काळभोर ), विशाखा कुलकर्णी (आळंदी), हेमंत शिंदे (तळेगाव), राहुल जोशी (बार्शी), गौरव मगर (आळंदी), अनिरुद्ध भातलवंडे (लातूर), दत्तात्रय स्वामी (सरस्वती विद्यालय), भालचंद्र लवाटे (लातूर), सुनीता भोसले (शारदा प्राथमिक विद्यालय), कल्याण साखरे (लोणी काळभोर) यांचा सन्मान करण्यात आला.



एमआयटी एक ब्रॅन्ड असून कमी पडतो ते राष्ट्रीय स्तरावर. अशा वेळेस शिक्षणबरोबरच नवीन ज्ञान देण्यासाठी कार्य करावे. आता नवे प्रयोग, नवे पेपर, पेटेन्ट आणि भारतीय अर्थव्यवस्थेला किती हातभार लावू शकतो यावर लक्ष केंद्रीत करावे. तसेच प्रत्येकात पॅशन, कठोर परिश्रम, मनोबल आणि समर्पणाची भावना असावी." **— डॉ. मंगेश तु. कराड**
एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष



"संस्थेच्या विकासासाठी कर्मचाऱ्यानी हेवे दावे बाजूला ठेऊन विकासासाठी कार्य करावे. प्रत्येकामध्ये स्कील असते त्याचा उपयोग प्रगतीसाठी करावा. प्रत्येकाने माय संस्था ही भावना सतत मनात ठेवावी."
**— डॉ. संजय उपाध्ये**
जेष्ठ प्रवचनकार














कार्यक्रमाच्या प्रारंभी एमआयटीचा ध्वज उंचावत सर्वच मान्यवरांनी विश्वधर्मीची ही पताका उंच करण्याचा संकल्प सोडला . या संस्थेच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या 14 प्रमुख कर्मचारी वृंदांचा सन्मान यावेळी करण्यात आला . ते देखील या ध्वज पूजनामध्ये सहभागी झाले होते.